# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**बी. ए. भाग–१ : (समाजशास्त्र)**

**सत्र १** DSC 01

## समाजशास्त्राचा परिचय

**(Introduction to Sociology)**

**सत्र २** DSC 02

## सामाजिक संस्थांचे बदलते स्वरूप

**(Changing Nature of Social Institutions)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२५
बी. ए. भाग १ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ३००**

■

**प्रकाशक**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-48427-64-9

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर–४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### ■ समाजशास्त्र अभ्यासमंडळ ■

अध्यक्ष - **प्रा. (डॉ.) अर्चना राजकुमार कांबळे (जगतकर)**
न्यू कॉलेज, १०६२, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर

- **प्रा. (डॉ.) श्रीमती प्रतिमा एस. पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. प्रल्हाद एम. माने**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. आनंद लक्ष्मण गाडीवड्डु**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
  ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती भाग्यश्री मल्लिकार्जुन पाटील**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज, (केएमसी) कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती सविता माधवराव गिरे**
  दादासाहेब जोतिराम गोडसे आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज,
  वडूज, ता. खटाव, जि. सातारा
- **डॉ. वसंत कृष्णा मोरे**
  मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. कृष्णाजी मारूती देसाई**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **डॉ. अर्जुन पांडुरंग जाधव**
  दत्ताजीराव कदम आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज,
  इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
- **डॉ. संदिप मुरलीधर चौधरी**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  एसबीइएस कॉलेज ऑफ आर्टस अॅण्ड कॉमर्स,
  छत्रपती संभाजीनगर
- **डॉ. सुगत शेषराव बनसोडे**
  श्री. शिव-शाहू कॉलेज सरूड,
  ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर
- **डॉ. मधुकर गंगाराम धतूरे**
  विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे,
  ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. अभिजित पाटील**
  ७ए-३०१, अशोक नगर, दादलानी पार्क जवळ,
  बाळकुम, ठाणे (वेस्ट)-४००६०८

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने जून २०२४-२५ पासून बी.ए.भाग-१ समाजशास्त्र विषयाचा अभ्यासक्रम नविन शैक्षणिक धोरणानुसार सत्रपद्धतीनुसार व सुधारित स्वरूपात लागू केला आहे. त्यानुसार दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी 'समाजशास्त्र' विषयाचा दोन्ही सत्राचा अभ्यासक्रम विचारात घेवून सदरच्या ग्रंथातील स्वयं अध्ययन साहित्य अनुभवी शिक्षकांकडून लेखण करून तयार करण्यात आले आहे. जून २०२४ पासून या वर्गासाठी तयार केलेल्या 'समाजशास्त्र परिचय व सामाजिक संस्थांचे बदलते स्वरूप' या ग्रंथात विद्यार्थ्यांना समजेल, उमजेल अशा भाषेत लिखाण करण्यात आले आहे.

'समाजशास्त्र परिचय' या सत्र-१ साठीच्या अभ्यासक्रमात समाजशास्त्राचे स्वरूप, समाजशास्त्रामधील मूलभूत संकल्पना, संस्कृती आणि सामाजिकरण, समाजशास्त्राची उपयोगिता या घटकांचा समावेश करण्यात आला आहे. सत्र-२ साठी तयार केलेल्या अभ्यासक्रमात सामाजिक संस्थेचा परिचय, विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, शिक्षणसंस्था इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. या ग्रंथाची एकूण ८ घटकांमध्ये विभागणी करून मांडणी केली आहे. सर्व विद्यार्थी व शिक्षकांना सदरचा ग्रंथ मार्गदर्शक ठरेल, असा मला विश्वास वाटतो.

सदरहू ग्रंथाच्या लिखाणाचे काम शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर कक्षेतील विविध मान्यवर शिक्षकांनी वेळेत पूर्ण केल्याबद्दल, संपादक या नात्याने त्यांचा मी आभारी आहे. या ग्रंथाचे प्रकाशन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संपादक म्हणून त्यांचा मनापासून आभारी आहे.

**■ संपादक ■**

**डॉ. सविता गिरे**
दादासाहेब जोतिराम गोडसे आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज, वडूज, ता. खटाव, जि. सातारा

**डॉ. के. एम. देसाई**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर, जि. कोल्हापूर

| | |
|---|---|
| दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र<br>शिवाजी विद्यापीठ,<br>कोल्हापूर | **समाजशास्त्राचा परिचय**<br>**सामाजिक संस्थांचे बदलते स्वरूप**<br>**बी. ए. भाग–१ समाजशास्त्र** |

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–१ घटक क्रमांक | सत्र–२ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. सविता गिरे**<br>दादासाहेब जोतिराम गोडसे आर्टस, कॉमर्स, सायन्स कॉलेज, वडूज, ता. खटाव, जि. सातारा | १ | १ |
| **डॉ. के. एम. देसाई**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | २ | २, ४ |
| **लेफ्ट. प्रा. दिगंबर राजन्ना नागर्थवार**<br>शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज, ता. मिरज, जि. सांगली | ३ | – |
| **श्री. अभय दौलतराव जायभाये**<br>आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, नागठाणे, जि. सातारा | ४ | ३ |

■ **संपादक** ■


**डॉ. सविता गिरे**
दादासाहेब जोतिराम गोडसे आर्टस, कॉमर्स,
सायन्स कॉलेज, वडूज, ता. खटाव, जि. सातारा

**डॉ. के. एम. देसाई**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर

समाजशास्त्राचा परिचय
सामाजिक संस्थांचे बदलते स्वरूप
बी. ए. भाग–१ समाजशास्त्र

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सत्र–१ : समाजशास्त्राचा परिचय** | |
| १. | समाजशास्त्राचे स्वरूप | १ |
| २. | समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना | १२ |
| ३. | संस्कृती व समाजीकरण | ३६ |
| ४. | समाजशास्त्राची उपयोगिता | ६३ |
| | **सत्र–२ : सामाजिक संस्थांचे बदलते स्वरूप** | |
| १. | सामाजिक संस्थेचा परिचय | ८३ |
| २. | विवाहसंस्था | ९३ |
| ३. | कुटुंब संस्था | १०८ |
| ४. | शिक्षण संस्था | १२१ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२४-२५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १
# समाजशास्त्राचे स्वरूप
## (The Nature of Sociology)

**घटक संरचना:**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय-विवेचन

१.२.१ समाजशास्त्राचे शास्त्रीय स्वरूप आणि अभ्यासविषय

१.२.२ समाजशास्त्राचा उदय आणि विकास

१.२.३ समाजशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व

१.३ सारांश

१.४ सरावासाठी प्रश्न

१.५ चिंतन आणि कार्य

१.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्ट्ये (Objectives):

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास :

१. समाजशास्त्राची व्याख्या, समाजशास्त्रीय स्वरूप आणि अभ्यासविषय समजेल.

२. समाजशास्त्राचा उदय आणि विकास याची माहिती मिळेल.

३. समाजशास्त्राचे महत्त्व आणि उपयोग समजून घेता येईल.

## १.१ प्रस्तावना :

समाजशास्त्राचा जनक म्हणून फ्रेंच समाजशास्त्रज्ञ ऑगस्ट कॉम्प्ट यांचा उल्लेख केला जातो. त्यांनी सर्वप्रथम 'समाजशास्त्र' हा शब्द वापरला. मानवाच्या सहयोगाचा अभ्यास करणाऱ्या शास्त्राला ऑगस्ट कॉम्प्ट यांनी समाजशास्त्र असे म्हटले आहे. ऑगस्ट कॉम्प्ट यांनी 'पॉझिटिव्ह फिलॉसॉफी' हा अत्यंत महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला. या ग्रंथाच्या चौथ्या खंडाला त्यांनी 'सामाजिक भौतिकशास्त्र' असे नाव दिले. परंतु कॉम्प्टच्या अगोदर इ.स. १८३५ मध्ये बेल्जियमच्या ॲडॉल्फ क्विटलेट नावाच्या अंकशास्त्रज्ञाने आपल्या एका गणितीय निबंधाला 'सामाजिक भौतिकशास्त्र' असे नाव दिले होते. हे ऑगस्ट कॉम्प्टच्या यांच्या लक्षात आल्यानंतर

त्यांनी आपल्या चौथ्या खंडाचे 'सामाजिक भौतिकशास्त्र' हे नाव बदलून इ.स. १८३९ मध्ये या खंडाला 'समाजशास्त्र' असे नाव दिले. आणि समाजशास्त्राचा उदय म्हणजेच जन्म झाला. समाजशास्त्र हे एक नवीन सामाजिक शास्त्र म्हणून उदयाला आले.

इंग्रजीतील Sociology या शब्दाची उत्पत्ती Socius या लॅटिन भाषेतील आणि Logos या ग्रीक भाषेतील शब्दांपासून झालेली आहे. Socius म्हणजे सहचर किंवा सोबती होय. आणि Logos म्हणजे शाखा, शास्त्र किंवा सिद्धांत होय. म्हणून या अर्थाने विचार केल्यास Sociology म्हणजे सोबत्यांचे शास्त्र होय. याचा अर्थ समाजशास्त्र हे समाजाचे शास्त्र आहे.

**समाजशास्त्राची व्याख्या** (Definition of Sociology)

१. **मॅकआयव्हर आणि पेज** : सामाजिक संबंध हाच समाजशास्त्राचा अभ्यास विषय आहे. (The subject matter of sociology is social relationship as such - Maciver Page)

२. **हॅरी जॉन्सन** : समाजशास्त्र हे सामाजिक समूहांसंबंधीचे शास्त्र आहे. (Sociology is the science that deals with social groups. - Harry Johnson)

३. **किंवाल यंग** : समाजशास्त्र हे मानवाच्या समूहांमधील वर्तनाविषयीचे शास्त्र आहे. (Sociology deals with the behaviour of man in groups. - Kimball Young)

४. **ऑगबर्न आणि निमकॉफ** : सामाजिक जीवनाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणाऱ्या शास्त्रास समाजशास्त्र असे म्हणतात. (Sociolgy is the scientific study of social life. Ogburn and Nimkoff)

५. **लेस्टर वॉर्ड :** समाजशास्त्र हे समाजाचे शास्त्र आहे. (Sociology is the science of society.- Laster Ward)

६. **गिडिंग्ज :** समाजशास्त्रात संपूर्ण समाजाचे व्यवस्थितरीत्या वर्णन आणि स्पष्टीकरण करण्यात येते. (Sociology is the systematic description and explanation of society as viewed as a whole.- Giddings) समाजशास्त्राचे महत्व (Importance of Sociology)

७. **हॉर्टन आणि हंट :** मानवी सामाजिक जीवनाचा शास्त्रीय पद्धतीने केलेला अभ्यास म्हणजे समाजशास्त्र होय.

८. **हेन्री फेअर चाईल्ड :** समाजशास्त्र म्हणजे मानव व मानवी पर्यावरण यांच्या परस्पर संबंधांचा अभ्यास होय.

**समाजशास्त्राचा अभ्यासविषय** (Subject Matter of Sociology) - समाजशास्त्राच्या विविध व्याख्यांवरून सामाजिक संबंध हा समाजशास्त्राचा अभ्यासविषय आहे हे लक्षात येते. म्हणजेच मानवाचे इतर व्यक्ती, समूह यांच्याशी जे परस्पर- संबंध असतात त्या संबंधाचा अभ्यास व त्या संबंधाचे जाळे म्हणजे

समाज हा समाजशास्त्राचा अभ्यासविषय आहे. सामाजिक संबंध हे एकाच हेतूने घडून येणारे अगर एकाच स्वरूपाचे असत नाहीत, हे संबंध प्रेमाचे वा द्वेषाचे, स्पर्धेचे वा संघर्षांचे असतात. आपुलकीचे किंवा असहकाराचे, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष, क्षणिक किंवा कायम टिकणारे असतात. एकूण हे परस्परसंबंध अत्यंत व्यापक असतात.

अॅलेक्स इंकेल्स यांनी समाजशास्त्राच्या अभ्यासविषयाबाबत जे विवेचन केले त्यानुसार समाजशास्त्राच्या अभ्यासविषयात पुढील गोष्टींचा समावेश झालेला दिसतो.

मानवी समाज आणि संस्कृती, सामाजिक क्रिया आणि सामाजिक संबंध, सामाजिक समूह, व्यक्तिमत्त्व, ग्रामीण व नागरी समुदाय, लोकसंख्या, मूलभूत सामाजिक संस्था उदा. कुटुंब, विवाह, धर्म, शिक्षण, अर्थ, राज्यसंस्था इ. मूलभूत सामाजिक प्रक्रिया उदा. सहकार्य, स्पर्धा, संघर्ष, समायोजन, स्तरीकरण, सामाजिक भेद, सामाजिक विचलन, सामाजिक परिवर्तन इत्यादी.

**समाजशास्त्राचा अभ्यासविषय :**

**१. सामाजिक संबंध** (Social Relationship): समाजशास्त्रात सामाजिक संबंधांचे अध्ययन केले जाते आणि हे संबंध व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह, समूह-समूह अशा प्रकारचे असतात. मॅकआयव्हर आणि पेज यांनी स्पष्टपणे नमूदच केले आहे की, समाजशास्त्रात सामाजिक संबंधाचे अध्ययन केले जाते. आणि हे संबंध निश्चित व स्थिर स्वरूपाचे असतात. विविध समाजातील सामाजिक संबंधांचे स्वरूप, सामाजिक संबंधाची कारणे, सामाजिक संबंधांचे परिणाम, स्थर्यै त्यांची अस्थिरता यांचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो.

**२. सामाजिक समूह** (Social Groups) : सामाजिक संबंध हे समूह-समूहातून घडत असतात. त्यामुळे सामाजिक संरचनेची माहिती लक्षात घेण्यासाठी सामाजिक समूहाचा अभ्यास करावा लागतो. समूहाचे प्राथमिक किंवा दुय्यम समूह, अंतर्समूह आणि बहिर्समूह, संघटित आणि असंघटित, स्थायी आणि अस्थायी इत्यादी विविध प्रकार आहेत. समाशास्त्रात या सर्व समूह प्रकारांचे अध्ययन करण्यात येते. हॅरी जॉन्सन (Harry Johnson) यांनी, 'समाजशास्त्र हे सामाजिक समूहाचे अध्ययन करणारे शास्त्र आहे.' अशी व्याख्या केली आहे.

**३. सामाजिक संस्था** (Social Institution) : समाजात कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, राज्यसंस्था, धर्मसंस्था इत्यादी सामाजिक संस्था आहेत. या सामाजिक संस्थांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध असतो. सामाजिक संस्थांची रचना, त्यांची कार्ये आणि विविध संस्थांचे पारस्पारिक संबंध इत्यादी गोष्टींचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो. मानवाच्या विविध गरजांच्या पूर्तीसाठी सामाजिक संस्थांची निर्मिती झाली आहे. म्हणून समाजशास्त्रात सामाजिक संस्थांच्या अध्ययनास विशेष महत्त्व दिले जाते.

**४. सामाजिक प्रक्रिया** (Social Process) : व्यक्ती-व्यक्तीच्या संपर्कातून आंतरसंबंध निर्माण होतात. या आंतरसंबंधातून सामाजिक प्रक्रिया घडून येतात. सामाजिक प्रक्रिया या संघटनात्मक आणि विघटनात्मक

असतात. सहकार्य, समायोजन, सात्मीकरण या संघटनात्मक प्रक्रिया होत. तर स्पर्धा, संघर्ष या विघटनात्मक प्रक्रिया आहेत. अशा संघटनात्मक आणि विघटनात्मक दोन्ही प्रकारच्या प्रक्रियांचे अध्ययन समाजशास्त्रात केले जाते.

**५. सामाजिक परिवर्तन** (Social Change) : समाज हा स्थिर नाही. समाजात विविध कारणांमुळे परिवर्तन होत असते. सामाजिक परिवर्तनामुळे सामाजिक संबंध, सामाजिक संस्था, समाजरचना इत्यादींमध्ये परिवर्तन घडून येते. हॅरी जॉन्सन यांनी 'सामाजिक संरचनेतील परिवर्तनास सामाजिक परिवर्तन' असे म्हटले आहे. म्हणजे सामाजिक परिवर्तनामुळे भूमिका, समूह-उपसमूह, प्रमाणके आणि मूल्ये या समाजसंरचनेच्या घटकात बदल घडून येतो. म्हणून समाजशास्त्रात सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास केला जातो.

**६. सामाजिक नियंत्रण** (Social Control) : प्रत्येक व्यक्तीच्या भावना, विचार, आकांक्षा, या वेगवेगळ्या असतात. प्रत्येक व्यक्तीला आपल्या मताप्रमाणे वर्तन करावे, असे वाटत असते. परंतु प्रत्येक व्यक्ती जर आपल्या मताप्रमाणे किंवा वाटेल तसे वर्तन करू लागली तर, समाजात गोंधळ निर्माण होईल. ही गोष्ट लक्षात घेऊन समाजातील सदस्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यात आले आहे. लोकरूढी, लोकनीती, परंपरा, धर्म, कायदा इत्यादी सामाजिक नियंत्रणाच्या साधनांद्वारा समाजावर नियंत्रण ठेवले जाते.

**७. सामाजिक समस्या** (Social Problems) : समाजात वैयक्तिक आणि सामाजिक विघटनातून विविध समस्या निर्माण होतात. या सर्व सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन केले जाते. व त्यावर अनेक उपाययोजना सुचविल्या जातात.

**८. सामाजिक नियोजन** (Social Planning): आर्थिक नियोजनाप्रमाणेच सामाजिक नियोजनाची देखील आधुनिक काळात आवश्यकता आहे. सामाजिक नियोजनाद्वारे सामाजिक हिताच्या दृष्टीने समाजात बदल घडवून आणला जातो. म्हणून समाजशास्त्रामध्ये सामाजिक नियोजनाचेही अध्ययन केले जाते.

**९. समाज व पर्यावरण** (Society and Environment): नैसर्गिक, सामाजिक आणि सांस्कृतीक पर्यावरणाचा समाज जीवनावर फार मोठा प्रभाव पडतो. त्यामुळे सामाजिक संस्था प्रभावित होतात. पर्यावरणाचा सामाजिक संबंधांवर कोणता परीणाम होतो, याचे अध्ययन समाजशास्त्रात केले जाते.

अशाप्रकारे वरील गोष्टीचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो. त्याचप्रमाणे कुटुंब, सामाजिक स्तरीकरण, सामाजिक दर्जा, भूमिका, इत्यादी विविध विषयांचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो. यावरून समाजशास्त्राच्या अध्ययन विषयाच्या व्याप्तीची कल्पना येते. समाजशास्त्राच्या ग्रामीण समाजशास्त्र, नागरी समाजशास्त्र, राजकीय समाजशास्त्र, औद्योगिक समाजशास्त्र, सामाजिक मानवशास्त्र, अपराधशास्त्र, धर्माचे समाजशास्त्र इत्यादी विविध शाखा आहेत. आधुनिक काळात ता समाजशास्त्राच्या अभ्यासाविषयाचे क्षेत्र हे अधिक व्यापक होत आहे.

### १.२.२ समाजशास्त्राचा उदय आणि विकास

एकोणिसाव्या शतकात एक नवीन शास्त्र म्हणून समाजशास्त्राचा उदय झाला आहे. परंतु समाजशास्त्राचे बीजारोपण हे सतराव्या आणि अठराव्या शतकात झालेले आहे. या दोनशे वर्षांच्या काळात बौद्धिक क्षेत्रात लक्षणीय वाढ झाल्यामुळे या काळाला बौद्धिक उद्बोधनाचा काळ किंवा बौद्धिक पुनरुज्जीवनाचा काळ असेही म्हणतात. या काळात बौद्धिक क्षेत्रात झपाट्याने विकास झाला. तसेच या काळात राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात देखील मोठ्या प्रमाणात घडामोडी घडल्या. या घडामोडींमुळे युरोपातील समाजजीवन अक्षरशः ढवळून निघाले. फ्रेंच राज्यक्रांती, औद्योगिक क्रांती, भांडवलशाही व्यवस्थेचा उदय, नागरीकरण प्रक्रियेचा वेग, समाजावरील धर्माची पकड शिथिल होणे यासारख्या घटनांमुळे एकंदरीत जगातील सर्वच लोकांचे जीवन ढवळून निघाले. अशा बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे आवश्यक बनले. समाज जीवनावर परिणाम करणाऱ्या या सामाजिक घटनांविषयी शास्त्रीय अध्ययनाची आवश्यकता जगभरातील विद्वानांना जाणवू लागली. याचा परिणाम म्हणून समाजशास्त्राच्या उदयाची पार्श्वभूमी तयार झाली. सुप्रसिद्ध विचारवंत झैटलीन यांच्या मते, प्रारंभिक काळात झालेला समाजशास्त्राचा विकास हा बौद्धिक पुनरुज्जीवनाला दिलेली प्रतिक्रिया होती. एकंदरीत, समाजशास्त्राचा उदय आणि विकास पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतो.

**१. ऑगस्ट कॉम्प्ट (फ्रान्स–१७९८–१८५६):** सुप्रसिद्ध फ्रेंच तत्वज्ञ, प्रत्यक्षवादाचा संस्थापक, ऑगस्ट कॉम्प्ट यांनी प्रस्तुत विषयाचे 'समाजशास्त्र' असे नामकरण केले. त्यांनी इ.स. १८३९ मध्ये 'द कोर्स ऑफ पॉझिटिव्ह फिलॉसॉफी' या त्यांच्या ग्रंथात 'समाजशास्त्र' हा शब्द सर्वप्रथम वापरला. त्यामुळे त्यांना 'समाजशास्त्राचा जनक' (Father of Sociology) असे म्हटले जाते. आपल्या 'द कोर्स ऑफ पॉझिटिव्ह फिलॉसॉफी' या ग्रंथाच्या चौथ्या खंड्याला त्यांनी प्रारंभी 'सामाजिक भौतिकशास्त्र' असे नाव दिले होते. पण एका बेल्जियमच्या अंक शास्त्रज्ञाने आपल्या एका गणितीय निबंधाला 'सामाजिक भौतिकशास्त्र' असे शीर्षक दिल्यामुळे कॉम्प्ट यांनी मोठ्या नाईलाजाने आपल्या चौथ्या खंडाचे 'सामाजिक भौतिकशास्त्र' हे नाव बदलनू 'समाजशास्त्र' असे नाव दिले. आणि सामाजिकशास्त्राच्या विश्वात एका नवीन शास्त्राचा म्हणजेच 'समाजशास्त्राचा' उदय झाला. ऑगस्ट कॉम्प्ट यांनी समाजाचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीने केला जावा, असे आग्रही मत मांडले. भौतिक घटनांचा ज्या पद्धतीने अभ्यास केला जातो, त्याच पद्धतीने सामाजिक घटनांचा देखील अभ्यास करता येतो. हे त्यांनी दाखवनू दिले. ऑगस्ट कॉम्प्ट यांनी मानवी विकासाच्या तीन अवस्थांचा सिद्धांत, प्रत्यक्षवादाचा सिद्धांत, शास्त्राच्या श्रेणीरचनेचा सिद्धांत, सामाजिक स्थितीशास्त्र आणि गतीशास्त्राचा सिद्धांत तसेच 'समाज शास्त्र हे एक विज्ञान' हा सिद्धांत मांडून समाजशास्त्राच्या विकासात मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या मते, 'सामाजिक स्थितीविज्ञान' आणि 'सामाजिक गतीविज्ञान' या समाजशास्त्राच्या दोन प्रमुख शाखा आहेत. ऑगस्ट कॉम्प्ट यांच्या ' पॉझिटिव्ह फिलॉसॉफी' या ग्रंथाचे इंग्रजीत भाषांतर इंग्लंडमधील हॅरिएट मार्टिन्यू या महिला समाजशास्त्रज्ञाने केले. म्हणून त्यांना पहिल्या महिला समाजशास्त्रज्ञ म्हणतात. समाजशास्त्राच्या उदयाच्या व विकासाच्या दृष्टीने ऑगस्ट कॉम्प्ट यांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या शिवाय समाजशास्त्राच्या विकासात इतर अनेक विचारवंतांनी देखील मोलाचे योगदान दिलेले आहे.

**२. कार्ल मार्क्स (जर्मनी–१८१८–१८८३):** कार्ल मार्क्स हा जर्मन विचारवंत आहे. कार्ल मार्क्स या अर्थशास्त्रीय विचारांची बैठक समाजशास्त्रीय आहे. कार्ल मार्क्स यांनी 'दास कॅपिटल' आणि 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टो' हे दोन महत्वपर्णू ग्रंथ लिहिले आहेत. मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवादाचा सिद्धांत, द्वंद्वात्मक भौतिकवादाचा सिद्धांत, वर्गसंघर्षाचा सिद्धांत, अलगीकरणाचा सिद्धांत, अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत इत्यादी महत्त्वपूर्ण सिद्धांत मांडले. कार्ल मार्क्सच्या मते, 'धर्म ही अफूची गोळी आहे. धर्म गुंगी आणणारा पदार्थ आहे.' मार्क्स यांनी असे म्हटले आहे की, 'जगाचा इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास आहे.' कार्ल मार्क्स कामगारांचे नेते होते. त्यांनी जगातील कामगारांना अन्यायाच्या विरोधात संघटित करण्यासाठी आव्हान करताना असे म्हटले की, 'कामगारांनो जागे व्हा! तुमच्या पायातील बेड्याशिवाय तुमच्याकडे गमावण्यासारखे काहीच नाही. परंतु जिंकण्यासाठी मात्र संपूर्ण विश्व आहे.' मार्क्स यांनी भांडवलशाहीत 'आहेरे'चा वर्ग आणि 'नाहीरे'चा वर्ग असे दोन वर्ग असल्याचे स्पष्ट केले आहे. या दोन वर्गाच्या वर्ग संघर्षातून भांडवलशाही अर्थव्यवस्था उद्धवस्थ होईल आणि साम्यवादी राज्य निर्माण होईल. असा आशावाद त्यांनी कामगारांना दाखविला. साम्यवादी राज्य निर्माण झाले म्हणजे कामगारांचे राज्य निर्माण होईल. अशा राज्यात 'आहेरे'चा वर्ग आणि 'नाहीरे'चा वर्ग हे दोन्ही वर्ग राहणार नाहीत. आर्थिक विषमता राहणार नाही. असे विचार मांडले. म्हणून कार्ल मार्क्स यांना 'साम्यवादाचा जनक' असे म्हणतात.

**३. हर्बर्ट स्पेन्सर (इंग्लंड– १८२०–१९०३):** ऑगस्ट कॉम्प्ट नंतर इंग्लंडमधील हर्बर्ट स्पेन्सर यांनी समाजशास्त्राच्या विकासात मोलाची भर घातली आहे. हर्बर्ट स्पेन्सर यांनी 'द प्रिन्सिपल ऑफ सोसिओलॉजी' (समाजशास्त्राची तत्वे) हा महत्त्वपर्णू ग्रंथ लिहून समाजशास्त्राच्या विकासाला चालना दिली. हर्बर्ट स्पेन्सर यांनी समाजाचा सद्रिंय सिद्धांत मांडून जीव व समाजाची तुलना केली. यामध्ये त्यांनी जीव व समाजातील साम्य आणि फरक स्पष्ट केले. हर्बर्ट स्पेन्सरने सामाजिक उत्क्रांतीचा सिद्धांत देखील मांडला. या सिद्धांतात त्यांनी समाजाच्या उत्क्रांतीच्या टप्प्यांचे विश्लेषण करून समाजाच्या उत्क्रांतीची दिशा निश्चित करण्याचा प्रयत्न केला. समाजाच्या प्रकारांचा सिद्धांत मांडून त्यांनी या सिद्धांतात समाजाचे सैनिकी समाज व औद्योगिक समाज असे दोन प्रकार स्पष्ट केले. त्यांचे हे योगदान समाजशास्त्राला लाभलेली देणगी आहे.

**४. एमिल दुर्खीम (फ्रान्स– १८५८–१९१७)**: फ्रान्स मधील समाजशास्त्राचा एक गाढा अभ्यासक म्हणनू एमिल दुर्खीम यांना ओळखले जाते. अभिजात कालखंडातील समाजशास्त्रीय विचारवंत म्हणनू त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. एमिल दुर्खीम यांनी 'द रूल्स ऑफ सोसिऑलॉजीकल मेथड्स', 'द सुसाईड' आणि 'द डिव्हिजन ऑफ लेबर' हे तीन महत्त्वपर्णू ग्रंथ लिहून समाजशास्त्राच्या विकासात भर घातली. एमिल दुर्खीम यांनी आत्महत्येचा सिद्धांत, श्रमविभाजनाचा सिद्धांत, सामूहिक प्रतिनिधित्वाचा सिद्धांत, सामाजिक तथ्याचा सिद्धांत आणि धर्माच्या व्युत्पत्ती संबंधी टोटमवादाचा म्हणजेच कुलप्रतीकवादाचा सिद्धांत मांडला. त्यांचा श्रमविभाजनाचा आणि आत्महत्येचा सिद्धांत सर्व परिचीत आहे. त्यांनी समाजातील घटकांना 'सामाजिक तथ्य' समजून त्यांचे अध्ययन केले जावे असे म्हटले. त्यांनी समाजशास्त्रीय अध्ययनाचे स्वतंत्र पद्धतीशास्त्र विकसित केले. त्याला सामाजिक तथ्य पद्धतीशास्त्र असे म्हणतात.

**५. मॅक्स वेबर (जर्मनी– १८६४–१९२०)** : समाजशास्त्राच्या विकासाचा पाया भक्कम करणारा मॅक्स वेबर हा एक प्रमुख जर्मन समाजशास्त्रज्ञ आहे. मॅक्स वेबर यांनी 'द प्रोटेस्टंट इथीक्स अॅन्ड द स्पिरिट ऑफ कॅपिटॅलिझम' (प्रॉटेस्टंट पंथाची नितीतत्त्वे आणि भांडवलशाहीचा आत्मा) हा अत्यंत महत्त्वपर्णू ग्रंथ लिहिला. या ग्रंथात वेबर यांनी प्रॉटेस्टंट विचारप्रणाली ही भांडवलशाही अर्थव्यवस्थेला विकसित करण्यासाठी कशी कारणीभूत ठरली? याविषयीचे विवेचन केले. मॅक्स वेबर यांनी नोकरशाहीचा सिद्धांत, सत्तेच्या प्रकाराचा सिद्धांत, सामाजिक क्रियांचा सिद्धांत, आदर्श प्रारूपाचा सिद्धांत आणि राजकीय समाजशास्त्र इत्यादी सिद्धांतांची मांडणी करून समाजशास्त्राच्या विकासात मूलभूत स्वरूपाचे योगदान दिलेले आहे.

**६. जॉर्ज सिमेल (जर्मनी – १८६८–१९१८):** मॅक्स वेबर नंतर आणखी एक जर्मन समाजशास्त्रज्ञ म्हणनू जॉर्ज सिमेल यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. जॉर्ज सिमेल यांनी 'स्वरूपप्रधान समाजशास्त्र' विकसित करण्यात महत्त्वपर्णू योगदान दिले आहे. त्यांनी सामाजिक आंतरक्रिया संबंधीचे विचार देखील मांडले आहेत. सिमेल यांनी 'फिलॉसॉफी ऑफ मनी' या ग्रंथात सामाजिक संघर्षाचा सिद्धांत मांडला. सिमेलचा आंतरक्रिया विषयीचा विचार तात्कालीन समाजशास्त्रज्ञांमध्ये जबरदस्त प्रभावी होता. यातूनच पुढे समाजशास्त्रामध्ये 'प्रतिक्रियात्मक आंतरक्रियावाद' हा विचार रूढ झाला. जॉर्ज सिमेल यांनी संघर्ष हा समाजामध्ये विधायक परिणाम घडवनू आणतो, अशा प्रकारचे आग्रही मत मांडले.

**७. विल्फ्रेडो पॅरॉटो (इटली– १८४८–१९२३):** विल्फ्रेडो पॅरॉटो हा प्रारंभीच्या काळात अभियंता होता. तसेच तो अर्थशास्त्रज्ञ देखील होता. हा इटालियन विचारवंत नंतरच्या काळात समाजशास्त्राच्या अभ्यासाकडे वळला आणि समाजशास्त्रज्ञ बनला. त्यांनी 'माईंड अॅन्ड सोसायटी' हा महत्वपर्णू ग्रंथ लिहिला. पॅरॉटोचे विचार कार्ल मार्क्सच्या विचारांना छेद देणारे होते. विल्फ्रेडो पॅरॉटो यांच्यामते, श्रद्धा, भावना, सहजप्रवृत्ती इत्यादी आतंरिक घटकांनी देखील मानवी वर्तन प्रभावित होत असते. पॅरॉटो यांनी श्रेष्ठीजनाचा किंवा अभिजनाचा सिद्धांत मांडून समाजशास्त्रात योगदान दिले. तसेच त्यांनी सामाजिक परिवर्तनाचा चक्राकार सिद्धांत मांडला. त्यांचा 'तार्किक प्रयोगात्मक पद्धती सिद्धांत' हा तर समाजशास्त्रीय विचार विश्वात खूप प्रसिद्ध आहे. त्यांनी तार्किक आणि अतार्किक क्रिया असे विश्लेषण करून समाजशास्त्राच्या अभ्यासाला एक नवी दिशा दिली.

**८. अमेरिकेतील समाजशास्त्रज्ञाचे योगदान:** फ्रान्स आणि जर्मनीमध्ये समाजशास्त्राच्या विकासासाठी जी परिस्थिती कारणीभूत ठरली. त्यापेक्षा वेगळी परिस्थिती अमेरिकेमध्ये होती. अमेरिकेतील औद्योगिक विकासामुळे जगभरातील लोकांचे स्थलांतरण अमेरिकेकडे होत होते. यातून निर्माण झालेल्या अमेरिकन समाजाच्या व्यवहारीक समस्या वेगळ्याच होत्या. त्याचा परिणाम अमेरिकेतील समाजशास्त्राच्या विकासावर झाला. या बदलत्या परिस्थितीचे शास्त्रीय अध्ययन अमेरिकेतील विल्यम ग्राहम सम्नेर, थर्स्टन व्हेबलेन, जॉर्ज हर्बर्ट मिड, सी. एच. कुले, टॉलकॉट पार्सन्स इत्यादी विचारवंतांनी केले. त्यांनी केलेल्या शास्त्रीय अध्ययनामुळे अमेरिकेत समाजशास्त्राचा विकास होण्यास मदत झाली.

### १.२.३. समाजशास्त्राच्या अध्ययनाचे महत्व

समाजशास्त्रात सामाजिक जीवनाचे अध्ययन केले जाते. समाजशास्त्रातील सामाजिक घटना आणि सामाजिक समस्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून समाजात सामंजस्य निर्माण करता येते. या दृष्टीकोनातून विचार केल्यास आधुनिक काळात प्रत्येक व्यक्ती आणि समाजाला समाजशास्त्रीय अध्ययनाची आवश्यकता आहे. संस्कृती आणि सभ्यतेच्या विकासाबरोबरच अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या. या सामाजिक समस्यांचे स्वरूप अतिशय क्लिष्ट आहे. त्यामुळे समाजशास्त्राच्या अध्ययनाचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे.

समाजशास्त्राच्या महत्वाचा विचार करतांना या संदर्भात प्रचलित असलेले दोन दृष्टीकोन शुद्ध संशोधनवादी आणि उपयोगितावादी लक्षात घ्यावे लागतील. शुद्ध संशोधनवादी दृष्टीकोनाचा पुरस्कार हक्सले (Huxley) आणि फ्रान्सिस बेकन (Fransis Bacon) यांनी केला. त्यांच्या मते, शास्त्रात संशोधन पद्धतीचा अवलंब करून सतत ज्ञान मिळविले पाहिजे, ज्ञानाचा विकास करणे हे आपले उद्दिष्ट असणे आवश्यक आहे, तर उपयोगितावादी दृष्टीकोन रॉबर्ट लिंड (Robert Lind) आणि स्टॉऊफर (Stouffer) यांनी मांडला. उपयोगितावाद्यांच्या मते, 'मानवाने मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या विकासासाठी केला पाहिजे', या दोन्ही दृष्टीकोनानुसार ज्ञान मिळविणे आणि त्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करणे आवश्यक आहे. समाजशास्त्राचे महत्व पुढीलप्रमाणे आहे.

**१. मानव समाजाचे वस्तुनिष्ठ आकलन-** समाजशास्त्र हे मानव समाजाचे स्वतंत्र शास्त्र आहे. समाजशास्त्रात मानवी समाजाची संरचना, संरचनेचे घटक, परस्पर संबंध, प्रकार्य-अप्रकार्य, सामाजिक नियंत्रण, सामाजिक परिवर्तन, सामाजिक विचलन अनुचलन, विविध सामाजिक समस्या इत्यादींचे शास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन केले जाते. या अध्ययनामुळे मानवी समाजाचे वस्तुनिष्ठ आकलन करणे शक्य झाले आहे. समाजाच्या या वस्तुनिष्ठ अध्ययनाचा उपयोग सामाजिक प्रश्न सोडविणे, समाजाचा विकास घडवून आणणे इत्यादीसाठी केला जातो.

**२. सामाजिक समस्यांचे अध्ययन-** आधुनिक काळात विविध प्रकारच्या सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. या समस्यांचा अतिशय विपरीत परिणाम समाज जीवनावर पडतो. सामाजिक समस्यांमुळे सामाजिक विकासात बाधा निर्माण होते. समाजशास्त्रात सामाजिक समस्यांचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन केले जाते. या समाजशास्त्रीय अध्ययनामुळे समस्यांच्या स्वरूपाचे वस्तुनिष्ठ आकलन होऊन त्या समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने विशेष मदत होते.

**३. सामाजिक कल्याणाकरिता उपयुक्त** -सामाजिक कल्याण करण्याच्या दृष्टीने समाजशास्त्राचे विशेष महत्व आहे. समाजातील सर्व घटकांचा समान विकास होत नाही. काही समुदाय अजूनही मागासलेले आहेत. भारतीय समाजाचा विचार केल्यास आदिवासी, अनुसूचित जाती इत्यादी सामाजिक, सांस्कृतिकदृष्ट्या मागासलेले आहेत. त्याचप्रमाणे कामगार आणि इतर लहान लहान व्यवसाय करणाऱ्या लोकांचे अनेक प्रश्न आहेत. मागासलेला समाज, कामगार इत्यादींच्या कल्याणाकरिता समाजशास्त्रीय अध्ययन विशेष मदतकारक ठरले आहे. बालक, महिला, वृद्ध, कामगार आणि मागासलेल्या समाजाच्या दृष्टीने शासनाच्या विविध

कल्याणकारी योजना आहेत. या सर्व उपेक्षित घटकांच्या कल्याणाकरिता कल्याणकारी योजना आखण्यासाठी समाजशास्त्राची विशेष मदत होते.

**४. सामाजिक नियोजन :** समाजाचा एका विशिष्ट दिशेने विकास घडवून आणण्यासाठी नियोजन महत्वाचे असते. आर्थिक नियोजनाप्रमाणेच सामाजिक नियोजन देखील केले जाते. आधुनिक काळात सामाजिक नियोजनाचे विशेष महत्व आहे. सामाजिक नियोजन करताना समाजाविषयीची वस्तुनिष्ठ माहिती आणि समस्यांच्या स्वरूपाची जाणीव असली पाहिजे. म्हणून सामाजिक नियोजनाच्या दृष्टीने समाजशास्त्र हे विशेष उपयुक्त ठरले आहे.

**५. मानव समाजाचा विकास** –मानव समाजाचा विकास करण्याच्या संदर्भात समाजशास्त्राचे विशेष योगदान आहे. समाजात विविध प्रकारच्या रुढी, परंपरा, चालीरीती, धार्मिक परंपरा, अंधश्रद्धा, गैरसमज असतात. त्यामुळे समाज हा विकासाच्या दिशेने वाटचाल करू शकत नाही. समाजशास्त्रात या सर्व गोष्टींचे शास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन केले जाते. लोकांना त्यांच्या रुढी, परंपरा, चालीरीती, धार्मिक परंपरा या गोष्टी कशा अयोग्य आहेत, त्यामुळे त्यांची प्रगती का होऊ शकली नाही, याबाबतची वस्तुनिष्ठ माहिती देता येते. त्यामुळे मानव समाज हा शास्त्रीय पद्धतीने विचार करून आपली प्रगती घडवून आणण्याच्या दृष्टीने क्रियाशील झाला आहे.

**६. व्यावसायिक महत्व** : समाजशास्त्राचे व्यावसायिक दृष्टीने विशेष महत्व आहे. आधुनिक काळात समाजाचा विकास होत असताना समाज जीवनातील विविध क्षेत्रात समाजशास्त्रीय अध्ययनास महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे समाजशास्त्राच्या अभ्यासकांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. औद्योगिक क्षेत्रात सामाजिक सुरक्षा, रोजगार कार्यालय, बेरोजगारी, बीमा योजना, सामाजिक सुरक्षा योजना, अपराध सुधार संबंधीचे क्षेत्र, बालभवन, सामाजिक कल्याण, सामाजिक शिक्षण, प्रौढ शिक्षण, अनाथालये, सुधार केंद्र, महिला केंद्र, कुटुंब नियोजन इत्यादी विविध क्षेत्रात समाजशास्त्राच्या अभ्यासकाला नोकरी मिळते. यावरून हे स्पष्ट होते की, समाज जीवनाच्या विविध क्षेत्रात समाजशास्त्राची आवश्यकता आहे.

**७. सामाजिक–धार्मिक एकता :** सामाजिक–धार्मिक एकता निर्माण करण्यास आज संपूर्ण समाज जीवनात सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक विभिन्नता आढळून येते. एकाच देशातील लोकांच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवनात फरक आढळून येतो. त्यामुळे सामाजिक, धार्मिक प्रश्नावरून अनेक प्रश्न निर्माण होतात. त्याकरिता सामाजिक–धार्मिक एकता प्रस्थापित करणे आवश्यक आहे.

## **१.३ सारांश** (Let Us Sum Up):

या घटकात समाजशास्त्राची व्याख्या आणि अभ्यासविषय यांचा अभ्यास आपण केला. या घटकात आपण अभ्यासलेले ठळक खालील मुद्दे:

समाजशास्त्र (Sociology) ही संज्ञा सर्वप्रथम ऑगस्ट कॉम्ट या फ्रेंच तत्वज्ञाने त्याच्या 'Positive Philosophy या ग्रंथात १८३९ साली वापरली. त्यांना 'समाजशास्त्राचा जनक' म्हणून ओळखले जाते.

Sociology' हा इंग्रजी शब्द 'socious' या लॅटिन आणि लोगस (logus) या ग्रीक भाषेतील शब्दांपासून तयार झाला आहे. मानवी सहाचार्य अभ्यास असा Sociology या शब्दाचा अर्थ होतो. विविध समाजशास्वज्ञानी वेगवेगळी शब्दयोजना चापरून समाजशास्त्राची व्याख्या केली आहे. आपण समाजशास्त्राच्या विविध समाजशास्वज्ञानी केलेल्या व्याख्यांचा या घटकात अभ्यास केला आहे. व्याख्यांचा अभ्यास केला असता असे दिसून आले की, 'अभ्यासपद्धती आणि अभ्यासविषय या दोन मुद्यांच्या संदर्भात समाजशास्त्राच्या व्याख्या करण्यात आल्या आहेत. 'समाज', 'सामाजिक जीवन', 'सामाजिक घटना, सामाजिक संस्था', 'सामाजिक समूह', 'सामाजिक संरचना', 'सामाजिक क्रिया', 'सामाजिक आंतरक्रिया' आणि 'सामाजिक संबंध' अशा संज्ञा समाजशास्त्राच्या अभ्यास क्षेत्राचा निर्देश करण्यासाठी विविध व्याख्यांमधून वापरण्यात आल्या आहेत. विविध बाबींचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून समाजशास्त्रात होत असल्याचेही सर्वच व्याख्यांतून अधोरेखित करण्यात आले आहे.

समाजशास्त्राचा अभ्यासविषय विशद करताना प्रथम आपण ऑगस्ट कॉम्ट, एमिल दुरखीम, जॉर्ज सिम्मेल, मॅक्स वेबर आणि ॲलेकर इकेल्स यांनी समाजशास्त्राच्या अभ्यासविषयासंबंधी व्यक्त केलेल्या विचारांचा थोडक्यात आढावा घेतला आहे. समाजशास्त्राच्या विविध व्याख्यांमधील अभ्यासविषयाबाबतचे मुद्दे आणि नामवंत समाजशास्त्रज्ञांचे मते या दोहोच्या आधारे समाजशास्त्रात महत्वाचे मानले गेलेले अभ्यासविषय कोणते हे आपण समजून घेतले आहे. समाजशास्त्रात सामाजिक जीवनाचे अध्ययन केले जाते. समाजशास्त्रातील सामाजिक घटना आणि सामाजिक समस्यांच्या ज्ञानाचा उपयोग करून समाजात सामंजस्य निर्माण करता येते. या दृष्टीकोनातून विचार केल्यास आधुनिक काळात प्रत्येक व्यक्ती आणि समाजाला समाजशास्त्रीय अध्ययनाची आवश्यकता आहे. संस्कृती आणि सभ्यतेच्या विकासाबरोबरच अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या. या सामाजिक समस्यांचे स्वरूप अतिशय क्लिष्ट आहे. त्यामुळे समाजशास्त्राच्या अध्ययनाचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे.

समाजशास्त्राच्या महत्वाचा विचार करतांना या संदर्भात प्रचलित असलेले दोन दृष्टीकोन शुद्ध संशोधनवादी आणि उपयोगितावादी लक्षात घ्यावे लागतील. शुद्ध संशोधनवादी दृष्टीकोनाचा पुरस्कार हक्सले (Huxley) आणि फ्रान्सिस बेकन (Fransis Bacon) यांनी केला. त्यांच्या मते, शास्त्रात संशोधन पद्धतीचा अवलंब करून सतत ज्ञान मिळविले पाहिजे, ज्ञानाचा विकास करणे हे आपले उद्दिष्ट असणे आवश्यक आहे, तर उपयोगितावादी दृष्टीकोन रॉबर्ट लिंड (Robert Lind) आणि स्टॉऊफर (Stouffer) यांनी मांडला. उपयोगितावाद्यांच्या मते, 'मानवाने मिळविलेल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या विकासासाठी केला पाहिजे', या दोन्ही दृष्टीकोनानुसार ज्ञान मिळविणे आणि त्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करणे आवश्यक आहे.

## **१.४ सरावासाठी प्रश्न / गृहपाठ** (Exercise / Home Assignment):

खालील प्रश्नांची उत्तरे तयार करा.

१) समाजशास्त्राची व्याख्या देऊन तिचा अर्थ स्पष्ट करा.

२) समाजशास्त्राचा अभ्यासविषय स्पष्ट करा.

३) समाजशास्त्रीय दृष्टिकोनाची (परिप्रेक्ष्याची) ठळक वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४) 'शास्त्र' या संज्ञेची व्याख्या देऊन शास्त्राच्या तीन प्रमुख वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण करा.

५) शास्त्रीय संशेधन पद्धतीतील प्रमुख अवस्थांचे वर्णन करा.

६) शास्त्रीय ज्ञानाच्या वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण करा.

७) एक शास्त्र म्हणून समाजशास्त्राच्या वैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण करा.

८) समाजशास्त्राच्या उदयापूर्वीच्या सामाजिक विचारांच्या इतिहासाचा सारांश थोडक्यात लिहा.

९) समाजशास्त्राच्या प्रारंभिक विकासातील सामाजिक, राजकीय आणि आर्थिक घटकांचे स्पष्टीकरण करा.

१०) समाजशास्त्राच्या प्रारंभिक विकासातील बौद्धिक तात्विक घटकाचे स्पष्टीकरण करा.

**१.५ चिंतन आणि कृती** (Reflection and Action):

आपल्याला परिचित असलेल्या समाजशास्त्र विषयाच्या शिक्षकांशी चर्चा करा आणि भारतातील आणि महाराष्ट्रातील प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञांच्या नावांची यादी तयार करा.

## १.६ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings):


१. नाडगोंडा गुरुनाथ : (२००१). समाजशास्त्राची मुलतत्वे. पुणे: कॉन्टीनेंटल प्रकाशन.

२. साळुंखे सर्जेराव : समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे, २००३.

३. Shankar Rao C.N. : Sociology (5th Edition), S. Chand and Co. Ltd., New Delhi, 2006.

४. Johnson, Harry M. : Sociology - - Systematic Introduction, -llied Publishers, Pvt. Ltd., Bombay New 1970.

५. Tischler, H.L., Whitten, Phillip Hunter, David E.K. : Introduction to Sociology, Holt, Rinehart and Winston, 1983.

६. Geoge Ritzer : Sociological Theory, (5th Edition) International Edition, 2000

७. Peter Hamilton and Keneth Thompson : The Uses of Sociology, Blackwell Publishing, UK, 2002.


❑❑❑

# घटक २
# समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना
## (Basic Concepts in Sociology)

**घटक संरचना:**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय - विवेचन

  २.२.१ सामाजिक आंतरक्रिया : व्याख्या आणि प्रकार

  २.२.२ सामाजिक समूह : व्याख्या आणि वैशिष्ट्ये

  २.२.३ समाज : व्याख्या आणि वैशिष्ट्ये

  २.२.४ स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

२.४ सारांश

२.५ स्वयं-अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ चिंतन आणि कार्य

२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्ट्ये (Objectives) :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला :

- सामाजिक आंतरक्रियेचा अर्थ आणि प्रकार समजून घेता येईल.
- सामाजिक समूहाचा अर्थ आणि वैशिष्ट्ये समजून घेता येतील.
- समाजाचा अर्थ आणि वैशिष्ट्ये समजून घेता येतील.

## २.१ प्रस्तावना (Introduction) :

समाजशास्त्र हा मानवी समाजाचा, त्याच्या संरचनेचा, कार्यप्रणालीचा आणि समाजातील घटकांच्या आंतरक्रियेचा अभ्यास करणारा एक शास्त्र आहे. समाजशास्त्राच्या अभ्यासासाठी समाज, सामाजिक समूह आणि सामाजिक आंतरक्रिया या संकल्पना अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या संकल्पनांच्या माध्यमातून समाजशास्त्रज्ञ समाजाच्या विविध अंगांचे आणि घटकांचे विश्लेषण करतात. समाज, सामाजिक समूह, आणि सामाजिक आंतरक्रिया या संकल्पना समाजशास्त्राच्या अभ्यासाचा मूलभूत पाया आहेत. या संकल्पनांच्या माध्यमातून समाजशास्त्रज्ञ समाजाच्या कार्यप्रणालीचे, संरचनेचे आणि समाजातील व्यक्तींमधील संबंधांचे

विश्लेषण करतात. समाज हा एक जिवंत आणि गतिशील घटक असून, त्याच्या विविध पैलूंना उलगडण्यासाठी आणि समजून घेण्यासाठी या संकल्पनांचा अभ्यास आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर आपण समाज, सामाजिक समूह आणि सामाजिक आंतरक्रिया या संकल्पना समजून घेणार आहोत. या घटकात आपण मानवी समाजाचा अर्थ आणि वैशिष्टये, सामाजिक समुहाचा अर्थ आणि वैशिष्टये, सामाजिक आंतरक्रियेचा अर्थ, व्याख्या आणि प्रकार यांचा अभ्यास करणार आहोत.

## **२.२ विषय – विवेचन** (Presentation of Subject Matter):

समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना अभ्यासतांना या घटकात आपण तीन विभाग पाडले आहेत. पहिल्या विभागात समाजशास्त्रज्ञांनी 'सामाजिक आंतरक्रिया' या संज्ञेच्या केलेल्या व्याख्यांच्या आधारे त्या संज्ञेचा अर्थ स्पष्ट करून सामाजिक आंतरक्रियेच्या पूर्वअटी आणि स्वरूप सहकार्य, स्पर्धा, संघर्ष, समायोजन, समावेशन आणि विनिमय या सामाजिक आंतरक्रियांच्या प्रकारांची किंवा सामाजिक प्रक्रियांची चर्चा केली आहे. दुसऱ्या भागात सामाजिक समुहाच्या विविध व्याख्याच्या आधारे अर्थ आणि स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट करण्यात आले आहेत. तर तिसऱ्या भागात मानवी समाज आणि मानवी समाजाचे स्वरूप समजून घेणार आहोत. सुरुवातीला आपण सामाजिक आंतरक्रियेचा अर्थ आणि स्वरुप समजून घेऊया.

### **२.२.१ सामाजिक आंतरक्रिया अर्थ आणि प्रकार**

सामाजिक आंतरक्रिया म्हणजे व्यक्तींच्या किंवा गटांच्या परस्परसंबंधांच्या प्रक्रियेला म्हणतात. हे मानवी जीवनाचे एक मुख्य वैशिष्ट्य आहे ज्याद्वारे व्यक्ती एकमेकांशी संवाद साधतात, आपापसांत माहितीची देवाणघेवाण करतात, आणि आपल्या भावनांचा, विचारांचा, आणि कृतींचा आदान-प्रदान करतात. सामाजिक आंतरक्रिया समाजाच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे, कारण ती व्यक्ती आणि गटांमधील संबंधांना परिभाषित करते आणि समाजातील एकसंधता टिकवून ठेवते.

**अ) सामाजिक आंतरक्रिया: व्याख्या** (Social Interaction: Definitions):

सामाजिक आंतरक्रिया (Social Interaction) ही संकल्पना समाजशास्त्रात अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, कारण ती व्यक्ती आणि गटांच्या परस्पर संबंधांच्या आणि संवादाच्या प्रक्रियेचे स्पष्टीकरण देते. विविध समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक आंतरक्रियेची विविध प्रकारे व्याख्या केली आहे. विचारवंतांनी दिलेल्या काही महत्त्वपूर्ण व्याख्या खालीलप्रमाणे आहेत.

**१) मॅक्स वेबर** (Max Weber):

मॅक्स वेबर यांच्या मते, 'सामाजिक आंतरक्रिया' ही एक अशी कृती आहे, ज्यामध्ये दोन किंवा अधिक व्यक्तींचा सहभाग असतो आणि ही कृती त्या व्यक्तींच्या विचारांवर, भावनांवर किंवा वर्तनावर परिणाम करणारी असते. सामाजिक आंतरक्रियेची मुळ संकल्पना समाजात व्यक्तींनी केलेली कार्ये आणि त्या कार्यांचे सामाजिक संदर्भात असलेले अर्थ या दृष्टिकोनातून केली जाते. (Social interaction is an action

involving two or more individuals that influences their thoughts, emotions or behaviour's. The fundamental concept of social interaction is explained from the perspective of "actions performed by individuals in society and the meanings of those actions in social context."-Max Weber)

२) **चार्ल्स एच. कूले** (Charles H. Cooley):

चार्ल्स कूलेने सामाजिक आंतरक्रिया ही संकल्पना प्रतिमा (Looking-glass self) या संकल्पनेच्या आधारे स्पष्ट केली आहे. कूलेच्या मते, 'सामाजिक आंतरक्रिया' म्हणजे व्यक्तींमधील परस्पर संवाद, ज्यामध्ये प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या प्रतिक्रियेनुसार आपल्या वर्तनात बदल करतो. त्याच्या मते, समाज हा एक विचारांच्या आणि भावनांच्या प्रवाहाचा समूह आहे, जो लोकांच्या आंतरक्रियेच्या माध्यमातून सतत बदलत राहतो. (The concept of social interaction through the idea of the Looking-glass self. According to Cooley, social interaction is the mutual communication between individuals, where each person modifies their behaviour based on the reaction of the other. He believes society is a group of thoughts and emotions that constantly change through people's interactions. -Charles H. Cooley)

३) **जॉर्ज हर्बर्ट मीड** (George Herbert Mead):

जॉर्ज हर्बर्ट मीडने सामाजिक आंतरक्रियेची संकल्पना सिम्बॉलिक इंटरअक्शीअम (Symbolic Interactionism) या सिद्धांताच्या माध्यमातून मांडली आहे. त्याच्या मते, 'सामाजिक आंतरक्रिया' म्हणजे व्यक्तींमधील संवादाची प्रक्रिया, जिथे त्यांचे विचार, संकेत, प्रतीक आणि भाषा वापरून संबंध प्रस्थापित होतात. मीडच्या मते, मानवी संवाद हे मुख्यतः प्रतीकांवर आधारित असतात आणि समाजाच्या संरचनेत या आंतरक्रियेचा मोठा हातभार असतो. (George Herbert Mead conceptualized social interaction through the theory of Symbolic Interactionism. According to him, social interaction is a process of communication between individuals where relationships are established using thoughts, symbols, gestures, and language. Mead argues that human communication is primarily based on symbols and plays a significant role in shaping the structure of society.)

४. **टाल्कॉट पर्सन्स** (Talcott Parsons) :

टाल्कॉट पर्सन्सच्या मते, 'सामाजिक आंतरक्रिया' ही एक प्रणाली आहे, ज्यामध्ये समाजातील विविध घटक परस्परांशी संबंध साधतात आणि त्यांची कार्ये, भूमिका, आणि अपेक्षा यांच्या आधारे परस्परावलंबनात असतात. पर्सन्सच्या मते, आंतरक्रियेच्या माध्यमातूनच सामाजिक संरचना निर्माण होतात आणि टिकवून ठेवल्या जातात. (Social interaction is a system in which different elements of society interact with each other and are interdependent based on their functions, roles, and

expectations. Parsons believes that social structures are created and maintained through interactions. -Talcott Parsons)

५) **पिटर ब्लॉऊ** (Peter Blau):

पिटर ब्लॉऊने सामाजिक आंतरक्रिया ही संकल्पना सामाजिक देवाणघेवाण (Social Exchange Theory) च्या दृष्टिकोनातून मांडली आहे. त्याच्या मते, 'सामाजिक आंतरक्रिया' ही व्यक्तींमधील एक प्रकारची देवाणघेवाण आहे, जिथे लोक त्यांच्या संपर्कातून काही प्रतिफलाची अपेक्षा करतात. प्रत्येक आंतरक्रिया ही देणे-घेणे या तत्त्वावर आधारित असते, जिथे दोन्ही बाजूंचा फायदा होण्याची शक्यता असते. (Peter Blau explained the concept of social interaction from the viewpoint of social exchange theory. -ccording to him, social interaction is a form of exchange between individuals, where people expect certain benefits from their interactions. Each interaction is based on the principle of giving and taking, where both parties are likely to benefit)

६) **एरविंग गॉफमन** (Erving Goffman):

एर्लिंग गॉफमनने सामाजिक आंतरक्रियेचे वर्णन नाट्यशास्त्रीय दृष्टिकोनातून (Dramaturgical Perspective) केले आहे. त्याच्या मते, 'सामाजिक आंतरक्रिया' म्हणजे मानवी वर्तनाचे एक प्रकारचे नाट्य आहे, जिथे व्यक्ती आपापल्या भूमिका साकारतात आणि सामाजिक मंचावर आपली छबी आणि प्रतिष्ठा निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. गॉफमनच्या मतानुसार, व्यक्ती आपला चेहरा आणि वर्तन कसे सादर करतात, हेच सामाजिक आंतरक्रियेचे मर्म आहे. (Erving Goffman described social interaction from the Dramaturgical Perspective. According to him, social interaction is a type of human behaviour akin to theater, where individuals play their roles and try to build their image and reputation on the social stage. Goffman suggests that how people present their face and behavior is the essence of social interaction.)

७) **एंथनी गिडन्स** (Anthony Giddens):

एंथनी गिडन्सने सांगितले आहे की 'सामाजिक आंतरक्रिया' म्हणजे व्यक्तींमधील संवाद आणि परस्पर क्रियांची प्रक्रिया आहे, ज्याद्वारे समाजाची रचना आणि त्याचे नियम निर्माण आणि पुनर्निर्मित होतात. गिडन्सच्या मते, आंतरक्रिया ही समाजातील संरचना आणि एजन्सी यांच्यातील परस्पर संबंध दर्शवते. (Social interaction is the process of communication and mutual actions between individuals, through which the structure of society and its rules are created and recreated. According to Giddens, interaction reflects the interrelationship between structure and agency in society. Anthony Giddens)

**८) शेपर्ड, ओडोम आणि ब्रुटन :–**

जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती परस्परांचे वर्तन प्रभावित करतात तेव्हा सामाजिक आंतरक्रिया अस्तित्वात येते. (Social interaction exists when two or more persons mutually influence each other's behaviour - Shepard, Odom and Bruton)

**९) टिशलेर, व्हायटन आणि हंटर :–**

जेव्हा एका व्यक्तीच्या क्रियेचा (वर्तनाचा) किमान दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या क्रियेवर (वर्तनावर) प्रभाव पडतो तेव्हा आंतरक्रिया घडून येते. (When the actions of one individual affect the actions of at least one other individual, interaction... is taking place - Tischler, Whitten and Hunter)

**१०) ड्रेसलर आणि विलिस :–**

जेव्हा जेव्हा मानवी व्यक्ती इतर व्यक्तीच्या क्रियांना प्रतिक्रिया करतात तेव्हा घडून येणाऱ्या प्रक्रियेला मानवी आंतरक्रिया असे म्हणतात. (Human interaction is the process that occurs whenever human beings respond to the actions of other human beings - David Dressler and William M. Willis - Jr.)

**११) मेरिल आणि एल्डरेज :–**

ज्या दोन किंवा अधिक व्यक्तीत अर्थपूर्ण सामाजिक संपर्क प्रस्थापित होतो व त्याचा परिणाम म्हणून त्यांची वर्तने थोड्याफार प्रमाणात का होईना बदलतात. अशा सामान्य प्रक्रियेला सामाजिक आंतरक्रिया म्हणतात. (Social interaction is the general process whereby two or more persons are in meaningful contact, as a result of which their behaviours are modified however slightly - Merill and Eldridge)

**१२) ब्रूम आणि सेल्झनिक :–**

इतरांची जाणीव ठेऊन आणि इतरांच्या प्रतिक्रियांशी आपल्या प्रतिक्रिया जुळवून घेऊन वर्तन करण्याच्या प्रक्रियेला सामाजिक आंतरक्रिया असे म्हणतात. (The process of acting in awareness of others and adjusting responses to the way other respond is called social interaction - Broom and Selznick)

**१३) डॉसन आणि गेट्टीज :–**

सामाजिक आंतरक्रिया ही एक अशी प्रक्रिया आहे की ज्यामध्ये व्यक्ती एकमेकांच्या मनात शिरकाव करतात. (Social interaction is a process whereby men interpenetrate the minds of each other - Dawson and Gettys)

**१७) गिस्ट :-**

आंतर- उद्दीपन आणि प्रतिक्रियांद्वारे ज्यात व्यक्ती परस्परांवर प्रभाव पाडतात त्या क्रियेला सामाजिक आंतरक्रिया असे म्हणतात. (Social interaction is a reciprocal influence human beings exert on each other through inter-stimulation and response - Gist)

विविध विचारवंतांनी सामाजिक आंतरक्रियेची व्याख्या विविध दृष्टिकोनांमधून केली आहे. हे सर्व दृष्टिकोन सामाजिक आंतरक्रियेच्या वेगवेगळ्या पैलूंना उलगडतात आणि समाजाच्या कार्यप्रणालीचे अधिक सखोल समजण्यास मदत करतात. या व्याख्यांमधून स्पष्ट होते की सामाजिक आंतरक्रिया ही समाजाच्या कार्यशैलीतील एक अत्यंत महत्त्वाची आणि जटिल प्रक्रिया आहे.

**ब) सामाजिक आंतरक्रिया तीन पातळीवर घडून येतात** (Social interactions occur at three levels) : आंतरक्रियेच्या तीन पातळ्या खालीलप्रमाणे :

**१) व्यक्ती-व्यक्तीतील आंतरक्रिया** (Interaction between individuals) उदा. दोन मित्रातील चर्चा, पती-पत्नीतील संवाद इ.

**२) व्यक्ती व समूह यांच्यातील आंतरक्रिया** (Interaction between an individual and group): जेव्हा एक व्यक्ती आणि एक समूह हे आंतरक्रियेचे एकक असतात तेव्हा ही आंतरक्रिया घडून येते. यामध्ये एक व्यक्ती ही समूहाबरोबर आंतरक्रिया करत असते. उदा. नेत्याची सभा, शिक्षकाचे व्याख्यान इ.

**३) समूहा - समूहातील आंतरक्रिया** (Interaction between groups ) : जेव्हा आंतरक्रियेचे एकक दोन समूह असतात तेव्हा अशी आंतरक्रिया घडून येते. यामध्ये आंतरक्रिया ही दोन गटामध्ये घडून येते. उदा. क्रिकेट खेळणारे संघ, दोन देशातील संबंध इ.

सामाजिक आंतरक्रियेचे महत्त्व लक्षात घेऊन आपण या भागाचा शेवट करू या. सामाजिक आंतरक्रिया ही सामाजिक जीवनातील सर्वात मूलभूत सामाजिक घटना आहे. सामाजिक जीवन अस्तित्वात येण्यासाठी आवश्यक अशी ही एक पूर्वअट आहे. आपण सामाजिक आंतरक्रियेशिवाय 'समाज' या संकल्पनेचा विचारच करू शकत नाही. सामाजिक आंतरक्रियेद्वारेच सामाजिक संबंध विकसित होतात, ते स्थिर होतात. सामाजिक आंतरक्रियात्मक प्रक्रियांमुळेच सामाजिक समूह तयार होतात, नष्टही होतात. जेव्हा समाजातील व्यक्ती पारस्पारिक आंतरक्रिया चालू ठेवतात त्यावेळी समाज अस्तित्वात येतो. म्हणून सामाजिक आंतरक्रिया हाच समाजाचा मूलभूत पाया आहे. सामाजिक आंतरक्रियेद्वारेच व्यक्तीला तिचे सामाजिक स्वरूप (मानवी स्वभाव) प्राप्त होते. सामाजिक आंतरक्रियेद्वाराच व्यक्तीची 'स्व' संकल्पना (Self Concept) आणि तिचे व्यक्तीमत्त्व विकसित होते. सामाजिक आंतरक्रिया ह्या त्या विशिष्ट समाजातील मूल्ये, प्रमाणके व संस्कृती यांच्या संदर्भातच घडत असतात. सामाजिक आंतरक्रिया ह्या समाजजीवनाला गतीशील बनवितात. सामाजिक संरचनेचा विकास आणि त्यात बदल घडून येण्यासाठी सामाजिक आंतरक्रिया महत्त्वाची भूमिका पार पाडतात. सामाजिक जीवनाचे स्थैर्य आणि बदल या महत्त्वाच्या बाजूंचे (aspects) निर्धारण करण्याचे महत्त्वाचे कार्य सामाजिक आंतरक्रियेच्या स्वरुपाद्वारे ठरते.

**क) सामाजिक आंतरक्रियांचे प्रकार** (Types of Social Interactions):

सामाजिक आंतरक्रिया मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग आहे. ती केवळ संवादापुरती मर्यादित नसून समाजाच्या व्यवस्थापनात, एकोप्यात आणि व्यक्तींच्या सामुहिक भावनिक व सामाजिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावते. समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर आणि जॉर्ज हर्बर्ट मीड यांनी आंतरक्रियेचे महत्व अधोरेखित केले आहे, कारण याच आंतरक्रियांमुळे व्यक्तींच्या वर्तनाचे विश्लेषण करता येते आणि समाजातील गट, संस्था, आणि संरचना समजल्या जाऊ शकतात. आंतरक्रिया व्यक्तींमध्ये एकमेकांबद्दलची समज निर्माण करते आणि समाजातील नियम, मूल्ये आणि संस्कृती या माध्यमातून व्यक्तींना समाजाशी जोडून ठेवते. त्यामुळे, आंतरक्रियेशिवाय समाजाची संकल्पना अपूर्ण आहे.

सामाजिक आंतरक्रिया ही मानवी समाजात खूप महत्त्वाची भूमिका बजावते. लोक कसे संवाद साधतात, एकमेकांशी कसे वागत असतात, याचा सामाजिक संघटनांवर आणि व्यक्तींच्या जीवनावर मोठा प्रभाव असतो. व्यक्ती कशाप्रकारे विचारांचे, भावना, क्रिया आणि प्रतिसाद यांचे आदानप्रदान करतात हे आंतरक्रियेच्या प्रकारावर अवलंबून असते. समाजशास्त्राच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास, आंतरक्रियेचे दोन मुख्य प्रकार आहेत: प्रत्यक्ष आंतरक्रिया आणि अप्रत्यक्ष आंतरक्रिया.

**अ) प्रत्यक्ष आंतरक्रिया:** (Focused Interaction)

प्रत्यक्ष आंतरक्रिया म्हणजे व्यक्तींमधील थेट, समोरासमोर होणारी संवाद प्रक्रिया. या आंतरक्रियेतील व्यक्ती एकाच ठिकाणी उपस्थित राहून एकमेकांशी संवाद साधतात, विचारांची देवाणघेवाण करतात आणि तात्काळ प्रतिसाद देतात. या प्रकारच्या आंतरक्रियेत गैर-मौखिक संकेतांचा (जसे की हावभाव, चेहऱ्यावरील भाव, देहबोली) मोठ्या प्रमाणात वापर होतो, ज्यामुळे संभाषण अधिक जिवंत आणि भावनिक बनते.

**प्रत्यक्ष आंतरक्रियेची उदाहरणे**

- दोन व्यक्तींमध्ये समोरासमोर संभाषण
- गटचर्चा किंवा मीटिंग्स
- शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील वर्गातील संवाद

**प्रत्यक्ष आंतरक्रियेची वैशिष्ट्ये**

**१. तात्काळ प्रतिसाद:**

प्रत्यक्ष आंतरक्रियेतील सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तात्काळ प्रतिसाद मिळणे. जेव्हा दोन व्यक्ती समोरासमोर बोलत असतात, तेव्हा त्यांच्या विचारांची देवाणघेवाण होते. प्रत्यक्ष आंतरक्रियेत व्यक्तींना त्वरित प्रतिसाद मिळतो. संवाद करणारी व्यक्ती समोरच असल्यामुळे संभाषणातील विसंवाद किंवा चुकीच्या समजुती त्वरित दूर करता येतात. उदाहरणार्थ, जर एखादी व्यक्ती एक प्रश्न विचारते, तर समोरची व्यक्ती लगेच त्याचे उत्तर देऊ शकते.

### २. गैर-मौखिक संकेतांचा वापर:

प्रत्यक्ष आंतरक्रियेतील दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे गैर-मौखिक संकेतांचा वापर. हावभाव, चेहऱ्यावरील भाव, डोळ्यांचा संपर्क आणि हातवारे यांसारख्या संकेतांमधून व्यक्तींच्या भावनांचे आणि विचारांचे अधिक सुस्पष्ट प्रकटीकरण होते. उदाहरणार्थ, जर एखादी व्यक्ती आनंदी असेल, तर ती व्यक्ती हसते, ज्यामुळे संवाद अधिक जिवंत होतो.

### ३. भावनिक संवाद:

प्रत्यक्ष आंतरक्रिया भावनिकदृष्ट्या अधिक सखोल असते. व्यक्ती आपले विचार आणि भावना थेट एकमेकांसमोर मांडतात, त्यांच्यातील संवाद केवळ शब्दांपुरता मर्यादित नसतो, तर भावना आणि विचारांमध्येही सामायिक सहभाग असतो. ज्यामुळे त्यांच्यातील नातेसंबंध अधिक घट्ट होतात. उदाहरणार्थ, कुटुंबातील सदस्य किंवा जवळचे मित्र एकमेकांसमोर असताना त्यांच्यातील भावनिक बंध अधिक बळकट होतात.

### ४. जिवंत संपर्क

प्रत्यक्ष आंतरक्रिया जिवंत आणि नैसर्गिक असते. तात्काळ प्रतिक्रिया मिळते, संवादाचा गतीमान प्रवाह कायम राहतो आणि व्यक्तींमधील गैरसमज कमी होतात. तसेच, व्यक्ती एकमेकांना समोरासमोर पाहू शकतात, ज्यामुळे त्यांच्या संभाषणाला अधिक स्पष्टता मिळते.

### ५. व्यक्तिगत नात्यांचा विकास:

प्रत्यक्ष आंतरक्रियेतून व्यक्तींच्या वैयक्तिक नातेसंबंधांचा विकास होतो. जसे की, कार्यालयातील सहकाऱ्यांमधील संवाद किंवा मित्रपरिवारातले संबंध. अशा आंतरक्रियांमुळे परस्पर विश्वास निर्माण होतो आणि नात्यांमधील घट्टपणा वाढतो.

### ब) अप्रत्यक्ष आंतरक्रिया (Unfocused Interaction):

अप्रत्यक्ष आंतरक्रिया म्हणजे ज्या आंतरक्रियेच्या प्रक्रियेत व्यक्तींमध्ये समोरासमोर थेट संपर्क न होता तंत्रज्ञानाच्या मदतीने किंवा माध्यमांद्वारे संवाद साधला जातो. या आंतरक्रियेत तात्काळ प्रतिसादाची गरज नसते, तसेच संवाद साधण्यासाठी व्यक्ती एकाच ठिकाणी असण्याची आवश्यकता नसते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आणि इंटरनेटच्या उपलब्धतेमुळे अप्रत्यक्ष आंतरक्रियेला प्रचंड महत्त्व प्राप्त झाले आहे.अप्रत्यक्ष आंतरक्रिया ही विशेषतः त्या परिस्थितीत उपयुक्त ठरते जिथे भौगोलिक अंतरामुळे किंवा वेळेच्या मर्यादांमुळे प्रत्यक्ष संवाद शक्य नसतो. फोन, ई-मेल्स, सोशल मीडिया, चॅट ॲप्स आणि व्हिडिओ कॉलिंग सारख्या साधनांनी या प्रकारच्या आंतरक्रियेला नवी दिशा मिळाली आहे. यामुळे लोक एकमेकांशी संवाद साधण्यासाठी कुठेही आणि कधीही संपर्क साधू शकतात. या संवादाची गती आणि पद्धत प्रत्यक्ष आंतरक्रियेपेक्षा भिन्न असली तरीही, यामुळे समाजातील गतीमानता, संवादाची सोय, आणि माहितीचे वितरण अधिक प्रभावीपणे होऊ शकते.

अप्रत्यक्ष आंतरक्रियेची उदाहरणे

- ई-मेल्स आणि संदेश
- सोशल मीडिया: फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर इ.
- फोन आणि व्हिडिओ कॉल्स
- व्हर्च्युअल मीटिंग्स: झूम, गूगल मीट इ.

**अप्रत्यक्ष आंतरक्रियेची वैशिष्ट्ये**

**१. शारीरिक उपस्थितीची आवश्यकता नाही :**

अप्रत्यक्ष आंतरक्रियेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे व्यक्तींमध्ये तात्काळ समोरासमोर उपस्थित राहण्याची गरज नसते. हे तंत्रज्ञानाच्या सहाय्याने, भौगोलिक अंतराच्या मर्यादांशिवाय घडते. उदाहरणार्थ, एक व्यक्ती भारतात असू शकतो आणि दुसरी व्यक्ती अमेरिकेत. ते एकमेकांशी ई-मेल, फोन कॉल्स, किंवा सोशल मीडियाद्वारे संवाद साधू शकतात.

२. **वेळेची लवचिकता:**

अप्रत्यक्ष आंतरक्रियेत त्वरित प्रतिसादाची गरज नसते. व्यक्ती संवाद साधण्यासाठी वेळ घेऊ शकते, आणि प्राप्त झालेल्या संदेशाचा उत्तर वेळेप्रमाणे देऊ शकते. यामध्ये एक प्रकारचा विलंब असतो जो प्रत्यक्ष आंतरक्रियेत नसतो. उदाहरणार्थ, ई-मेल किंवा टेक्स्ट मेसेजेसमध्ये व्यक्तीने दिलेले उत्तर त्वरित मिळेलच असे नाही.

३. **तांत्रिक साधनांचा वापर:**

अप्रत्यक्ष आंतरक्रियेत संवाद साधण्यासाठी तांत्रिक साधने मोठ्या प्रमाणावर वापरली जातात. फोन, संगणक, इंटरनेट, स्मार्टफोन, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स अशा विविध माध्यमांचा वापर करून व्यक्ती एकमेकांशी संवाद साधतात. हे तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे शक्य झाले आहे, ज्यामुळे जागतिक स्तरावर संवाद करणे खूप सोपे आणि जलद झाले आहे.

४. **अंतर आणि वेळेची मर्यादा नसणे:**

अप्रत्यक्ष आंतरक्रियेमध्ये व्यक्ती भिन्न स्थळांवर असू शकतात, तरीही संवाद साधता येतो. यामुळे वेळ आणि स्थळाच्या मर्यादांशिवाय लोक एकमेकांशी संपर्क साधू शकतात. उदाहरणार्थ, एखादी व्यक्ती रात्री उशिरा ई-मेल पाठवते, आणि समोरची व्यक्ती दुसऱ्या दिवशी सकाळी त्याला उत्तर देऊ शकते. या प्रक्रियेमध्ये वेळेची काहीशी मुभा असते.

**५. डिजिटल साक्षरतेची आवश्यकता:**

अप्रत्यक्ष आंतरक्रियेच्या यशस्वीतेसाठी डिजिटल साक्षरता आवश्यक आहे. व्यक्तींना तांत्रिक साधनांचा वापर करणे आणि त्यामधील संवाद साधण्याची प्रक्रिया समजणे अत्यावश्यक असते. जेव्हा लोक डिजिटल प्लॅटफॉर्म्सवर संवाद साधतात, तेव्हा त्यांना त्यासंदर्भातील आवश्यक कौशल्ये असणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, ई-मेल लिहिणे, टेक्स्ट मेसेज पाठवणे, सोशल मीडियावर पोस्ट करणे इ.

थोडक्यात, सामाजिक आंतरक्रिया हा समाज व्यवस्थेचा पाया आहे. सामूहिक जीवन हे सामाजिक आंतरक्रियेशिवाय अस्तित्वात येवूच शकत नाही. सामाजिक आंतरक्रियांमुळेच समाजाचे स्वरूप गतिशील बनते. सामाजिक आंतरक्रिया ह्या वेगवेगळ्या रीतीने / प्रकारात समाजात घडून येत असतात. सामाजिक आंतरक्रिया प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असतात. प्रत्यक्ष आंतरक्रिया जिथे तात्काळ संपर्क आणि गैर-मौखिक संकेत महत्त्वाचे असतात, तिथे अप्रत्यक्ष आंतरक्रिया तांत्रिक साधनांवर अवलंबून असते आणि त्यात तात्काळ प्रतिसादाची गरज नसते.

**२.२.२ सामाजिक समूह: व्याख्या आणि वैशिष्ट्ये** (Social Group: definition  characteristics):

सामाजिक समूह म्हणजे व्यक्तींचा एक असा संघ आहे. जिथे सदस्य एकमेकांशी परस्पर संवाद साधतात आणि एकत्र येऊन सामूहिक ध्येय साध्य करतात. समाजातील व्यक्ती एकमेकांशी संवाद साधून, एकत्र काम करून, किंवा सामायिक हितासाठी एकत्र येऊन समूह निर्माण करतात. सामाजिक समूह हे मानवी समाजाचे अत्यावश्यक घटक आहेत, कारण त्यांच्याद्वारेच व्यक्तींच्या गरजा पूर्ण होतात आणि समाजातील रचना टिकून राहते.

**अ) सामाजिक समूहाचा अर्थ** (Meaning of Social Group)

सामाजिक समूह म्हणजे दोन किंवा अधिक व्यक्तींचा एकत्रित संघ आहे. जो विशिष्ट उद्देश किंवा हित साध्य करण्यासाठी एकत्र येतो. समूहाच्या प्रत्येक सदस्याचा आपापसात काही ना काही संबंध असतो, आणि त्यांच्यात सहकार्य, संवाद, आणि परस्परावलंबित्व असते. समूहाचा उद्देश विविध असू शकतो, जसे की सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, व्यावसायिक इ. समूहातील प्रत्येक सदस्याचे योगदान समूहाच्या यशस्वीतेसाठी महत्त्वाचे असते. सामाजिक समूह या संकल्पनेच्या व्याख्या विविध पद्धतीने वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञांनी स्पष्ट केल्या आहेत. त्यापैकी काही नामवंत समाजशास्त्रज्ञांच्या व्याख्या खाली दिलेल्या आहेत व अशा व्याख्यांच्या आधारे प्रथम आपण 'सामाजिक समूह' या संकल्पनेचा व्याख्या जाणून घेऊ या.

**१) मॅक आयव्हर आणि पेज:** सामाजिक समूह म्हणजे व्यक्तींचा असा समुदाय जो परस्पर क्रिया आणि सामायिक नाते या दोन घटकांमुळे एकत्रित येतो. (A social group is a community of individuals that comes together through two factors, interaction and shared relationships.) - Mac Ivor and Page

**२) ए. डब्ल्यू. ग्रीन:** सामाजिक समूह हा असा व्यक्तींचा संघ आहे जिथे प्रत्येक सदस्याला एकमेकांशी थेट किंवा अप्रत्यक्ष संबंध असतो. (A social group is a group of individuals where each member has a direct or indirect relationship with each other.) - A. W. Green

**३) जॉर्ज हर्बर्ट मीड:** सामाजिक समूह म्हणजे असा समाज, जिथे व्यक्ती एकत्र येऊन सामाजिक संबंध प्रस्थापित करतात आणि सामायिक हित साध्य करण्यासाठी काम करतात. (A social group is a society where individuals come together to form social relations and work to achieve a common interest.) - George Herbert Mead

**४) हॅरी जॉन्सन :** सामाजिक आंतरक्रियेची व्यवस्था म्हणजे सामाजिक समूह होय. (A social group is a system of social interaction) - Harry Johnson.

**५) हॉर्टन व हंट :** सदस्यत्वाची व आंतरक्रियांची जाणीव असणारे कितीही लोक म्हणजे सामाजिक समूह होय. (Any number of persons who share a consciousness of membership and of interaction) - Horton and Hunt.

**६) मार्शल जोन्स :** दोन किंवा त्यापेक्षा अधिक अशा व्यक्तींच्यामध्ये स्थापित झालेल्या आंतरक्रियेची व्यवस्था म्हणजे सामाजिक समूह होय. (A social group is two or more persons between whom there is an established pattern of interaction) - Marshall Jones.

**७) किंबाल यंग :** दोन किंवा दोहोपेक्षा अधिक व्यक्तींच्या मधील आंतरक्रियेने समूह निर्माण होतो. (Two or more persons in interaction constitute a group)- Kimball Young.

**८) एलि चिनॉय:** परस्पर संबंधित भूमिका आणि दर्जाच्या संचावर ज्यांच्यामधील संबंध अवलंबून असतात अशा व्यक्तींचा समावेश सामाजिक समूहात होतो. (A social group consists of number of persons whose relationships are based upon a set of interrelated roles and statuses) - Ely Chinoy.

**९) ऑगबर्न व निमकॉफ:** जेंव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्र येतात आणि एकमेकांवर प्रभाव पाडतात तेंव्हा समूह निर्माण होतो. (Whenever two or more individuals come together and influence one another they may be said to constitute a social group) - Ogburn and Nimkoff.

**१०) डेव्हीड ड्रेसलर:** परस्पर आंतरक्रियांचा परिणाम म्हणून आपण सर्वजण संबंधित आहोत अशा प्रकारची भावना जेंव्हा अनेक व्यक्तींच्यामध्ये निर्माण होते तेंव्हा समूह अस्तित्त्वात येतो. (A group exists when a sense of relatedness is shared by a number of individuals as a consequence of their interacting or having interacted with one another) - Devid Dressler.

**११) बोगार्डस इ. ए.:** दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्तींचा समजला जाणारा असा समूह की, ज्यामधील व्यक्तींचे समाज उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित झालेले असते, जे परस्परांना प्रेरणा देतात आणि ज्यांच्यामध्ये सामूहिक स्वरुपाची निष्ठा असून कधी एकाच प्रकारच्या कृतीत सहभागी झालेल्या असतात. त्याला सामाजिक समूह असे म्हटले जाते. (A social group may be thought of as a number of persons, two or more, who have some common objects of attention, who are stimulating to each other, who have common loyalty and participate in similar activities)- Bogardus E. A.

**१२) टिशेलर, व्हायटन व इंटर :** आपण एक विभिन्न सामाजिक एकक असण्याची जाणीव असणाऱ्या व समाज संघटनांच्या एखाद्या प्रतिमानानुसार वारंवार आंतरक्रिया करणाऱ्या दोन किंवा अधिक व्यक्तींचा सामाजिक समूहात समावेश होतो. (Social group consists of two or more individuals who interact recurrently according to some pattern of social organization and who recognize that they constitute a distinct social unit) - Tischler, Whitten and Hunter.

जर आपण सामाजिक समूहाच्या संदर्भातील वरील विविध महत्त्वपूर्ण व्याख्यांचे काळजीपूर्वक वाचन केले तर आपणास असे दिसून येईल की, वरील व्याख्यांमधून सामाजिक समूह या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करणारे खालील मुद्दे असे आहेत.

१) सामाजिक समूह अस्तीत्त्वात येण्यासाठी किमान दोन व्यक्तींची आवश्यकता असते.

२) एखाद्या विशिष्ट समूहामध्ये कितीही व्यक्ती असू शकतात.

३) व्यक्तींच्यामध्ये परस्पर आंतरक्रिया घडून येणे आवश्यक.

४) समूहातील व्यक्तींना आंतरक्रियांची जाणीव असावी लागते.

५) आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्तींना, आंतरक्रिया या अर्थपूर्ण आहेत असे त्यांना वाटावे लागते.

६) एका समूहाचे सदस्य म्हणून आंतरक्रियेत समाविष्ट असणाऱ्या व्यक्तींना त्यांच्याबद्दल आणि इतरांच्याबद्दल जाणीव असणे गरजेचे आहे.

७) समूहामध्ये प्रत्येक व्यक्तीला विशिष्ट पद (दर्जा आणि भूमिका) असले पाहिजे. सामान्यता: कोणत्याही समूहातील सर्व पदे, स्थाने व भूमिका परस्पर संबंधित असून व्यक्तीचे वर्तन भूमिकांना अनुसरून होत असते.

८) समूहातील सदस्यांनी तसेच समूहाची स्वतःची काही उद्दिष्टे किंवा हेतू असतात आणि समूहाचे सदस्य एकमेकांच्या सहकार्याने ती उद्दिष्टे पार पाडीत असतात.

९) समूहातील सर्व प्रकारची पदे परस्पर संबंधित असतात की ज्यामुळे समूहाची निश्चित अशी रचना तयार होत असते.

**ब) सामाजिक समूहाची वैशिष्ट्ये** (Characteristics of Social Group)

सामाजिक समूह अनेक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यांनी युक्त असतो. 'सामाजिक समूह' या संकल्पनेचे भिन्न भिन्न अर्थ आणि नामवंत समाजशस्त्रज्ञांनी सांगितलेल्या सामाजिक समूहाच्या विविध व्याख्यांच्या आधारे सामाजिक समूहांची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आढळून येतात.

१) **किमान दोन किंवा अधिक सदस्य** (Minimum two or more Member)

सामाजिक समूह तयार होण्यासाठी किमान दोन व्यक्तींची आवश्यकता असते. दोन किंवा अधिक व्यक्ती जेव्हा एकत्र येऊन सामायिक उद्देशासाठी काम करतात, तेव्हा सामाजिक समूह तयार होतो. एक व्यक्ती हा कधीच समूह असू शकत नाही. दोन व्यक्तींचा समूह हा लहानात लहान सामाजिक समूह होय, अशा समूहाना विल्यम सम्नर यांनी 'Dyad' असे संबोधिले तर तीन व्यक्तींच्या समूहाला त्रिकूट (Triad) असे म्हटले सम्नरच्या मते, जस जशी समूहातील सदस्य संख्या वाढत जाते. तसतशी समूह रचनेतील गुंतागुंत देखील वाढत जाते. समूहामध्ये सदस्यांची संख्या कितीही असू शकते. कुटूंब अथवा दोन जिवलग मित्र हे लहान समूहाचे जसे उदाहरण देता येते त्याचप्रमाणे शहर, महानगर, अथवा राष्ट्र यांना देखील समूह म्हणता येईल.

२) **परस्पर संवाद** (Interaction):

सामाजिक समूहाच्या सदस्यांमध्ये परस्पर संवाद आवश्यक आहे. व्यक्तींमध्ये विचारांची देवाणघेवाण, भावना व्यक्त करणे, आणि एकत्र काम करण्यासाठी संवाद साधला जातो. परस्पर संवादामुळेच समूह एकत्र राहतो आणि आपले उद्दिष्ट साध्य करतो. संवादाच्या अभावी समाजातील संबंध तोडले जाऊ शकतात.

थोडक्यात केवळ व्यक्ती एकत्रित आल्या म्हणून समूह निर्माण होत नाही तर त्यांच्यामध्ये परस्पर आंतरक्रिया झाल्याच पाहिजेत. उदा.- बसस्टॉपवर बसची वाट पहात असणाऱ्या प्रवाशांच्या केवळ तेथील उपस्थितीमुळे सामाजिक समूहाची निर्मिती होत नाही. जर बसस्टॉपवरील प्रवाशी बस उशिरा येण्यासंबंधीच्या संभाव्य कारणासंबंधी परस्पराशी चर्चा करत असतील तर त्याठिकाणी समूह आकारास येतो. त्यांच्यामध्ये परस्पराविषयी जाणीव निर्माण झाल्यानेच त्यांच्यात आंतरक्रिया घडून येत असते. यातूनच समूहाची निर्मिती होते. सदस्यांमधील सामाजिक आंतरक्रिया आणि परस्पराविषयची जाणीव समूह निर्मितीसाठी आवश्यक अट समजली जाते.

३) **सदस्यामधील सापेक्षतः टिकाऊ संपर्क:** (Relatively permanent contact among the members)

सदस्यांमधील संबंध हे केवळ प्रासंगिक स्वरुपाचे अथवा तात्पुरत्या स्वरुपाचे असतील तरच तो खऱ्या अर्थाने सामाजिक समूह म्हणता येणार नाही. उदा.- प्रवास करतेवेळी सोबत असणाऱ्या इतर प्रवाशांच्यामुळे जो समूह निर्माण होतो तो तात्पुरत्या स्वरुपाचा समूह असतो. ज्यावेळी प्रवाशी अपापल्या गांवी जाण्यासाठी त्यांच्या स्टेशनवर उतरतात तेंव्हा त्यांचा समूह नाहीसा होतो. असे तात्पुरते संबंध समूहाच्या स्थैर्याच्या दृष्टीने

निरुपयोगी ठरतात. अर्थात समूहातील सदस्यांत कायमचे भौतिक सानिध्य असावेत असे नाही पण कोणत्या ना कोणत्या स्वरुपात अशा संपर्कामुळे समान हेतू साध्य करता येतात. सापेक्षतः टिकाऊ संपर्क मात्र हवा. त्यामुळे टिकाऊ संपर्क हे एक सामाजिक समूहाचे वैशिष्ट्य आहे.

**४) सामान्य हेतू आणि समान उद्दिष्टे :** (Common Purpose and Goals)

सामाजिक समूहातील सदस्यांचे उद्दिष्टे समान असतात. समूहातील प्रत्येक व्यक्ती समूहाच्या उद्दिष्टांना साध्य करण्यासाठी योगदान देतो. उदाहरणार्थ, एखाद्या शैक्षणिक गटाचा उद्देश अभ्यासाची देवाणघेवाण करणे आणि शैक्षणिक प्रगती साधणे असू शकते. अशाप्रकारे, प्रत्येक समूहाचे काही ना काही उद्दिष्ट असते

थोडक्यात असे समान हेतू, ध्येय अथवा उद्दिष्ट साध्य करण्यासाठीच समूहाची स्थापना केली जाते. उदा. कामगारांनी त्यांच्या न्याय मागण्यांच्या पूर्ततेसाठी आणि स्वत:च्या संरक्षणासाठी म्हणून कामगार संघटनेची स्थापना केलेली असते. त्याचप्रमाणे राजकीय समूह, धार्मिक समूह, शैक्षणिक व आर्थिक समूह हे आपल्या समूहातील सदस्यांच्या विविध गरजांची पूर्तता करण्यासाठीच निर्माण झालेले असतात. समान उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठीच व्यक्ती एकत्र येतात, त्यांच्यात आंतरक्रिया घडून येते आणि त्यातूनच सामाजिक समूहाची निर्मिती होते. समूह अस्तीत्त्वात राहण्यासाठी समूहाच्या उद्दिष्टांबाबत अशा समूहाच्या सर्व सदस्यांमध्ये किमान मतैक्य असणे आवश्यक असते.

**५. समूहाची एकात्मता:** (Group Solidarity)

सामाजिक समूहात एकत्रता किंवा एकोप्याची भावना असते. सदस्यांमध्ये एकमेकांविषयी विश्वास आणि निष्ठा असते, ज्यामुळे समूह टिकून राहतो. सामाजिक एकत्रता समूहाला यश मिळवण्यासाठी अत्यावश्यक असते, कारण त्यातूनच सहकार्याची भावना वाढीस लागते. सामान्यतः समूहातील सदस्यांच्यामध्ये आपलेपणाची भावना किंवा समूहाबद्दलची तीव्र आपुलकी असते, समूहातील सदस्यांची आपलेपणाची प्रवृत्ती त्या समूहाशी निगडीत असते. अशा स्वरुपाची समूह भावना अथवा आपलेपणाची वृत्ती समूहाची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी मदत करणे. त्यामधून समूहातील ऐक्य किंवा ऐक्य भावना दिसून येते. समूहामध्ये असणारे ऐक्य आणि ऐक्यभावनेचे स्वरुप यावरून समूहाची स्थिरता व सातत्य निश्चित होत असते.

**६. समूहाची रचना** (Structure of Social group):

प्रत्येक सामाजिक समूहाची एक विशिष्ट रचना असते व अशी संरचना त्या समूहामध्ये असणाऱ्या विविध परस्पर संबंधित अशा सामाजिक पदांनी (दर्जा व भूमिका) मिळून तयार झालेली असते. याचा अर्थ समूहातील प्रत्येक व्यक्तीला समूहात निश्चित असे स्थान असते. त्या स्थानानुरुप किंवा दर्जानुरूप व्यक्तीला आपल्या भूमिका वठवाव्या लागतात. उदाहरणार्थ, गटामध्ये नेता असू शकतो, जो समूहाचे नेतृत्व करतो आणि त्याच्या कार्यांना दिशा देतो. समूहातील इतर सदस्यांनी त्या भूमिकांचे पालन करणे अपेक्षित असते.

७. **समूहाचे नियम आणि मूल्ये** (Group Norms and Values):

प्रत्येक समूहात काही विशिष्ट नियम, मूल्ये आणि आचारसंहिता असते, जी त्या समूहातील सदस्यांनी पाळणे आवश्यक असते. समूहाचे नियम त्यांच्या ध्येयांना अनुसरून ठरवले जातात. जसे की, शाळेतील विद्यार्थ्यांच्या गटात अभ्यासाच्या वेळा आणि अभ्यासाच्या पद्धतींवर आधारित काही नियम असू शकतात. या नियमांचे पालन केल्याने समूह शिस्तबद्ध राहतो.

**क) सामाजिक समूहांचे प्रकार** (Types of Social Groups)

सामाजिक समूह विविध प्रकारचे असू शकतात. त्यांना त्यांच्या उद्दिष्टांनुसार, रचनेनुसार आणि सदस्यांच्या संबंधांनुसार वर्गीकृत करता येते. सामाजिक समूहांचे प्रमुख प्रकार खालीलप्रमाणे.

१) **प्राथमिक समूह** (Primary Group):

प्राथमिक समूह हे लहान आणि व्यक्तिगत संबंधांवर आधारित असतात. यामध्ये सदस्यांमध्ये घनिष्ठ नाते आणि विश्वास असतो. कुटुंब हे प्राथमिक समूहाचे सर्वोत्तम उदाहरण आहे. यामध्ये सदस्य एकमेकांशी भावनिक संबंध ठेवतात आणि त्यांच्यामध्ये परस्पर विश्वास असतो.

२) **दुय्यम समूह** (Secondary Group):

दुय्यम समूह हे मोठ्या आणि औपचारिक स्वरूपाचे असतात. यामध्ये सदस्यांमध्ये तितकेसे घनिष्ठ संबंध नसतात, पण त्यांचा उद्देश ठरलेला असतो. व्यावसायिक संस्था किंवा शाळा हे गौण समूहाचे उदाहरण आहे, जिथे सदस्यांचे संबंध औपचारिक असतात.

३) **औपचारिक समूह** (Formal Group):

औपचारिक समूह म्हणजे जिथे काही ठराविक नियम आणि कायदे लागू असतात. या समूहांमध्ये सदस्यांना त्यांची भूमिका ठरवलेली असते आणि त्यांना त्यानुसार काम करावे लागते. उदा. एखादी कंपनी किंवा सरकारी संस्था.

४) **अनौपचारिक समूह** (Informal Group):

अनौपचारिक समूह हे समूहांच्या औपचारिक नियमांशी बंधनकारक नसतात. येथे सदस्य आपापसात गैरऔपचारिक संबंध ठेवतात आणि सहकार्य करतात. मित्रांचा गट हे अनौपचारिक समूहाचे उदाहरण आहे.

५) **संदर्भ समूह** (Reference Group):

संदर्भ समूह हा असा समूह आहे, ज्यामध्ये व्यक्ती त्या समूहाशी स्वतःची तुलना करतात आणि त्या समूहाचे मूल्य, आदर्श किंवा आचारसंहिता अनुसरण करण्याचा प्रयत्न करतात. उदाहरणार्थ, एखादा विद्यार्थी आपल्या वरिष्ठांचा आदर्श घेऊन त्यांचे अनुसरण करतो.

### २.२.३ समाजः व्याख्या आणि वैशिष्ट्ये :

समाजशास्त्रात मानवी समाजाचे अध्ययन केले जाते. त्यामुळे 'समाज' ही समाजशास्त्रातील एक अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. आपल्या दैनंदिन व्यवहारात 'समाज' हा शब्द नेहमीच वापरला जातो. उदा. . हिंदू समाज, बौध्द समाज, भारतीय समाज, अमेरिकन समाज, महिला समाज इत्यादी. व्यवहारात 'समाज; हा शब्द एका विशिष्ट अर्थाने उपयोगात आणल्या जात नाही. तर वेगवेगळ्या अर्थाने वापरल्या जातो. हिंदू समाज किंवा बौध्द समाज म्हटल्यानंतर येथे समाज हा शब्द धर्मवाचक, तर भारतीय किंवा अमेरिकन समाज असा शब्दप्रयोग केल्यानंतर समाज हा शब्द देशवाचक होतो. आणि महिला समाज म्हणजे केवळ महिलांचा गट येथे समाज हा शब्द लिंगवाचक या अर्थाने वापरला जातो. अशाप्रकारे, 'समाज' हा शब्द विविध अर्थाने आपण दैनंदिन जीवनात वापरतो. परंतु समाजशास्त्रात या संकल्पनेचा एक विशिष्ट अर्थ आहे.

समाजामध्ये अनेक लोक असतात. परंतु या लोकांच्या समुच्चयाला समाज म्हटल्या जात नाही. तर मानवा-मानवामधील संबंधांची व्यवस्था म्हणजे समाज होय. याचाच अर्थ समाजामध्ये मानवी किंवा सामाजिक संबंध महत्त्वाचे असतात.

**अ) मानवी समाजाचा अर्थ** (Meaning of Society) :

'समाज' हा शब्द लॅटिन शब्द Socius वरून आला आहे, ज्याचा अर्थ आहे साथी किंवा मित्र. समाज म्हणजे अनेक व्यक्तींचा असा समुदाय ज्यामध्ये परस्पर संवाद, नाते, मूल्ये, आणि सामाजिक संबंध असतात. समाज हा लोकांच्या गटांचा एक व्यापक समूह आहे, ज्यामध्ये समान संस्कृती, परंपरा, आणि शिस्त असते. समाज म्हणजे एक अशी संरचना आहे जी व्यक्तींच्या परस्पर संवादी जीवनशैलीचे आयोजन करते. लोक एकमेकांशी परस्पर संवाद साधतात, नातेसंबंध निर्माण करतात, आणि एकत्र येऊन एक समाज घडवतात.समाज व्यक्तींच्या वैयक्तिक गरजा पूर्ण करण्यासाठी तसेच त्यांच्या संरक्षणासाठी आवश्यक असतो. व्यक्ती स्वतंत्रपणे राहू शकत नाही, त्यामुळे समूहाच्या स्वरूपात राहण्याची गरज आहे, जेणेकरून परस्परावलंबन वाढेल आणि समाजाचे कल्याण साधले जाईल. समाजाची संकल्पना विविध विचारवंतांनी विविध प्रकारे मांडली आहे. समाजाच्या विविध विचारवंतांनी केलेल्या महत्त्वपूर्ण व्याख्या दिल्या आहेत.

**ब) 'समाज' या संकल्पनेच्या व्याख्या** ('Society' : Definitions) :

**१) ऑगस्ट कॉम्त** (Auguste Comte): समाज म्हणजे एक जटिल संरचना आहे, ज्यामध्ये व्यक्ती आणि संस्था परस्परसंवादी असतात आणि त्यांची क्रिया विशिष्ट नियमांद्वारे शासित असते. (Society is a complex structure where individuals and institutions interact and their actions are governed by specific rules.- Auguste Comte)

**२) मॅकायव्हर** (Maclver): समाज म्हणजे सामाजिक संबंधाचे जाळे होय (Society is a web of social relationshisps. - Maclver)

**३) हर्बर्ट स्पेन्सर** (Herbert Spencer): समाज हा एक सजीव शरीर आहे, ज्यामध्ये प्रत्येक घटकाचे विशिष्ट कार्य असते, आणि या कार्यांमधून समाज संतुलित राहतो. (Society is like a living organism

where each component has a specific function, and these functions keep the society balanced. - Herbert Spencer)

**४) ड्रेसलर आणि विलिस** (Dressler and Willis): समाज म्हणजे समान संस्कृती असणाऱ्या आणि आपण सर्वजण एक आहोत असे मानणाऱ्या व्यक्तींचा समूह होय. (A Society is a group of people who share a culture and think of themselves as united. - Dressler and Willis)

**५) मॉरिस गिन्सबर्ग** (Morris Ginsborg): इतरांपेक्षा वेगळ्या असलेल्या निश्चित स्वरुपाच्या संबंधानी किंवा वर्तन प्रकारानी एकात्म झालेला व्यक्तींचा समुच्चय म्हणजे समाज होय. (A Society is a collection of individuals united by certain relations or mode of behaiour which mark them off from others who do not enter those relations or who differ from them in behaviour- Morris Ginsborg)

**६) एमिल दुर्खीम** (Emile Durkheim): समाज हा एक नैतिक समुदाय आहे, जो व्यक्तींमध्ये एकात्मता आणि सामंजस्य निर्माण करतो. (Society is a moral community that fosters solidarity and harmony among individuals.- Emile Durkheim)

**७) टिशलर, व्हायटन, आणि हंटर** (Tischler, Whitten and Hunter): समाज म्हणजे व्यापक व सर्वसमावेशक अशी प्रत्यक्षात अस्तित्वात असणारी एक सामाजिक व्यवस्था होय. समाजात बहुतांशी सदस्यांची भरती करण्याची अंतर्गत व्यवस्था असते, ती पिढ्यान् पिढ्या टिकून राहते. समाजाला स्वत:ची सर्व सदस्यांसाठी समान अशी संस्कृती आणि विशिष्ट भूप्रदेश असतो. (Society is the largest and most inclusive social system that exists. A society recruits most of its members from within, sustains itself across generations, shares a culture and occupies a territory. - Tischler, Whitten and Hunter)

**७) मॅक्स वेबर** (Max Weber) समाज हा व्यक्तींच्या सामाजिक कृतींवर आधारित आहे, ज्याद्वारे सामाजिक रचना निर्माण होते. (Society is based on individuals' social actions, through which social structures are created.- Max Weber)

**८) टाल्कॉट पार्सन्स** (Talcott Parsons): समाज हा एक कार्यशील प्रणाली आहे, ज्यामध्ये विविध घटक एकत्र काम करतात आणि समाजाचे कार्य सुनिश्चित करतात. (Society is a functional system where different components work together to ensure the functioning of the society.- Talcott Parsons)

**९) जॉर्ज हर्बर्ट मीड** (George Herbert Mead): समाज व्यक्तींच्या परस्पर संवादातून निर्माण होतो, ज्यामुळे नातेसंबंध आणि सामाजिक बांधणी होते. (Society is created through the interactions of individuals, leading to relationships and social structures.- George Herbert Mead)

**१०) रॉबर्ट किंग मर्टन** (Robert K. Merton) समाजातील प्रत्येक घटकाचे काही विशिष्ट कार्य असते, जे समाजाच्या स्थिरतेसाठी उपयुक्त असते. काही घटक अप्रत्यक्षपणे नकारात्मक परिणाम देखील

घडवू शकतात. (Each component of society has a specific function that contributes to social stability, though some may inadvertently produce negative consequences.- Robert K. Merton)

**११) डब्ल्यु. जी. सम्नेर** (W. G. Sumner): समाज म्हणजे मानवाचा असा समूह की जो सहकारी प्रयत्नांद्वारे उपजीविकेची साधने मिळवितो आणि मानव जातीचे अस्तित्व टिकवितो. (Society is a group of human beings living in co-operative efforts to win subsistence and perpetuate the species - W. G. Sumner)

**१२) थिओडोर कॅपलो** (Theodore Caplow): समाज म्हणजे सर्व वयोगटातील स्त्री-पुरुषांचा समावेश असणारी स्वयंपूर्ण आणि स्वयंसातत्यशील अशी सामाजिक व्यवस्था होय. (A Society is a self safficient, self-perpetuating social system that includes persons of both sexes and all ages.. Theodore Caplow)

विविध विचारवंतांनी समाजाच्या संकल्पनेला वेगवेगळ्या दृष्टिकोनातून परिभाषित केले आहे. काही विचारवंतांनी समाजाच्या नैतिक, आर्थिक, आणि संवादात्मक बाजूंवर जोर दिला आहे, तर काहींनी कार्यात्मकता आणि संघर्षाच्या दृष्टीकोनातून समाजाचे विश्लेषण केले आहे. हे सर्व विचार समाजशास्त्राच्या अभ्यासासाठी महत्त्वाचे आहेत आणि त्यातून समाजाच्या विविध पैलूंवर सखोल समज मिळते.

**क) मानवी समाजाची वैशिष्ट्ये** (Characteristics of Human Society)

समाज या संज्ञेचा अर्थ आणि व्याख्या समजून घेतल्यानंतर आता आपण मानवी समाजाची काही महत्त्वाची वैशिष्ट्ये पाहूया.

**१. निश्चित भूप्रदेश** (Definite Territory) : निश्चित भूप्रदेश हे मानवी समाजाचे वैशिष्ट्ये आहे. व्यक्ती-व्यक्तीमध्ये आंतरक्रिया सतत सुरू असतात. या आंतरक्रियेतून निर्माण होणारे सामाजिक संबंध स्थिर स्वरूपाचे बनतात. प्रत्येक समाजातील सदस्यांचे एका निश्चित भूभागावर वास्तव्य असते. म्हणूनच समाज हा प्रादेशिक असतो, असे देखील म्हटले जाते. काही भटके समाज ज्या मोठ्या प्रदेशात फिरत असतात. त्या प्रदेशालाच ते आपला प्रदेश मानतात. भूभागाच्या मर्यादा इतिहासाच्या आधारे राजकीय संस्थेने ठरविलेल्या असतात. विशिष्ट भूप्रदेशामध्ये राहणाऱ्या व्यक्ती-व्यक्तींमध्ये स्थिर, स्थायी आणि सातत्यपूर्ण सामाजिक संबंध निर्माण होतात. म्हणूनच निश्चित भूभाग हे समाजाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. भूभाग प्रत्येक समाजाचे बाह्य वातावरण होय. विशेष म्हणजे समाजाच्या संस्कृतीच्या जडण-घडणीमध्ये या वातावरणाचा महत्त्वाचा वाटा असतो. प्रत्येक समाज हा त्या भूभागाच्या नावावरून ओळखल्या जातो उदा. भारतीय समाज, शहरी समाज, ग्रामीण समाज, इ.

**२) सामाजिक संबंधांचे जाळे** (Web of social relationship): समाज हा सामाजिक संबंधाचे जाळे आहे. कारण समाज हा आंतरक्रिया करणाऱ्या व्यक्तींचा आणि समूहांचा बनलेला असतो. समाज हा

व्यक्तींच्या आंतरक्रियांशिवाय अस्तित्वात येवू शकत नाही. अशा प्रकारच्या सामाजिक आंतरक्रिया आधीपासूनच अस्तित्वात असणाऱ्या वर्तनविषयक नियमने (सामाजिक प्रमाणके) आणि काही वर्तनविषयक सर्वसामान्य स्वरूपाचे आदर्श (मूल्ये) यानुसार घडतात. आंतरक्रियांमुळेच व्यक्ती आणि समूहात सामाजिक संबंध प्रस्थापित होतात, टिकून राहतात किंवा बदलतात. समाज हा अशाच सामाजिक संबंधाच्या जाळ्याचा बनलेला असतो. म्हणजेच व्यक्ती आणि समूहातील परस्परसंबंध सुटे सुटे नसतात. तर त्या संबंधांची एक व्यवस्था तयार झालेली असते. ज्याप्रमाणे एकमेकांत गुंफण झालेल्या उभ्या आणि आडव्या धाग्यांमुळे कापड बनते तसेच समाज सुद्धा एकमेकांत गुंतलेल्या सामाजिक संबंधातून तयार झालेल्या जाळ्याप्रमाणेच असतो.

**३) सर्वसमावेशक संस्कृती** (Comprehensive Culture) : संस्कृती म्हणजे मानवाची जीवन जगण्याची पद्धत होय. संस्कृती ही मानव निर्मित असून समाजाचा एक सदस्य या नात्याने व्यक्ती ज्ञान, कला, प्रथा, इत्यादी संपादित करीत असतो. अशा या संस्कृतीची निर्मिती ही एका मानवाची निर्मिती नाही तर समाज हाच आपल्या संस्कृतीची निर्मिती करतो. संस्कृती समाजातील व्यक्तींच्या गरजा पूर्ण करते. म्हणूनच संस्कृती ही व्यापक आणि सर्वसमावेशक असते. एका समाजाची संस्कृती ही दुसऱ्या समाजाच्या संस्कृतीपेक्षा वेगळी असते. त्यामुळेच एक समाज दुसऱ्या समाजापेक्षा भिन्न असतो. प्रत्येक समाजाच्या प्रथा, परंपरा, मूल्ये, प्रमाणके इत्यादी वेगवेगळी आढळतात.

**४) प्रजोत्पादन** (Sexual Reproduction) : प्रजोत्पदन हे समाजाचे एक वैशिष्ट्ये आहे. प्रजोत्पादनाद्वारे समाजात सतत नवीन सदस्यांची भर पडत असते. कोणत्याही समाजातील व्यक्तीची संतती त्याच समाजात राहते. शरनार्थी म्हणून स्थायिक होऊ इच्छिणाऱ्या लोकांना, परदेशीयांना किंवा स्वेच्छेने येणाऱ्या इतर लोकांना समाजात सामावून घेतले जाते. परंतु या मार्गाने समाजाची संख्या अल्प प्रमाणात वाढते. प्रजोत्पादनाद्वारेच समाजातील सदस्यांची संख्या वाढते. प्रजोत्पादनामुळे जुन्या पिढीची जागा नवीन पिढी घेते आणि समाजाचे सातत्य टिकवून ठेवले जाते.

समाजाच्या सातत्यासाठी म्हणूनच नवीन सभासदाची सातत्याने भरती होणे गरजेचे असते. प्रत्येक समाजातच नव्या सभासदांची भरती करण्याची व्यवस्था असते. समाजातील विवाहसंस्था ही लैंगिक पुनरुत्पादनाला सामाजिक मान्यता देते. अशा समाजमान्य लैंगिक पुनरुत्पादनाद्वारे समाजात नव्या सभासदांची भरती केली जाते. विवाह आणि कुटुंबसंस्था ह्या सामाजिक संस्था याबाबतची काळजी घेतात. हाच प्रत्येक समाजातील सभासद मिळविण्याचा मूलभूत मार्ग आहे.

**५) भौगोलिकदृष्ट्या विशाल आणि स्वतंत्र** (Geographically Largest and independent) : समाज हा एका स्वतंत्र आणि विशाल भूभागावर असतो. याठिकाणी स्वतंत्र याचा अर्थ राजकीय स्वातंत्र्यपुरता एवढाच मर्यादित नसून एखाद्या देशावर दुसऱ्या देशाची सत्ता असली आणि तो देश राजकीय दृष्ट्या स्वतंत्र नसला तरी, समाज मात्र स्वतंत्र असतो. तो समाज स्वतःला विजेत्या समाजाचा भाग मानीत नाही. उदा. भारतावर ब्रिटिशांनी जवळपास दीडशे वर्ष राज्य केले. तरी त्यावेळी भारतीय समाज स्वतंत्र होता. कारण

भारतीय समाज रूढी, परंपरा, भाषा, धर्म इत्यादी बाबतीत स्वतंत्र होता. त्यामुळे भारतीय समाजाची संस्कृती टिकून राहिली.

**६) सामाजिक स्थैर्य आणि सामाजिक परिवर्तन** (Social stability and social change): समाज सापेक्षत: स्थिर असतो हे सत्य आहे. परंतु समाजामध्ये नेहमी परिवर्तन होत असतो. समाजांतर्गत विविध घडामोडी तसेच समाजबाह्य परिस्थितीतील कारणांमुळे समाजात सातत्याने परिवर्तन किंवा बदल होत असतात. सामाजिक संरचनेच्या घटकात होणाऱ्या परिवर्तनामुळे समाज बदलत असतो. उदा. शिक्षण व्यवस्था, तंत्रज्ञान, विज्ञान, समाजाचा इतर समाजाशी होणारा संपर्क, लोकसंख्याशास्त्रीय बदल, सामाजिक धोरणे, कायदे इ. घटकांमुळे समाजात सातत्याने परिवर्तन घडून येते.

**७) श्रमविभाजन** (Division of Labour) : श्रमविभाजनाची व्यवस्था हे सर्वच समाजांचे एक वैशिष्ट्य आहे. एक माणूस सर्व कामे करू शकत नाही आणि सर्व माणसाना एकसारखेच काम करून चालत नाही. म्हणून समाज विविध कामे विविध व्यक्तीना वाटून देतो. हेच श्रमविभाजन होय. उदा. शेतकरी, डॉक्टर्स, परिचारिका, अभियंता, व्यावसाईक, न्यायाधीश, नेते, शिक्षक, सैनिक, पोलिस इ. सामाजिक स्थानावरील व्यक्ती वेगवेगळी कामे पार पाडीत असल्याचे दिसून येते. समाजातील विविध व्यक्ती वरील विविध विशिष्ट कामे करीत असताना स्वत:च्या, इतरांच्या तसेच समग्र समाजाच्या गरजा भागवित असतात. अशाप्रकारे समाजामध्ये विविध सभासदांत कार्याचे विभाजन झालेले असते. आपल्या गरजा जसजशा वाढत जातील तसे तसे आपले इतरांवरील अवलंबित्व वाढत जाते. साध्या समाजांमध्ये (Simple Societies) श्रमविभाजनाचे स्वरूपही साधेच असते. पण मोठ्या संकीर्ण (Complex) समाजात गुंतागुंतीचे श्रमविभाजन असते. श्रमविभाजनामुळेच समाजातील सदस्यांमध्ये परस्परावलंबन आणि परस्पर सहकार्य निर्माण होते.

**८) लोकांचा समूह** (Aggregation of People): समाज एक विशाल सामाजिक समूह आहे. तो अनेक व्यक्तींचा मिळून बनलेला असतो. असे असले तरी या सर्व व्यक्ती एकमेकांपासून विभक्त नसतात. समाजातील विविध व्यक्ती वेगवेगळ्या प्रकारच्या सामाजिक संबंधानी एकत्र बांधलेल्या असतात. समाजातील या व्यक्ती वेगवेगळ्या सामाजिक स्थानांवर असतात. उदा. 'आई', 'वडील', 'शिक्षक', 'कामगार', 'इंजिनियर', 'डॉक्टर' इ. ही समाजातील वेगवेगळी सामाजिक स्थाने आहेत. समाजातील विविध व्यक्ती अशी विविध स्थाने भूषवित असतात.

**९) आत्मनिर्भरता** (Self Sufficiences): प्रत्येक समाज हा आत्मनिर्भर असतो. म्हणजेच सभासदांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठीची व्यवस्था समाजाने निर्माण केलेली असते. उदा. सभासदांना आवश्यक असे अन्न, वस्त्र, निवारा आणि इतर उपभोगाच्या वस्तू तसेच शिक्षण, आरोग्य, संरक्षण यासारख्या सेवांची पूर्ती करण्यासाठीची आवश्यक ती व्यवस्था प्रत्येक समाजात अस्तित्वात असते.

अर्थातच समाजातील विविध सामाजिक संस्था, कुटूंब, विवाह, शिक्षण, धर्म, अर्थव्यवस्था, राजकारण समाजाच्या वरील गरजा पूर्ण करणाऱ्या महत्त्वाच्या यंत्रणा आहेत. अशाप्रकारे प्रत्येक समाज हा आत्मनिर्भर असतो असे असले तरी समाज हे सापेक्षतः स्वयंपूर्ण नसतात. कारण काही गरजा पूर्ण करण्यासाठी विशिष्ट

समाजाला इतर समाजांवर अवलंबून रहावे लागते. उदा. मसाल्याचे पदार्थ, जीवनावावश्यक वस्तू इ. कमतरता भासल्यास आयात करावे लागते.

**१०) परस्परावलंबन** (Interdependence) : समाज हा जसा आत्मनिर्भर किंवा सपेक्षत: स्वयंपूर्ण असतो तसा त्याला वेगवेगळ्या सदस्यांवर अवलंबून असतात. कारण समाजातील भिन्न भिन्न गुणवैशिष्ट्ये आणि पात्रता असलेल्या व्यक्ती भिन्न भिन्न कामे पार पाडतात. एकमेकांच्या गरजा भागविण्यासाठी लोक परस्परांवर अवलंबून राहतात. म्हणजेच लोकांमध्ये परस्परावलंबन वाढते. परस्परावलंबनामुळे लोक परस्पराना सहकार्य करतात. त्यामुळेच सामाजिक जीवन शक्य होते.

**११) सामाजिक नियंत्रण** (Social Control) : समाजातील सदस्यांच्या सामाजिक वर्तनावर नियंत्रण ठेवण्याच्या यंत्रणा प्रत्येक समाजात असतात. सभासदांच्या अनेक इच्छा, आकांक्षा व गरजा असतात आणि त्यांची पूर्ती करण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून होतो. या प्रयत्नात व्यक्ती-व्यक्तीने संघर्ष निर्माण होण्याची शक्यता असते. समाजाची नियमने आणि मूल्ये यांच्या विरोधात जाऊन व्यक्ती आपल्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न करते, तेव्हा ते वर्तन विचलित वर्तन ठरते. अशा विचलनात्मक वर्तनामुळे सामाजिक संघटन धोक्यात येते. त्यामुळे त्यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे असते. समाजात व्यवस्था आणि स्थैर्य टिकविण्यासाठी विचलनात्मक वर्तनावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. त्यातच समाजाचे हित असते म्हणूनच समाजात सामाजिक नियंत्रणाच्या औपचारिक आणि अनौपचारिक यंत्रणा (उदा. समाजीकरण, कायदा) अस्तित्वात असतात. सामाजिक नियंत्रणांच्या अशा यंत्रणा, संस्कृतीच्या संक्रामणाच्या यंत्रणा याद्वारेच सामाजिक व्यवस्था आणि स्थैर्य टिकवून ठेवले जाते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न** (Check Your Progress) :

योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.

१) जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती परस्परांचे वर्तन प्रभावित करतात तेव्हा .......... अस्तित्वात येते.

अ) सामाजिक आंतरक्रिया ब) समाज क) धर्म ड) राज्य

२) ..........म्हणजे व्यक्तींमध्ये समोरासमोर होणारा संवाद किंवा संबंध

अ) प्रत्यक्ष आंतरक्रिया ब) अप्रत्यक्ष आंतरक्रिया

क) मानसिक आंतरक्रिया ड) यापैकी सर्व

३) तांत्रिक साधनांचा वापर .......... मध्ये केला जातो.

अ) प्रत्यक्ष आंतरक्रिया ब) अप्रत्यक्ष आंतरक्रिया

क) शारीरिक आंतरक्रिया ड) यापैकी सर्व

४) ..........म्हणजे दोन किंवा अधिक व्यक्तींचा एकत्रित संघ होय

अ) जात ब) धर्म क) सामाजिक समूह ड) यापैकी नाही

५) सामाजिक समूह अस्तीत्त्वात येण्यासाठी किमान .......... व्यक्तींची आवश्यकता असते.

अ) एक ब) दोन क) दहा ड) यापैकी सर्व

६) समाज हा शब्द लॅटिन भाषेतील................ पासून तयार झाला आहे.

अ) Society ब) Socio क) Socius ड) Group

७) ........... म्हणजे सामाजिक संबंधाचे जाळे होय

अ) राज्य ब) जात क) समूह ड) समाज

८. ..........हे मानवी समाजाचे वैशिष्ट्ये आहे.

अ) निश्चित भूप्रदेश ब) प्रजोत्पादन क) श्रमविभाजन ड) यापैकी सर्व

९) .......... यांच्या मते, दोन किंवा दोनपेक्षा अधिक व्यक्तींच्या मधील आंतरक्रियेने समूह निर्माण होतो

अ) किंबाल यंग ब) मॅकायव्हर क) गिलिन व गिलिन ड) बोगार्डस

१०) ..........हे प्रत्येक्ष आंतरक्रियेचे वैशिष्ट्ये नाही.

अ) तात्काळ प्रतिसाद ब) तांत्रिक साधनांचा वापर

क) भावनिक संवाद ड) गैर-मौखिक संकेतांचा वापर

**२.३ सारांश** (Let Us Sum Up) :

सामाजिक आंतरक्रिया ही समाजशास्त्रातील एक महत्त्वाची मूलभूत संकल्पना आहे. समाज हा विविध आंतरक्रिया करणाऱ्या व्यक्तींचा बनलेला असतो. म्हणून सामाजिक आंतरक्रिया हाच समाजाच्या अस्तित्वाचा मुख्य आधार आहे. या एककामध्ये आपण सामाजिक आंतरक्रिया या संकल्पनेचा अर्थ सामाजिक आंतरक्रियेचे प्रकार त्यांचा अर्थ व वैशिष्ट्ये इ. बाबींचा अभ्यास केला आहे. दोन किंवा अधिक व्यक्ती, त्यांच्यात असणारी परस्परांविषयीची जाणीव आणि त्यांच्यात होणारा कोणत्या ना कोणत्या स्वरुपाचा विनिमय या बाबी सामाजिक आंतरक्रिया घडून येण्यासाठीच्या पूर्व अटी आहेत. सामाजिक आंतरक्रियेत एक व्यक्ती इतरांच्या वर्तनाला प्रतिसाद देते. कारण ती त्याच्या वर्तनाचा अर्थ समजून घेते. अशाप्रकारे सामाजिक आंतरक्रियेत अर्थपूर्ण सामाजिक संबंधाचा समावेश होतो. सामाजिक आंतरक्रियेत व्यक्तीच्या वर्तनामध्ये इतरांच्या प्रभावामुळे बदल घडून येतो. या प्रक्रियेत व्यक्ती इतरांच्या वर्तनाशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करते. आंतरक्रियेत व्यक्ती इतरांच्या प्रतिसादानुसार वर्तन करतात. सामाजिक आंतरक्रियेत परस्पर उद्दीपन आणि परस्पर प्रतिक्रिया यांची साखळी अस्तित्वात येते. प्रतिकांचा वापर आणि अन्वयार्थ लावण्याची प्रक्रिया हा सामाजिक आंतरक्रियेतील मुख्य आशय असतो. त्यामुळेच सामाजिक आंतरक्रियेचे स्वरूप प्रतीकात्मक असते.

सामाजिक जीवनामध्ये सामाजिक आंतरक्रियेचे तीन स्तर दिसून येतात. व्यक्ती व्यक्तीतील आंतरक्रिया, व्यक्ती व समूह यांच्यातील आंतरक्रिया आणि समूहा समूहातील आंतरक्रिया हे सामाजिक आंतरक्रियेचे तीन स्तर होत.

सामाजिक समूह ही समाजशास्त्रातील एक मूलभूत संकल्पना आहे. प्रस्तुत घटकात सामाजिक या घटकामध्ये आपण सामाजिक समूहाचा अर्थ, त्याची वैशिष्ट्ये आणि महत्त्व यांचा अभ्यास केला आहे. सोप्या शब्दात सांगावयाचे झाल्यास सामाजिक समूह ही एक मानवी आंतरक्रियांची व्यवस्था आहे. सामाजिक समूह म्हणजे अशा व्यक्तींचा संग्रह की जो आपल्या समूहातील सदस्यांसंबंधी तसेच त्याच्यामधील आंतरक्रियाविषयी संवेदनशील असतो.

सामाजिक समूहाची खालील ठळक वैशिष्ट्ये आढळतात. त्यामध्ये -

१) किमान दोन किंवा अधिक सदस्य २) परस्पर संवाद ३) सदस्यामधील सापेक्षतःटिकाऊ संपर्क ४) सामान्य हेतू आणि समान उद्दिष्टे. ५) समूहाची एकात्मता ६) समूहाची रचना ७) गटाचे नियम आणि मूल्ये ही समूहाची वैशिष्ट्ये आहेत.

समाज ही समाजशास्त्राच्या केंद्रास्थानी असलेली संकल्पना आहे. ऑगस्त कॉम्तने समाजशास्त्र हे 'समाजाचा अभ्यास करणारे शास्त्र' (Science of Society) अशीच व्याख्या केली आहे. 'समाज' हा शब्द नेहमीच आपण दैनंदिन जीवनात वापरतो. दैनंदिन जीवनात 'समाज' हा शब्द कोणकोणत्या अर्थाने वापरला जातो हे आपण या घटकात अभ्यासले. समाजशास्त्रात 'समाज' या शब्दाला वेगळा अर्थ आहे. या घटकामध्ये आपण 'समाज' या संकल्पनेच्या विविध समाजशास्त्रज्ञांनी दिलेल्या व्याख्यांचा अभ्यास केला आहे. तसेच त्या व्याख्यामधून ध्वनित होणारा 'समाज' या संकल्पनेचा अर्थ समजून घेतला आहे. समाजशास्त्रज्ञांनी एक अमूर्त बाब या दृष्टीने समाजाकडे पाहिले आहे. 'समाज' हे 'सामाजिक परस्परसंबंधाचे जाळे' आहे असे समाजशास्त्रज्ञानी म्हटले आहे. एक मूर्त वास्तविकता या दृष्टीनेही समाजशास्त्रज्ञांनी समाजाचे वर्णन केले आहे. 'निश्चित भूप्रदेशावर वास्तव्य करणारा विशाल मानवी समूह म्हणजे समाज' अशीही समाजाची व्याख्या समाजशास्त्रज्ञ करतात.

मानवी समाजाच्या विविध वैशिष्ट्यांचा अभ्यासही आपण या घटकात केला आहे. (१) निश्चित भूप्रदेश (२) सामाजिक संबंधांचे जाळे (३) सर्वसमावेशक संस्कृती (४) प्रजोत्पादन (५) भौगोलिकदृष्ट्या विशाल आणि स्वतंत्र (६) सामाजिक स्थैर्य आणि सामाजिक परिवर्तन (७) श्रमविभाजन (८) लोकांचा समूह (९) आत्मनिर्भरता (१०) परस्परावलंबन (११) सामाजिक नियंत्रण इ. समाजाची वैशिष्ट्ये आहेत.

**२.५ स्वयं-अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे** (Answers to check your progress):

१) सामाजिक आंतरक्रिया
२) प्रत्यक्ष आंतरक्रिया
३) अप्रत्यक्ष आंतरक्रिया
४) सामाजिक समूह
५) दोन
६) Socius
७) समाज
८) यापैकी सर्व
९) किंबाल यंग
१०) तांत्रिक साधनांचा वापर

## २.६ सरावासाठी प्रश्न (Excercise / Home assignment) :

खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१) सामाजिक आंतरक्रियेचा अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करा.

२) सामाजिक समूहाची व्याख्या देऊन समूहाची वैशिष्ट्ये विशद करा.

३) 'समाज' या संकल्पनेच्या वैशिष्ट्यांचे वर्णन करा.

## २.७ चिंतन आणि कार्य (Reflection and Action) :

१) तुम्ही इतरांशी केलेल्या आंतरक्रियांची यादी करा. आपल्याशी आंतरक्रियेत कोण-कोण व्यक्ती सहभागी झाल्या होत्या? त्या आंतरक्रियांमुळे तुमचा कोणता फायदा झाला? याची सविस्तर माहिती तयार करा.

२) इमारतीचे बांधकाम चालू असताना व्यवस्थित निरीक्षण करा. वेगवेगळ्या व्यक्तींच्या कार्यांची यादी तयार करा. इमारत पूर्ण करण्यासाठी त्यांच्यातील सहकार्य लक्षात घ्या.

## २.८ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings) :


1) Rawat, H. K. : Sociology, Rawat Publications, Jaipur, 2007.

2) Shankar Rao : Sociology, Primary Principles, S. Chand and Co. Ltd. New Delhi, 2004.

3) Maclver, R. M. and Page C. H. : Society : An introductiory -nalysis, Mac Millan India limited, Madras, 1986.

4) Harry Johnson M. : Sociology : A Systematic Introduction, Allied Publishers, Bombay, 1970.

५) डॉ. सर्जेराव साळुंखे : समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे १९९६.


❑❑❑

# घटक–३
# संस्कृती आणि सामाजीकरण
(Cultural and Socialization)

**घटक–संरचना :**


३.१ उद्दिष्टे

३.२ प्रस्तावना

३.३ विषय विवेचन

 ३.३.१ संस्कृतीचा अर्थ आणि वैशिष्टे

 ३.३.२ संस्कृतीचे घटक आणि महत्व

 ३.३.३ सामाजिकरणाचा अर्थ आणि अवस्था

 ३.३.४ सामाजिकरणाची साधने आणि महत्व

३.४ सारांश

३.५ पारिभाषिक शब्द

३.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ सरावासाठी प्रश्न

३.८ चिंतन आणि कृती

३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.१ उद्दिष्टे (Objectives):

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील बाबी लक्षात येतील.

१) संस्कृतीचा अर्थ आणि वैशिष्ट्ये समजून घेता येईल.

२) संस्कृतीचे घटक आणि महत्त्व समजून घेता येईल.

३) सामाजिकरणाचा अर्थ आणि अवस्थांची माहिती घेता येईल.

४) सामाजिकरणाच्या साधनांची तसेच सामाजिकरणाचे महत्त्व समजून घेता येईल.

## ३.२ प्रस्तावना (Introduction):

समाजशास्त्राचे जनक ऑगस्ट कॉम्प्ट यांनी 'समाजशास्त्र' हा शब्द सर्वप्रथम उपयोगात आणला. कॉम्प्ट यांनी मानवी सहयोग, सामाजिक व्यवस्था व प्रगतीचा अभ्यास करणाऱ्या शास्त्राला समाजशास्त्र

(Sociology) हे नाव दिले. समाजशास्त्रात प्रामुख्याने सामाजिक संबंध, मानवी आंतरक्रिया, समाजातील परस्पर संबंध व सामाजिक संस्थांचा प्रामुख्याने अभ्यास केला जातो. त्यामुळे समाजशास्त्राला किंग्जले डेव्हीस यांनी समाजाविषयीचे सामान्य विज्ञान असे म्हटले आहे.

समाजशास्त्रात ज्या अनेक संकल्पनांचा अभ्यास केला जातो, त्यात प्रामुख्याने संस्कृती आणि सामाजिकरण या संकल्पनांचा समावेश होतो. मानवास इतर प्राण्यापेक्षा वेगळी करणारी मुख्य बाब म्हणजे संस्कृती आहे. संस्कृती हि मानवशास्त्राची मध्यवर्ती संकल्पना आहे, तर समाजशास्त्रातील ती एक मुलभूत संकल्पना आहे. संस्कृती हि मानवाचा सर्व जीवनक्रम व्यापून टाकते. तसेच सर्वच मानवी समाजाला त्यांची स्वतःची अशी संस्कृती असते. समाज मग तो प्राचीन असो, मध्ययुगीन वा आधुनिक, प्रगत वा अप्रगत त्याला संस्कृती हि असतेच. संस्कृती ही कालमानाप्रमाणे परिवर्तीत होत असली तरी तिच्या विविध अंगांमध्ये एक पूर्णात्मक ऐक्य आढळते. संस्कृतीमध्ये स्वीकारलेल्या नवीन मुल्यांचा जुन्या मूल्यांशी सुंदर मिलाफ झालेला आढळतो. त्यामुळे संस्कृतीत परिवर्तन होत असतानाही तिचे कोणतेही अंग विस्कळीत झालेले आढळत नाही.

समाजशास्त्रात सामाजिकरण या संकल्पनेलाही तितकेच महत्व आहे. निसर्गाने मानव व मानवेतर प्राणी यांच्यात निश्चित असे अंतर निर्माण केले आहे. संस्कृती व समाज या दोन घटकांनी हे अंतर अधिकच स्पष्ट होते. मानवी समाजाचा ठेवा असणारी हि संस्कृती जन्मल्यानंतर मनुष्यप्राणी बालकाच्या रूपाने हळूहळू आत्मसात करण्याचा प्रयत्न करतो आणि सामाजिक प्राणी या नात्याने स्वतःला विकसित करतो, या प्रक्रियेस सामाजिकरण असे म्हणतात. सामाजिकरण हि अशी प्रक्रिया आहे कि ज्याद्वारे मानवी बालक आपल्या स्वतःसाठी सामाजिक गुण अथवा वैशिष्ट्यांचे स्वतःमध्ये एकत्रीकरण/संघटन करते आणि सामाजिक प्राणी म्हणून स्वतःचा विकास घडवून आणते.

यावरून समजशास्त्रातील संस्कृती आणि सामाजिकरण या दोन्ही संकल्पना खूप महत्वाचे आहेत हे लक्षात येते, त्यामुळे त्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

## ३.३ विषय विवेचन

### ३.३.१ संस्कृतीचा अर्थ व वैशिष्ट्ये

#### ३.३.१.१ संस्कृतीचा अर्थ व व्याख्या (Meaning and Definitions of Culture):

संस्कृती ही अतिशय संकीर्ण, व्यापक  व परिवर्तनीय अशी संकल्पना आहे. ते एक मानव समाजाचे महत्वाचे लक्षण आहे. संस्कृती हि संकल्पना सर्वप्रथम सर एडवर्ड टायलर यांनी इ. स. १८७१ मध्ये प्रसिद्ध केलेल्या ‘Primitive Culture’ या सुप्रसिद्ध ग्रंथात वापरली. त्यांच्यामते संस्कृती हि अशी संकीर्ण समग्रता आहे कि ज्यात ज्ञान, श्रद्धा, कला, नीतिकल्पना, प्रथा, कायदा या व अश्याच इतर क्षमता आणि सवयींचा समावेश होतो. या गोष्टी व्यक्तीने समाजाचा सभासद या नात्याने संपादित केलेल्या असतात.

संस्कृतीचा अर्थ स्पष्ट करताना अनेक विचारवंतांनी विविध व्याख्या केलेल्या आहेत. त्यातील काही पुढील प्रमाणे आहेत.

१. **मॅलिनोवोस्की:** 'संस्कृती मानवनिर्मित असते व मानव तिचा वापर आपली उद्दिष्ट्ये साध्य करण्याचे माध्यम म्हणून करून घेतो.'

(Culture is human made. Human use the culture for objectives.

२. **राल्फ लिंटन:** 'संस्कृती ही शिक्षित वर्तन प्रकार व शिक्षित वर्तन प्रकारांची संघटीत व साचेबंद समग्रता होय. मनुष्य समाजाचा एक सभासद या नात्याने जे जे वर्तन प्रकार शिकतो, ते ते सर्व वर्तन प्रकार व या वर्तन प्रकाराची फळे संस्कृतीमध्ये समाविष्ट होतात.'

(Culture is the configuration of learned behaviour whose component elements are shared and transmitted by the members of a particular society. –***Ralph Linton***)

३. **हॉर्टन व हंट:** 'समाजाचा एक सदस्य या नात्याने माणूस सामाजिकदृष्ट्या जे काही शिकतो आणि जगतो त्या सर्वांचा संस्कृतीत समावेश होतो.'

(Culture is everything which is socially learned and shared by the members of society. – ***Horton and Hunt***)

४. **सी. सी. नॉर्थ:** 'मानवाने आपल्या गरजा भागविण्यासाठी निर्माण केलेल्या सर्व साधनांचा समावेश संस्कृतीमध्ये होतो.'

(Culture is consists in the instruments constituted by man to assist him in satisfying his wants. – ***C.C. North***)

५. **सोरोकीन:** 'दोन किंवा अधिक व्यक्तींच्या आंतरक्रियेतून किंवा परस्परांच्या वर्तन विषयक प्रभावातून जाणतेपणी किंवा अजाणतेपणी ज्या गोष्टीची निर्मिती होत असते अशा प्रत्येक गोष्टीच्या एकत्रीकरणाला संस्कृती असे म्हणतात.'

(Culture is defined as the sum total of everything which is created or modified by the conscious or unconscious activity of two or more individuals with one another or conditioning one another's behaviour. - ***Sorokin***)

संस्कृतीच्या वरील व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला काही ठळक बाबी लक्षात येतात त्या खालीलप्रमाणे–

१. संस्कृती ही मानवनिर्मित आहे.

२. प्रत्येक समाजाची संस्कृती वेगळी असते.

३. संस्कृती म्हणजे समग्र समाजाची जीवनपद्धती होय.

४. संस्कृती हि सामाजिक वारसा आहे.

### ३.३.१.२ संस्कृतीची वैशिष्ट्ये (Characteristics of Culture):

संस्कृती ही सार्वत्रिक आहे. विविध मानवी समाजात संस्कृतीच्या बाबतीत भिन्नता दिसून येत असली तरी संस्कृती हा घटक सर्व मानव समाजात दिसून येतोच. संस्कृतीमुळे तर मानव समाज हा मानवेतर समाजापासून वेगळा/भिन्न आहे हे स्पष्ट होते. संस्कृतीची अनेक विचारवंतांनी विविध वैशिष्ट्ये सांगितली आहेत. ती पुढीलप्रमाणे आहेत.

**१. संस्कृती ही मानवनिर्मित असते (Culture is Manmade):**

संस्कृतीचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे संस्कृती हि मानवनिर्मित असते. समाजात ज्या गोष्टी मानवनिर्मित आहेत त्यांचा समावेश संस्कृतीमध्ये होतो. मानवनिर्मित धर्म, रूढी, प्रथा, परंपरा, विविध वस्तू या सर्वांचा समावेश संस्कृतीत होतो, ज्या निसर्गनिर्मित आहेत त्यांचा नाही. उदा. समुद्र ही संस्कृती नव्हे तर जहाजनिर्मिती ही संस्कृती आहे. आजघडीला जगप्रसिद्ध अशा तीन संस्कृती आहेत, त्यात इजिप्तची संस्कृती, मेसिपोटामियाची संस्कृती आणि सिंधू संस्कृती यांचा समावेश होतो.

**२. संस्कृती संचयशील असते (Culture is Cumulative):**

'संचय' म्हणजे साठा करणे. संस्कृतीचे संक्रमण अखंडपणे चालू असते. त्यामुळे संस्कृतीचा ओघ कधीही नष्ट होत नाही. उलट जुन्या संस्कृतीचे जतन आणि नाविन्याची सतत पडणारी भर यामुळे संस्कृती अधिक संपन्न व परिपूर्ण होत असते. संस्कृती संचायामुळे ती समृद्ध होण्यास मदत होते. हिंदू धर्मातील वेद, पुराणे, रामायण, महाभारत इत्यादी तर इस्लाम धर्मातील कुराण, ख्रिश्चन धर्मातील बायबल, बौद्ध धर्मातील त्रिपिटक तर शिख धर्मातील गुरुग्रंथसाहिब हे भारतीय संस्कृतीचा अमूल्य ठेवा असून त्यांचे आजही जतन केले जाते.

**३. संस्कृती परिवर्तनशील असते (Culture is Changeable):**

संस्कृतीत समाविष्ट होणाऱ्या घटकांत एकसारखा बदल होत असतो. त्यामुळे संस्कृती हा समाजाचा अस्थिर घटक आहे असे म्हणता येईल. जुन्या संस्कृतीत सतत बदल होऊन त्यात नाविन्याची भर पाडली जाते. अव्याहतपणे बदलाची हि प्रक्रिया चालू असते. संस्कृतीच्या दोन्ही घटकांत बदल होत असतात. मात्र संस्कृतीच्या भौतिक घटकांत जितके चटकन परिवर्तन होते तितके संस्कृतीच्या अभौतिक घटकात होताना दिसत नाही. बदल हा निसर्गाचा नियम आहे त्यामुळे संस्कृतीत बदल होणे साहजिक आहे. उदा. भारतीय शास्त्रीय संगीतचे महत्व आहे तसे आहे मात्र त्यात बदल होऊन आजची पिढी रीमिक्सकडे वळली आहे.

**४. संस्कृती संक्रमनशील असते (Culture is Transferable):**

'संक्रमण' याचा अर्थ हस्तांतरण असा होतो. सांस्कृतिक परंपरा व वारसाचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होणारे हस्तांतरण म्हणजे संस्कृतीचे संक्रमण होय. तज्ञांच्या मते संस्कृतीच्या संक्रमणामुळे संस्कृतीचे सातत्य टिकवले जाते. संस्कृती संक्रमनामध्ये भाषा महत्वाची भूमिका बजावते. भाषेच्या सहाय्यानेच

संस्कृतीचे संक्रमण सुलभ, सोपे व सहजसाध्य होते. थोडक्यात संस्कृतीच्या सातत्यासाठी तिचे जतन व्हावे म्हणून संस्कृतीचे जतन होणे गरजेचे आहे.

### ५. **संस्कृती आदर्शात्मक असते (Culture is Ideal):**

संस्कृतीमध्ये समूहाच्या आदर्श नियम आणि विचारांचा समावेश होतो. ते समूहांच्या आदर्श नियम आणि प्रतीमानांची संपूर्ण गोळाबेरीज आहे. त्यामुळे संस्कृती हि आदर्शात्मक असते असे म्हणता येईल. उदा. दान धर्म करणे, मदत करणे इत्यादी.

### ६. **संस्कृती अमूर्त असते (Culture is Abstract):**

संस्कृती हि भौतिक व अभौतिक अशा स्वरूपातील असते. त्यामुळे अभौतिक संस्कृती हि अदृश्य असते. जुन्या पिढीतील माणसांनी हि संस्कृती वर्तमान पिढीकडे संक्रमित केलेली असते आणि वर्तमान पिढीतील सदस्य इतर सदस्यांना त्या दृष्टीने मार्गदर्शन करतात. उदा. अमुक एखादा पदार्थ कसा करायचा हे आजी इतरांशी होणाऱ्या आंतरक्रियेतून शिकलेली असते.

### ७. **संस्कृती टिकाऊ असते (Culture is Persist):**

संस्कृती हा दैनंदिन जीवनाचा भाग आहे. त्यामुळे सातत्त्याने तिची पुनरावृत्ती होत असल्याने संस्कृती कधी नष्ट होत नाही. फक्त त्यात कालमानानुसार बदल होत जातो. एकदा संस्कृती शिकली आणि स्वीकारली कि तिचे सातत्याने अनुक्रमण केले जाते. त्यामुळे संस्कृती चिरकाळ टिकणारी असते. उदा. इंग्रजांना जाऊन ७७ वर्षे होऊन गेली पण आपण त्यांचे इंग्रजी आणि संस्कृतीतील इतर घटक आजही टिकवून ठेवले आहेत.

### ८. **संस्कृती प्रसरणशील असते (Culture is Cliffusive):**

संस्कृतीचे ज्याप्रमाणे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण होते, त्याचप्रमाणे संस्कृतीचा प्रसार व प्रसारण एका समाजाकडून दुसऱ्या समाजाकडे होते. तसेच एकाच राष्ट्रातील संस्कृती, एका धर्माची संस्कृती दुसऱ्या राष्ट्राकडे वा दुसऱ्या धर्माकडेहि प्रसारित होते. जेव्हा एका समाजाची, राष्ट्राची किंवा धर्माची संस्कृती दुसरा समाज, दुसरे राष्ट्र व दुसरा धर्म स्वीकारतो तेव्हा त्यास संस्कृतीचे प्रसरण झाले असे म्हणतात.

### ९. **संस्कृतीला स्वतंत्र अस्तित्व असते (Culture is Independent Existence):**

संस्कृती हि मानवनिर्मित असली तरी संस्कृतीला स्वतंत्र अस्तित्व आहे. कारण व्यक्तीच्या पश्चात ती संस्कृती कधीही नष्ट होत नाही. संस्कृतीचा स्वीकार बहुतांश समाजाने केलेला असतो. त्यामुळेच तिला स्वतःचे स्वतंत्र सामाजिक अस्तित्व प्राप्त होते. संस्कृतीला व्यक्तिनिरपेक्ष असे अस्तित्व असते. निर्मात्यानंतरही संस्कृती समाजात आपले अस्तित्व टिकवून असते. उदा. वाल्मीकीचे रामायण, व्यासांचे महाभारत तर लता मंगेशकरांची गाणी इ.

थोडक्यात, संस्कृतीची अनेक वैशिष्टे पाहिल्यावर असे लक्षात येते कि, संस्कृती हा मानवी समाजाचा विशेष असा गुणधर्म आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न संच क्र. १**

अ) योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१) संस्कृती हि संकल्पना सर्वप्रथम................यांनी इ. स. १८७१ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'Primitive Culture' या सुप्रसिद्ध ग्रंथात वापरली.

अ) राल्फ लिंटन　　ब) सर एडवर्ड टायलर

क) मॅलिनोवोस्की　　ड) हॉर्टन आणि हंट

२) ''संस्कृती ही मानवनिर्मित असते व ती एक माध्यम आहे ज्याद्वारे मनुष्य आपली उद्दिष्टे साध्य करतो'' हे विधान ................या समाजशास्त्रज्ञाचे आहे.

अ) राल्फ लिंटन　ब) सोरोकीन　क) मॅलिनोवोस्की　ड) हॉर्टन आणि हंट

३) ''संस्कृती हि अमूर्त असते'' याचा अर्थ ................ होय.

अ) संस्कृतीचे भौतिक घटक बदलत नाहीत.

ब) संस्कृतीचे काही घटक दृश्यमान असतात.

क) संस्कृतीमध्ये असलेली सखोल विचारांची संकल्पना अदृश्य असते.

ड) संस्कृतीमध्ये फक्त भौतिक घटक असतात.

४) मानवाने आपल्या गरजा भागविण्यासाठी निर्माण केलेल्या सर्व साधनांचा समावेश ................ मध्ये होतो.

अ) समाज　ब) व्यवस्था　क) समाजिकरण　ड) संस्कृती

५) 'समाजाचा एक सदस्य या नात्याने माणूस सामाजिकदृष्ट्या जे काही शिकतो आणि जगतो त्या सगळ्याचा संस्कृतीत समावेश होतो' अशी व्याख्या ................ या विचारवंताने केली आहे.

अ) हॉर्टन आणि हंट ब) सोरोकीन　क) मॅलिनोवोस्की　ड) राल्फ लिंटन

६) संस्कृती ही ................ नसते.

अ) परिवर्तनशील　ब) आदर्शात्मक　क) मूर्त　ड) मानवनिर्मित

७) संस्कृती ही ................ वारसा आहे.

अ) सामाजिक　ब) असामाजिक　क) नैसर्गिक　ड) आध्यात्मिक

### ३.३.२.१ संस्कृतीचे घटक/मुलतत्वे (Elements of Culture):

संपूर्ण मानव समाजाची संस्कृती वेगवेगळी असली तरी त्या प्रत्येक संस्कृतीचे विशिष्ट घटक समान असलेले दिसून येतात. संस्कृती या संकल्पनेत मानवनिर्मित सर्व भौतिक व अभौतिक साधने यांचा समावेश होतो. तरी संस्कृतीची संकल्पना सुस्पष्ट होण्यासाठी संस्कृतीचे घटक पाहणे गरजेचे आहे. संस्कृतीच्या घटकांबाबत हॅरी जॉन्सन, रिचर्ड लापिअर व आधुनिक समाजशास्त्रज्ञांचे विचार मोलाचे ठरतात.

**अ) हॅरी जॉन्सन यांनी सांगितलेले संस्कृतीचे घटक:**

**(Elements of Culture according to Harry Johnson)**

हॅरी जॉन्सन यांनी संस्कृतीचे पुढील चार घटक सांगितले आहेत.

**१. ज्ञान/बोध (Knowledge):**

संस्कृती जशी सार्वत्रिक असते तशी ती प्रचंड ज्ञानाने भरलेली असते. ते सर्व ज्ञान आत्मसात करण्याला बोध असे म्हणतात. एडवर्ड टायलर यांनी आपल्या व्याख्येत ज्ञानाला पहिले स्थान दिले आहे यावरून ज्ञानाचे महत्व कळते. आपल्या जिज्ञासेपोटी मानवाने नवनवीन ज्ञान संपादन केले आहे, गरजा भागविण्यासाठी ज्ञाननिर्मित केला आहे. हे ज्ञान पुढच्या पिढीला संक्रमित होत आहे.

**२. श्रद्धा/विश्वास (Beliefs):**

श्रद्धा/विश्वास हा संस्कृतीतील दुसरे घटक तत्व आहे. श्रद्धा खऱ्या किंवा खोट्या म्हणता येत नाही. जोपर्यंत समाजात बहुसंख्य लोक श्रद्धांचा स्वीकार करतात तोपर्यंत त्या खऱ्या किंवा खोट्या हे सांगता येत नाही. उदा. आत्मा अमर आहे, व्यक्तीचा पुनर्जन्म होतो, ईश्वर आहे अशा हिंदूंच्या श्रद्धा आहेत.

**३. मुल्ये व नियमने (Values and Norms):**

मूल्य ही एक समूह संकल्पना आहे. अशी मुल्ये म्हणजे चांगल्या गोष्टी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे सामाजिक संबंधातून प्रतीत होत असतात. ही मुल्ये नैतिक तसेच धार्मिकही असतात. समाजव्यवस्थेच्या अनेक उपव्यवस्थांच्या अंतर्गत जे व्यक्तीचे वर्तन होत असते ते फार मोठ्या प्रमाणात मूल्यांनी निर्धारित केलेले असते. तर नियमने ही मूल्याशी अगदी जवळची असतात. नियमने म्हणजे सामुहिक वर्तनाचे प्रमाणीकरण असते. नियमने हि मानवी वर्तनावर निर्बंध घालत असतात. ते आदर्श वर्तनप्रकार असतात.

**४. संकेत व प्रतीके (Sign and Symbols):**

संकेत आणि प्रतीके हि समानार्थी वापरली जातात. सर्वांना समान स्वरुपात समजतील किंवा समान अर्थबोध होईल अशी चिन्हे प्रत्येक संस्कृतीत असतात. उदा. रस्त्यावरील रहदारी संदर्भात वापरली जाणारी लाल, हिरवा व पिवळा रंगाची चिन्हे. तसेच प्रतीकांवरून त्या त्या गोष्टीची ओळख पटते. उदा. हात, कमळ, घड्याळ इ. निवडणुकीत वापरली जाणारी विविध राजकीय पक्षांची प्रतीके.

### आ) रिचर्ड लापिअर यांनी सांगितलेले संस्कृतीचे घटक:

### (Elements of Culture according to Richard Lapiere)

रिचर्ड लापिअर यांनी संस्कृतीचे पुढील तीन घटक सांगितले आहेत.

#### १. विचारधारात्मक व्यवस्था (The Ideological System):

या व्यवस्थेत त्या त्या समाजातील मूल्य, श्रद्धा, कल्पना व विचार करण्याच्या पद्धतींचा समावेश होतो. लापिअर या अवस्थेला संस्कृतीचा मानसिक घटक असे नाव देतात. आपल्या वर्तनाच्या त्या त्या समजातील त्याच वर्तनरिती ह्या योग्य वर्तनरीतीच का आहेत याचे समर्थन या व्यवस्थेमुळे केले जाते.

#### २. तंत्रज्ञानात्मक व्यवस्था (The Technological System):

या व्यवस्थेत त्या त्या समाजाचे जे नैसर्गिक पर्यावरण असते त्यातून उपलब्ध होणाऱ्या कच्च्या सामग्रीपासून विविध गरजांच्या पूर्ततेसाठी विविध वस्तू तयार करण्यासाठी जीवनकौशल्ये आवश्यक असतात त्याचा समावेश असतो. उदा. पाककला, संगीत, वाद्य वाजविण्याची कला इ.

#### ३. संघटनात्मक व्यवस्था (The Organizational System):

या व्यवस्थेत समाजातील इतर व्यक्तींचा वर्तनाशी प्रभावीरीत्या समन्वय साधून आपापल्या भूमिका व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी व्यक्ती भूमिकाविषयक शिक्षण घेते त्याचा समावेश होतो. भूमिकाविषयक अशा शिक्षणामुळेच समाजातील आपापल्या भूमिका व्यक्ती उत्तम रीतीने पार पाडू शकतात आणि संपूर्ण सामाजिक जीवन संघटीत होऊ शकते.

### इ) आधुनिक समाजशास्त्रज्ञांनी सांगितलेले संस्कृतीचे घटक:

### (Elements of Culture according to Modern Sociologists)

आधुनिक समाजशास्त्रज्ञांनी संस्कृती ही नियामानात्मक व प्रतीकात्मक व्यवस्था मानली आहे. त्यांच्यामते संस्कृती गुणविशेष, संस्कृती संकुल व संस्कृती प्रतिमान या घटकांनीच संस्कृतीला रचना प्राप्त होते. संस्कृतीची मुलतत्वे हि प्रामुख्याने अभौतिक संस्कृतीचा भाग असतात. तीश्लेर, व्हायटन आणि हंटर यांनी अशा अमूर्त संस्कृतीचे नियामानात्मक संस्कृती आणि बोधात्मक संस्कृती असे दोन प्रमुख भाग सांगितले. तर डेव्हिड पापिनो यांनी संस्कृतीचे बोधात्मक, नियमनात्मक व भौतिक असे तीन घटक सांगितले आहेत. संस्कृतीची मुलतत्वे हि प्रामुख्याने बोधात्मक घटकाशी संबंधित आहेत.

### ३.३.२.२ संस्कृतीचे महत्व (Importance of Culture):

व्यक्ती जीवनाच्या दृष्टीने संस्कृतीला अनन्यसाधारण महत्व आहे. व्यक्ती आणि समाज परस्परपूरक असतात आणि संस्कृती हा दोघांच्या दृष्टीने अविभाज्य घटक असतो. संस्कृतीचे महत्व पुढील मुद्द्यांच्या सहाय्याने स्पष्ट होईल.

**१. संस्कृती ही सार्वत्रिक आहे.**

संस्कृती सार्वभौम आहे, याचा अर्थ असा की विविध देशांतील आणि प्रदेशांतील लोकांच्या जीवनशैली, विचारधारा, परंपरा, आणि कला यांमध्ये समानत्व आहे. जगभरातील मानव समुदाय विविधतेतून एकत्र येतो, तरीही त्यांच्या जीवनाच्या मुलभूत तत्वांमध्ये एकसारख्या गोष्टी आढळतात. उदाहरणार्थ, प्रत्येक संस्कृतीत कुटुंबाचे महत्त्व, प्रेम, सन्मान, आणि एकमेकांची काळजी घेणे यावर भर दिला जातो. तसेच, प्रत्येक समाजात शास्त्र, कला, संगीत, आणि धर्म यांचा प्रभाव असतो. संस्कृतीच्या विविध पैलूंमध्ये भिन्नता असली तरी, मानवतेच्या मूलभूत गरजा आणि भावना एकसारख्या असतात, जे सर्व संस्कृतींमध्ये समान आहेत.

**२. संस्कृती ही अनुकूलनक्षम आहे.**

संस्कृती अनुकूलनीय आहे, याचा अर्थ संस्कृती वेळोवेळी आणि परिस्थितीच्या बदलानुसार बदलते आणि विकसित होते. मानवाच्या जीवनशैली, सामाजिक वर्तन, तंत्रज्ञान, भाषा, कला, परंपरा आणि मूल्ये यांचे रूप किंवा स्वरूप विविध सामाजिक, भौगोलिक आणि ऐतिहासिक परिस्थितींवर आधारित असते. उदाहरणार्थ, एक समाज आपल्या जीवनशैलीला नैतिक, पर्यावरणीय किंवा तंत्रज्ञानिक बदलांसोबत समजून स्वीकारतो आणि त्या अनुकूलतेने आपल्या संस्कृतीला नवीन आकार देतो. त्यामुळे संस्कृती कायमची स्थिर नसून, ती परिस्थितीला प्रतिसाद देऊन बदलत राहते.

**३. संस्कृतीमध्ये निरंतरता आहे.**

संस्कृतीमध्ये निरंतरता आहे, या विचाराचा अर्थ असा की, संस्कृतीतील काही मूलभूत घटक, परंपरा, मूल्ये आणि आचारधर्म अनेक पिढ्यांपासून एकाच प्रकारे चालत राहतात. जरी समाजात वेळोवेळी बदल होत असले तरी, काही सांस्कृतिक घटक कायम राहतात आणि ते पुढील पिढ्यांना हस्तांतरित केले जातात. उदाहरणार्थ, कुटुंब मूल्ये, धार्मिक परंपरा, भाषा, सण-उत्सव इत्यादींमध्ये निरंतरता आहे. या घटकांमुळे प्रत्येक पिढीला आपल्या संस्कृतीचा ठराविक धागा अनुभवता येतो आणि त्यामुळे एक सांस्कृतिक एकजूट कायम राखली जाते.

**४. संस्कृतीमुळे व्यक्तीची समाज सदस्य म्हणून घडण होते.**

संस्कृतीमुळे व्यक्तीची समाज सदस्य म्हणून घडण होते, याचा अर्थ असा आहे की, व्यक्तीला समाजाचा भाग म्हणून परिपूर्ण आणि योग्य रीतीने वागायला संस्कृती मार्गदर्शन करते. संस्कृती विविध मूल्य, आचारधर्म, परंपरा, आणि सामाजिक नियमांच्या माध्यमातून व्यक्तीला समाजातील एक सक्रिय आणि जबाबदार सदस्य बनवते. समाजातील परंपरा आणि संस्कृतींच्या प्रभावामुळेच व्यक्तीला इतरांच्या सोबत सहकार्य, आदर, समजूतदारपणा, आणि न्याय याचे महत्त्व कळते. यामुळे त्या व्यक्तीचा सामाजिक व्यवहार, संबंध आणि समाजातील योगदान अधिक प्रभावी होतो. उदाहरणार्थ, संस्कृतीत असलेल्या चांगल्या

शिस्तीच्या, सहकार्याच्या आणि परस्पर आदराच्या मुल्यांमुळे व्यक्तीची समाजाचा योग्य सदस्य म्हणून जडणघडण होते.

**५. संस्कृतीमुळे व्यक्तिमत्व विकास होतो**

व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा विकास त्याच्या संस्कृतीशी संबंधित असलेल्या विविध घटकांमुळे होतो. संस्कृती व्यक्तीला त्याच्या मूल्ये, नैतिकता, परंपरा, वर्तनाची शिस्त आणि समाजाशी संबंधित असलेल्या नियमांबद्दल शिकवते. या सर्व गोष्टी व्यक्तीच्या मानसिकतेला आकार देतात आणि त्याच्या व्यक्तिमत्वाची प्रगल्भता, निर्णय क्षमता, सामाजिक वागणूक, संवाद कौशल्य आणि नेतृत्व गुणांना वाव देतात. उदाहरणार्थ, जर एखाद्या व्यक्तीला आपल्या संस्कृतीतील आदर, परिश्रम, सहकार्य आणि जबाबदारीची शिकवण मिळाली असेल, तर हे त्याच्या व्यक्तिमत्वाचा भाग बनते आणि तो समाजात एक सक्षम आणि परिपूर्ण व्यक्ती म्हणून तयार होतो. त्यामुळे संस्कृती व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भूमिका बजावते.

**६. संस्कृतीमुळे आर्थिक गरजांची पूर्तता होते.**

प्रत्येक समाजाची संस्कृती त्याच्या आर्थिक गरजांची पूर्तता करण्यासाठी काही विशिष्ट मार्ग, पद्धती आणि संसाधनांचा वापर शिकवते. संस्कृती व्यक्तीला त्यांच्या परंपरांनुसार, कार्यप्रणाली आणि व्यवसायांसाठी एक आदर्श मार्गदर्शन देते, ज्यामुळे ते आपले आर्थिक उद्दिष्ट साध्य करू शकतात. उदाहरणार्थ, काही संस्कृतीतील पारंपरिक काव्य, हस्तशिल्प, शेती किंवा शिल्पकला यांसारख्या उद्योगांची महत्त्वाची भूमिका आहे. या प्रकारे, व्यक्ती त्यांच्या संस्कृतीतील रोजगार पद्धती आणि व्यवसायाची शिकवण घेऊन आर्थिक उद्दिष्ट साधतात. त्याचप्रमाणे, संस्कृतीमधील परंपरागत सहकार्य, संसाधनांच्या सामूहिक वापरामुळे देखील आर्थिक संसाधने अधिक प्रभावीपणे वापरली जातात. थोडक्यात, संस्कृती आपल्या पारंपरिक तत्त्वज्ञान, कौशल्य, आणि कामकाजी पद्धतींमुळे व्यक्ती आणि समाजाच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यास मदत करते.

**७. संस्कृती म्हणजे जीवन जगण्याचा आराखडा आहे.**

संस्कृती व्यक्ती आणि समाजासाठी जीवनाचे मार्गदर्शन करणारा एक आराखडा किंवा नकाशा असतो. संस्कृतीत असलेल्या परंपरा, मूल्ये, नैतिकता, सामाजिक नियम, वर्तनाचे निकष आणि विश्वास यांचा एक ठराविक पद्धतीने पालन केल्यास व्यक्तीला योग्य आणि परिपूर्ण जीवन जगता येते. उदाहरणार्थ, संस्कृतीतील नियम आणि परंपरांचे पालन केल्याने व्यक्तीला काय योग्य आहे आणि काय अयोग्य, काय आदर्श आहे आणि काय वाईट हे कळते. यामुळे व्यक्ती आपल्या वर्तनाचे नियमन करू शकतो, समाजाशी चांगले संबंध राखू शकतो, आणि त्याच्या जीवनाला उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी योग्य दिशा मिळवू शकतो. त्यामुळे संस्कृती हे जीवन जगण्याचे एक महत्त्वाचे मार्गदर्शक असते, ज्यामुळे आपला रोजचा व्यवहार, निर्णय, आणि सामाजिक वागणूक योग्य आणि समृद्ध होऊ शकते.

## ८. संस्कृतीमुळे सामाजिक नियंत्रण प्रस्थापित होते.

संस्कृती समाजातील सदस्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचे एक महत्त्वाचे साधन असते. संस्कृतीतील विविध नियम, परंपरा, मूल्ये, आणि आचारधर्म समाजातील सदस्यांना काय योग्य आहे आणि काय अयोग्य आहे हे शिकवतात, ज्यामुळे समाजात सुव्यवस्था राखली जाते. उदाहरणार्थ, प्रत्येक समाजामध्ये काही नियम असतात जसे की इतरांना आदर देणे, परस्त्रीला आदर देणे, योग्य ठिकाणी आणि योग्य वेळी वागणे, आणि नातेसंबंधांमध्ये नैतिकता राखणे हे सर्व संस्कृतीचा भाग आहेत. जेव्हा लोक या संस्कृतिक नियमांचे पालन करतात, तेव्हा त्यांचे वर्तन सामाजिकदृष्ट्या स्वीकारार्ह होते, आणि समाजातील संप्रेषण व समजूतदारपणा सुधारतो.

संस्कृतीमुळे समाजामध्ये सामाजिक दबाव आणि निरीक्षण निर्माण होते, ज्यामुळे व्यक्तीला आपल्या वर्तनाची जबाबदारी समजते. जेव्हा एखादी व्यक्ती या नियमांचे उल्लंघन करते, तेव्हा समाजात त्याला वाईट मानले जाते किंवा त्यावर दंड केला जातो. हे सर्व समाजाच्या नियंत्रण आणि सुव्यवस्था ठेवण्याचे कार्य करते. म्हणजेच, संस्कृती एक प्रकारे सामाजिक नियंत्रणाच्या रूपात कार्य करते, ज्यामुळे समाजात शिस्त आणि अनुशासन राखले जाते.

## ९. संस्कृतीमुळे सामाजिक प्रगती साध्य होते.

संस्कृती समाजाच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी एक महत्त्वाचे साधन असते. संस्कृतीमधील मूल्ये, परंपरा, तंत्रज्ञान, कला, शास्त्रज्ञान, आणि सामाजिक वर्तनाचे निकष समाजातील बदल आणि सुधारणा घडवून आणतात. उदाहरणार्थ, समाजातील शिक्षण, तंत्रज्ञान, आरोग्य सेवा, पर्यावरणीय शुद्धता आणि मानवी हक्क यांसारख्या बाबी संस्कृतीमधूनच प्रेरित होतात. संस्कृती व्यक्तींना नवे ज्ञान, कौशल्य आणि चांगले वर्तन शिकवते, ज्यामुळे समाजाच्या पातळीवर प्रगती साधता येते. उदाहरणार्थ, एक समाज जेव्हा आपल्या संस्कृतीत शालेय शिक्षण, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचे महत्त्व वाढवतो, तेव्हा तो समाज अधिक प्रगत होतो.

संस्कृतीत असलेल्या चांगल्या मूल्यांच्या माध्यमातून सामाजिक न्याय, समानता, पर्यावरण संरक्षण आणि आर्थिक समृद्धी यांसारख्या बाबी साधता येतात. यामुळे संपूर्ण समाजाच्या जीवनमानात सुधारणा होते, आणि समाज प्रगत बनतो. थोडक्यात, संस्कृती समाजाच्या विकासाचा मार्गदर्शक ठरते, ज्यामुळे सामाजिक प्रगती साधली जाते.

## १०. मानव समाजाचा मूलभूत गरजांची पूर्तता करण्याचे कार्य संस्कृतीकडून होत असते.

मानवाच्या जीवनातील मूलभूत गरजा जसे की अन्न, वस्त्र, निवारा, सुरक्षा, आणि सामाजिक संबंध या सर्वांची पूर्तता संस्कृतीच्या माध्यमातून केली जाते. संस्कृती हे समाजाचे जीवन वर्तन, परंपरा, मूल्ये, आणि अडचणींवर आधारित असते, आणि ते प्रत्येक व्यक्तीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मार्गदर्शन करतात. प्रत्येक समाजाची संस्कृती अन्न तयार करण्याच्या पद्धती, अन्नाचे प्रकार आणि त्याचे सेवन कसे करायचे यावर मार्गदर्शन करते. उदाहरणार्थ, काही संस्कृतींमध्ये शाकाहारी आहार महत्त्वाचा मानला जातो, तर इतरत्र

मांसाहाराचा समावेश आहे. संस्कृतीमुळे लोकांना पोषण मिळवण्यासाठी योग्य अन्न स्रोत उपलब्ध होतात. संस्कृतीतून घर बनवण्याच्या पद्धती शिकविल्या जातात. कधी तरी उबदार वाऱ्यापासून बचाव करण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या घरे आणि वास्तुशिल्पाच्या पद्धती निर्माण होतात. उष्णदेशीय ठिकाणी घरांचे बांधकाम वेगळ्या प्रकारे केले जाते, जेणेकरून निवारा गरम व निसर्गाचे बदल सहन करू शकतो.

संस्कृतीमुळे एकमेकांशी कसा संवाद साधावा, नातेसंबंध कसे ठेवावेत याचे बोध घेतले जातात. संस्कृतीमुळे समाजात प्रेम, सहकार्य, आदर, आणि सहिष्णुतेचा विकास होतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला योग्य सामाजिक आयुष्य मिळते. संस्कृतीतील नियम, कायदे, परंपरा आणि मूल्ये हे समाजातील सुरक्षिततेला कायम ठेवतात. उदाहरणार्थ, शाळांमधून शिक्षण घेतले जाते जे समाजातील नैतिकतेला आणि कायद्याच्या अंमलबजावणीला महत्त्व देते. यामुळे समाजातील व्यक्ती सुरक्षितपणे वावरू शकतात. संस्कृतीत असलेल्या धार्मिक, कला, आणि सण-उत्सवांमुळे व्यक्तीला मानसिक समाधान आणि भावनिक संतुलन मिळते. हे त्यांना आपले जीवन अधिक अर्थपूर्ण आणि आनंदी बनवण्यास मदत करते. यामुळे, संस्कृती केवळ भौतिक गरजा पूर्ण करत नाही, तर सामाजिक, मानसिक, आणि भावनिक गरजा देखील पूर्ण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते.

**११. संस्कृतीमुळे मानवी समाजाला वेगळेपण प्राप्त होते.**

प्रत्येक समाजाची संस्कृती त्याला विशिष्ट ओळख, वैशिष्ट्य आणि वेगळेपण देते. संस्कृतीत असलेल्या परंपरा, मूल्ये, वर्तणुकीचे नियम, भाषा, कला आणि सण-उत्सव यांमुळे प्रत्येक समाजाचा एक ठराविक आकार आणि वैशिष्ट्य तयार होते. हे विविध समाज एकमेकांपासून वेगळे होण्यास कारणीभूत ठरते. संस्कृतीद्वारे निर्माण झालेल्या भाषांचा उपयोग समाजाची ओळख निश्चित करतो. प्रत्येक समाजाची स्वतंत्र भाषा, बोली, आणि संवाद पद्धत त्याला इतर समाजांपासून वेगळे करते. उदाहरणार्थ, मराठी, हिंदी, इंग्रजी, फ्रेंच या विविध भाषांमुळे वेगवेगळ्या समाजांचे वैशिष्ट्य स्पष्ट होते.

प्रत्येक संस्कृतीमध्ये विविध परंपरा आणि रिवाज असतात, जे त्या समाजाच्या लोकांच्या जीवनशैली आणि वर्तनाशी संबंधित असतात. उदाहरणार्थ, हिंदू समाजातील पूजा पद्धती, मुस्लिम समाजातील रमजान व्रत, ख्रिश्चन समाजातील क्रिसमस उत्सव यांसारखे विविध रिवाज समाजाच्या ओळखीचे प्रतीक बनतात. कला, संगीत, नृत्य आणि साहित्य यांमध्ये संस्कृतीचा प्रभाव असतो. प्रत्येक समाजाची विशिष्ट कला शैली, शिल्पकला, नृत्यरूपे आणि संगीत यामुळे ते समाज इतरांपेक्षा वेगळे ठरते. भारतीय शास्त्रीय नृत्य आणि पश्चिमी शास्त्रीय संगीत यांमध्ये स्पष्ट फरक दिसतो. प्रत्येक संस्कृतीमध्ये विशिष्ट धार्मिक विश्वास आणि प्रथा असतात. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, जैन अशा विविध धार्मिक विश्वासांमुळे समाजाच्या जीवनशैलीत विविधता निर्माण होते. या विश्वासांमुळे त्या समाजाची ओळख आणि वेगळेपण ठरते. विविध संस्कृती आपल्या जीवनशैलीमध्ये वेगळेपण दर्शवतात. जसे, परिधान पद्धती, खाद्यसंस्कृती, आणि आचारधर्म यामुळे समाजाचे विशिष्ट वैशिष्ट्य तयार होते. जपानी लोकांची पारंपारिक पोशाख किमोनो, किंवा इटालियन लोकांची खाद्यसंस्कृती यामुळे त्यांचे वेगळेपण लक्षात येते. म्हणजेच, संस्कृतीमुळे समाजाच्या जीवनात

असलेल्या विविध वैशिष्ट्यांमुळे त्याला एक वेगळी ओळख आणि वेगळेपण प्राप्त होते, ज्यामुळे प्रत्येक समाज वेगळा बनतो.

**१२. संस्कृती समाजात ऐक्य निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य करते.**

संस्कृती समाजात ऐक्य निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य करते ती समान मूल्ये, परंपरा, भाषा, आणि विश्वास सामायिक करते. हे लोकांना एकत्र आणते आणि त्यांना समान उद्दिष्टे आणि ध्येयांसाठी एकत्र काम करण्याची प्रेरणा देते. सण, उत्सव, आणि सामाजिक कार्यक्रम यांसारख्या संस्कृतिक घटकांमुळे समाजातील विविध गटांमध्ये एकता आणि बंधुत्व निर्माण होते, ज्यामुळे समाज मजबूत आणि एकजूट राहतो.

**१३. संस्कृतीद्वारे सामाजिकीकरणाचे कार्य पार पडते.**

संस्कृतीद्वारे सामाजिकरणाचे कार्यदेखील केले जाते, कारण संस्कृतीच सामाजिक वर्तन, मूल्ये, नियम, आणि परंपरांचा आदान-प्रदान करते. त्यामुळे व्यक्ती समाजाच्या सदस्य म्हणून वावरण्याची, संवाद साधण्याची, आणि समाजात आपले स्थान ओळखण्याची प्रक्रिया शिकते. संस्कृती व्यक्तीला इतरांशी सुसंवाद साधण्यास, सहकार्य करण्यास आणि योग्य वर्तन करण्यास शिकवते, ज्यामुळे समाजात सामाजिकीकरणाची प्रक्रिया सफल होते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न संच क्र. २**

अ) योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१) हॅरी जॉन्सन यांनी संस्कृतीचे ................ घटक सांगितले आहेत.

अ) दोन ब) तीन क) चार ड) पाच

२) रिचर्ड लापिअर यांनी ................अवस्थेला संस्कृतीचा मानसिक घटक असे नाव दिले आहे.

अ) विचारधारात्मक ब) तंत्रज्ञात्मक क) संघटनात्मक ड) क्रियात्मक

३) तीश्लेर, व्हायटन आणि हंटर यांनी अमूर्त संस्कृतीचे नियमनात्मक संस्कृती आणि ................ संस्कृती असे दोन प्रमुख भाग सांगितले.

अ) भावात्मक ब) तंत्रज्ञात्मक क) बोधात्मक ड) क्रियात्मक

४) ................ यांनी संस्कृतीचे बोधात्मक, नियमनात्मक व भौतिक असे तीन घटक सांगितले आहेत.

अ) रिचर्ड लापिअर ब) व्हायटन क) हंटर ड) डेव्हिड पापिनो

५) संस्कृतीची मुलतत्वे हि प्रामुख्याने ................घटकाशी संबंधित आहेत.

अ) भावात्मक ब) तंत्रज्ञात्मक क) बोधात्मक ड) क्रियात्मक

६) संस्कृती ही . . . . . . . . . . . . . . . . . . नसते.

अ) परिवर्तनशील ब) सार्वत्रिक क) मूर्त ड) अनुकूलनक्षम

७) संस्कृतीद्वारे मानवाचे . . . . . . . . . . . गरजांची पूर्तता होते.

अ) सामाजिक ब) सांस्कृतिक क) आर्थिक ड) राजकीय

**३.३.३.१ सामाजिकरणाचा अर्थ व व्याख्या (Meaning and Definitions of Socialization):**

सामाजिकरण हि समाजशास्त्रातील एक केंद्रीय संकल्पना आहे. काही समाजशास्त्रज्ञांच्या मते समाजिकरण हे व्यक्तीच्या जन्मापासून होत असते. मात्र जन्मतः मानवी मुल हे हाडामांसाचा गोळा असते. प्रसिद्ध विचारवंत जॉन लॉक यांच्यामते, जन्मतः लहान मुलाचे मन हे कोऱ्या पाटीसारखे असते, त्यामध्ये केवळ शारीरिक हालचाली करण्याची क्षमता असते. त्या हालचालीतून ते बालक वेगवेगळ्या गोष्टी शिकते आणि शेवटपर्यंत शिकण्याची प्रक्रिया चालू असते. त्यातून ते एका जैविक प्राण्यापासून सामाजिक प्राण्यात रुपांतरीत होते, या प्रक्रियेस समाजिकरण असे म्हणतात. या समाजिकरण प्रक्रियेला 'ग्रहणप्रक्रिया' (Process of Learning) सुद्धा म्हणतात.

निसर्गाने समाज आणि मानवेतर प्राण्यात निश्चीत असे अंतर निर्माण केले आहे. ते प्रामुख्याने समाज, संस्कृती, बुद्धिमत्ता व भाषा यांनी अधिकच स्पष्ट होते. मानव प्राणी हा समाजात राहतो, कुटुंबात त्याचे संवर्धन होते, भाषेच्या माध्यमातून तो आपले आचार-विचारांची आदान-प्रदान करत असतो, मानव एक आदर्श जीवन जगत असतो. प्रसिद्ध ग्रीक तत्ववेत्ता राज्यशास्त्राचा जनक ॲरीस्टॉटल यांनी 'मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे' (Man is a Social Animal) असे म्हटले.

मानवाला जीवन जगण्यासाठी इतर प्राण्यांप्रमाणे अन्न-पाणी, हवा व निवाऱ्याची नितांत गरज असते. मात्र यापेक्षाही मानवाला परस्परांच्या सहवासाची गरज असते, व्यक्ती समाजात राहून समाजातील वेगवेगळ्या चालीरीती, प्रथा, परंपरा व नियमने आत्मसात करत असतो. जर मनुष्याला या अनेक गोष्टींचे ज्ञान मिळाले नाही किंवा समाजात राहता आले नाही तर तो केवळ एक प्राणी म्हणून जीवन जगू शकेल; मानव प्राणी म्हणून नाही. असामाजिकरण झालेल्या बालकांची अनेक उदाहरणे आहेत; त्यात व्हिक्टर, इसाबेला आणि ॲना यांचा समावेश होतो.

सामाजिकरणाचा अर्थ स्पष्ट करताना अनेक विचारवंतांनी विविध व्याख्या केलेल्या आहेत. त्यातील काही पुढील प्रमाणे आहेत.

१. **ऑगबर्न:** 'ज्या प्रक्रियेमुळे व्यक्ती सामाजिक नियमने आत्मसात करते त्या प्रक्रियेला सामाजिकरण म्हणतात.'

(Socialization is the process by which the individual learns to conform to the norms of the group. - ***Ogburn***)

२. **किंबाल यंग:** 'सामाजिकरण हा जैविक वारसा नसून हि निश्चितपणे शिकण्याचीच बाब आहे.'

(Socialization is definitely a matter of learning and not of biological inheritance. – ***Kimball Young***)

३. **हॉर्टन व हंट:** 'सामाजिकरण हि अशी प्रक्रिया आहे कि ज्यायोगे व्यक्ती आपल्या समूहाची नियमने आत्मसात करते, परिणामतः व्यक्तीमध्ये अन्य असणारे स्व स्पष्टपणे विकसित होऊ लागते.'

(Socialization is the process whereby one internalizes the norms of his group so that a distinct 'self' emerges, unique to this individual. – ***Horton and Hunt***)

४. **हॅरी जॉन्सन:** 'ज्या प्रक्रियेद्वारे व्यक्ती समाजात वावरत असताना आपल्या भूमिका योग्य पद्धतीने पार पडावयास शिकतो त्या प्रक्रीयेला समाजिकरण असे म्हणतात.'

(Socialization is learning that enables the learner to perform social role. – ***Herry Johnson***)

५. ई. एस. बोगार्डस: 'ज्या प्रक्रियेमुळे व्यक्ती परस्पर सहकार्याने एकत्र राहण्यास शिकते. सर्व माणसाच्या कल्याणासाठी, सुखासाठी धडपड करतात व अशा प्रयत्नात स्वेच्छेने काही सामाजिक बंधने व नियंत्रण यांचे पालन करून सामाजिक कर्तव्ये बजावीत स्वतःच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण व समतोल असा विकास साधतात, त्या प्रक्रियेला समाजिकरण असे म्हणतात.'

(Socialization is the process, where by person learn to be have dependably together on behalf of human welfare and I so doing experience social self-contract, social responsibility and balanced personality. - ***Bogardus***)

समाजिकरणाच्या वरील व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला काही ठळक बाबी लक्षात येतात त्या पुढीलप्रमाणे–

१. सामाजिकरण हि निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.

२. सामाजिकरण हे व्यक्तीचे मानवीकरण आहे.

३. सामाजिकरण हि एक अध्ययन प्रक्रिया आहे.

४. सामाजिकरणामुळे व्यक्तीत जिवंत राहण्याची क्षमता निर्माण होते.

५. सामाजिकरण प्रक्रियेद्वार जैविक प्राण्याचे सामाजिक प्राण्यात रुपांतर होते.

**३.३.३.२ सामाजिकरणाच्या अवस्था (Stages of Socialization):**

व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंत निरंतर चालणारी प्रक्रिया म्हणजे सामाजिकरण होय. व्यक्तीचा सर्वांगीण विकास साध्य करत असताना सामाजिकरण महत्वाची भूमिका बजावत असतो. विकास हा वेगवेगळ्या टप्प्यावर होत असल्याने त्यास सामाजिक प्रक्रियेच्या पायऱ्या असेही म्हणतात. प्रसिद्ध

मानसशास्त्रज्ञ एरिकसन व हरलॉक यांनी अनुक्रमे आठ व दहा अवस्थांचा विचार केला आहे. तर टॉलकॉट पार्सन्स व हॅरी जॉन्सन यांनी हि प्रक्रिया मौखिकावस्था, गुदावस्था, इडीपलावस्था व पौगंडावस्था या चार टप्प्यांतून होत असते असे म्हटले. सामाजिकरण हि दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. तथापि ह्या चार अवस्थेत हि प्रक्रिया जास्त तीव्र गतीने होते व पुढे ती मंदावते पण संपूर्णतः कधीच थांबत नाही असे म्हणता येईल. सामाजिकरणाच्या विविध अवस्था पुढीलप्रमाणे आहेत.

### १. मौखिकावस्था (The Oral Stage):

मुल जन्माला आल्यापासून ते दीड वर्षापर्यंत हि अवस्था असते. त्यामुळे सामाजिकरणाची पहिली अवस्था म्हणून या अवस्थेला ओळखले जाते. या अवस्थेत बालकाचा संबंध मातेशी आलेला असतो. बालक आणि माता यांच्यात प्राथमिक तादात्म्य निर्माण झालेले असते. आईचाच प्रभाव सर्वात जास्त त्या बालकावर पडलेला असतो. म्हणून सिग्मंड फ्राईड यांनी असे म्हटले आहे कि, या अवस्थेत मुल सुखतत्वात गुरफटलेले असते. या अवस्थेत आई हीच मुलाच्या केंद्रस्थानी असते. या अवस्थेत मुल पूर्ण आत्मकेन्द्री असते व पुढे हळूहळू जसजसे मोठे होत जाते तसतसे भूक, झोप इत्यादींवर नियंत्रण प्राप्त होत जाते. तसेच भाषेचे प्राथमिक ज्ञान, बसने, उठणे, चालणे अशा क्रिया करते.

### २. गुदावस्था (The Anal Stage):

हि सामाजिकरणाची दुसरी अवस्था दीड ते तीन या काळातील असते. हे वय बालकास वळण लावण्यायोग्य असते. या अवस्थेत बालकात काही प्रमाणात जाणीवा व भावभावना निर्माण होऊ लागतात. हि अवस्था 'शिशु अवस्था' म्हणूनही ओळखली जाते. सिग्मंड फ्राईड यांच्यामते या अवस्थेत बालकाला वास्तव तत्वाची ओळख होऊ लागते. आपले वर्तन हे वस्तुस्थितीला अनुसरून व समाजानुरून असावे याची त्याला जाणीव होते. त्यातून बालक समाजयोग्य बनतो. बालकात परावलंबनाकडून स्वावलंबी जीवन जगण्याच्या दिशेला हि अवस्था घेऊन जाते. त्यामुळे बालक स्वतःची कामे स्वतः करावयास शिकतो.

### ३. इडीपलावस्था (The Oedipal Stage):

या अवस्थेचा कालखंड हा वय वर्ष चार ते बारा वर्षापर्यन्तचा मानला जातो. हा कालखंड मुलाच्या समाजिकरणाच्या दृष्टीने महत्वाचा कालखंड आहे. या काळातील पहिला भाग हा ४–५ वर्षांचा असतो. 'इडीपस गंडाचा काळ' (Oedipus Crisis) म्हणतात आणि त्यानंतरचा ६ ते १२ वर्षापर्यंतचा काळ 'लेटेन्सी काळ'' (Latency Period) म्हणून ओळखला जातो. इडीपलावस्थेत बालकाला लिंगभेदाविषयी स्पष्ट ज्ञान नसले तरी मुलाने व मुलीने कसे वागावे, कोणते वस्त्र परिधान करावे, कोणती भाषा बोलावी हे शिकविले जाते. या अवस्थेतील बालाकांपुढे माता व पिता हे आदर्श असतात म्हणून या अवस्थेला 'तादात्मिकरण अवस्था' असेही म्हणतात. पाच ते सहा वर्षानंतर बालकाचे शाळेतील पदार्पण फार क्रांतिकारक ठरते. कारण बाह्य जगाची ती खरीखुरी सुरुवात असते. शिक्षक व मित्र यांच्याशी ते परिचित होते.

या अवस्थेत बालकाला 'स्व'ची जाणीव होते. इतर व्यक्तींचे त्याच्याबरोबरचे वर्तन व त्याच्याविषयीच्या इतरांच्या प्रतिक्रिया यावरून त्याची स्वतःबद्दलची प्रतिमा त्याच्या मनात आकार घेत असते या त्याच्या 'स्व' संकल्पनेला सी. एच. कुले यांनी 'Looking Glass Self' असे म्हटले. जी. एच. मिड यांनी सामाजिकरणाच्या या अवस्थेत भाषेला विशेष महत्व दिले आहे. भाषेमुळे सामाजिक आंतरक्रिया अधिक अर्थपूर्ण व प्रभावी होतात. या अवस्थेतील बालक एकमेकांसोबत आपले विचार व मत याचे आदान प्रदान करत असतो. त्यामुळे मुलाच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने ही अवस्था मोलाचे योगदान देणारी आहे असे म्हणता येईल.

### ४. **पौगंडावस्था (The Adolescent Stage):**

या अवस्थेत युवकाचे वय १३ ते १९ असते. या अवस्थेला युवावस्था, किशोरावस्था, कौमार्यावस्था व कुमारावस्था असेही म्हणतात. तर या अवस्थेतील युवकांना Teen-Agers असे म्हणतात. हा काळ 'ताण-तणाव व वादळी अवस्थेचा काळ' (Period of Storm and Stress) म्हणून ओळखला जातो. कारण या अवस्थेत युवकाच्या शरीररचनेत बदल होत जातो आणि त्याला/तिला लैंगिक जाणीव निर्माण होऊ लागते. कोणतेही निर्णय घेत असताना त्यांना इतरांच्या मार्गदर्शनाची गरज असते. तसेच याच काळात युवकाला आपल्या शैक्षणिक करिअर व नोकरी विषयी ताण-तणाव निर्माण झालेला असतो. हा परिपक्व व्यक्तिमत्वाकडे नेणारा हा कालखंड असल्याने या काळात युवकावर विशेष लक्ष देऊन योग्य मार्गदर्शन होणे गरजेचे असते. अन्यथा युवकाला ज्या गोष्टींची जाणीव होते तशीच तो कृती करू लागतो मग ती योग्य असो कि अयोग्य. त्यामुळे या अवस्थेत युवकाला योग्य दिशा देऊन त्याचा सर्वांगीण विकास साधण्याकडे विशेष भर असतो.

### ५. **प्रौढावस्था (The Adult Stage):**

प्रौढावस्था हि साधारणतः वय वर्ष २० ते ६० वर्षापर्यंत असते. हि एक व्यक्तीच्या आयुष्यातील दीर्घ अवस्था असून या वयामध्ये व्यक्ती सामाजिक, आर्थिक, राजकीय, व्यावसायिक व सांस्कृतिकदृष्ट्या स्थिरावलेली असते. वेगवेगळ्या भूमिका व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. विवाह झालेला असल्याने घरगुती अडचणी, सामाजिक जबाबदाऱ्या व सामाजिक गरजा यांचा मेळ घालावा लागतो, नवनवीन मुल्यांचा स्वीकार करावा लागतो, प्रत्येक दर्जानुसार विविध भूमिका पार पाडाव्या लागतात. या अवस्थेत मुख्यत्वेकरून मुलाबाळांचा सांभाळ करणे, सांस्कृतिक समारंभात सहभाग नोंदवणे, पती/पत्नीची मर्जी राखणे, पाहुणचार करणे, मुलाबाळांचे विवाह करणे इत्यादी गोष्टी या अवस्थेत शिकल्या जातात. थोडक्यात प्रौढावस्था हि तरुण्यावस्था व वृद्धावस्थेच्या मधली अवस्था आहे.

### ६. **वृद्धावस्था (Old Age Stage):**

वृद्धावस्था ही साधारणतः वयाच्या ६० वर्षापासून ते व्यक्तीच्या मृत्यूपर्यंत असते. असे म्हणतात कि वृद्धापकाळ म्हणजे दुसरे बालपण. त्यामुळे या अवस्थेत व्यक्तीच्या भूमिकेत अमुलाग्र बदल होत असतो.

सामाजिक कार्यातील असहभाग, संबंधातील दुरावा, सामाजिक दर्जाला बाधा येणे इत्यादी घटनांच्या पार्श्वभूमीवर त्याच्या सामाजिकरणाला आणखी अर्थ प्राप्त होतो. या अवस्थेत व्यक्तीला नवीन पिढीतील विचार व कृत्याशी समायोजन करणे शिकावयाचे असते. नवीन पिढीला जुन्या पिढीचे आचार-विचार पटत नाहीत त्यामुळे नवीन पिढीला सुसंस्कारित करत करत नव्या पिढीतील प्रगतीशील बाबींचा स्वीकारहि या अवस्थेत करावा लागतो. उदा. नवीन पिढीला स्वतंत्र जीवन जगावे वाटते तर जगू द्यावे मात्र त्यात स्वैराचाराला थारा देऊ नये याचे सामाजिकरण या अवस्थेत महत्वाचे मानले जाते. मात्र या अवस्थेत बर्याचदा वयस्कर व्यक्ती आमच्या वेळेस अस न्हवत, आम्ही कधी असे राहिलो नाही असे म्हणत नव्या पिढीच्या द्वेषाला बळी पडतात. त्यामुळे नवीन पिढी, नवी मूल्य व नवे विचार यांच्याशी समायोजन साधून जीवन जगण्याची कला शिकण्याची ही मानवी जीवनाची शेवटची अवस्था मानली जाते.

वरील सर्व सामाजिकरणाच्या विविध अवस्थांचा विचार केल्यावर असे लक्षात येते कि, सामाजिकरण हि व्यक्तीच्या आयुष्यातील खूप महत्वाची बाब आहे. सामाजिकरणामुळे व्यक्ती एक आदर्श सामाजिक प्राणी म्हणून समाजात जीवन जगू शकतो. त्यामुळे मानवी जीवन सुखकर होणे सहज सोपे बनते. तसे पाहिले तर सामाजिकरणाची प्रक्रिया हि व्यक्ती, स्थळ, काळपरत्वे विभिन्न स्तरातून होत असली तरी साधारणतः वर उल्लेखित सहा अवस्थांतून व्यक्तीचे सामाजिकरण होत असते. थोडक्यात, व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंत निरंतररित्या वेगवेगळ्या अवस्थांतून मानवी विकास साध्य होत असतो, त्यामुळे प्रत्येक अवस्था तितकीच महत्वाची आहे असे म्हणता येईल.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न संच क्र. ३**

अ) योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१) सामाजिकरण म्हणजे ................होय.

अ) व्यक्तीला शारीरिक बल प्राप्त करणे

ब) समाजातील नियम आणि मूल्यांचा स्वीकार करणे

क) फक्त शाळेतील शिक्षण ड) केवळ कुटुंबातील संस्कार

२) 'सामाजिकरण ही एक अध्ययन प्रक्रिया आहे' हे ................ विचारवंताचे मत आहे.

अ) जॉन लॉक ब) किबाल यंग क) सिग्मंड फ्राईड ड) हॅरी जॉन्सन

३) 'सामाजिकरण हि प्रक्रिया आहे ज्यायोगे व्यक्ती आपल्या समूहाची नियमने आत्मसात करते' असे ................ म्हणाले.

अ) जॉन लॉक ब) सिग्मंड फ्राईड क) ओगबर्न ड) हॅरी जॉन्सन

४) मौखिकावस्था ................ वयाच्या मुलांसाठी आहे.

अ) १ ते २ वर्ष ब) २ ते ३ वर्ष क) ४ ते ५ वर्ष ड) ६ ते १२ वर्ष

५) 'इडीपलावस्था' ................ वयाच्या मुलांसाठी आहे.

अ) ३ ते ५ वर्ष ब) ४ ते १२ वर्ष क) १३ ते १९ वर्ष ड) २० ते ६० वर्ष

६) 'समाजातील चालीरीती, परंपरा आणि नियम शिकण्याची प्रक्रिया' याला ............... म्हणतात.

अ) समाजवादी प्रक्रिया ब) सामाजिक नियंत्रण

क) सामाजिकरण ड) संस्करण

७) 'सामाजिकरण ही एक ............... चालणारी प्रक्रिया आहे.

अ) नियमबाह्य ब) निरंतर क) व्यक्तिगत ड) अल्पकाळ

### ३.३.४.१ सामाजिकरणाची साधने/माध्यमे (Agencies of Socialization):

जन्माला आलेल्या प्राण्याचे मानव प्राण्यात रुपांतर करण्याची प्रक्रिया म्हणजे सामाजिकरण होय. मानवी जीवनात सामाजिकरणाला विशेष महत्व आहे. ज्या घटकांद्वारे सामाजिकरणाची प्रक्रिया घडविली जाते त्यांना सामाजिकरणाची साधने म्हणतात. सामाजिकरणाच्या साधनांचे वर्गीकरण दोन भागात करता येते. ज्या व्यक्तीचे सामाजिकरण होत असते त्या व्यक्तीशी त्याच्या संपर्कातील येणाऱ्या व्यक्तीचे संबंध कशा प्रकारचे असतात या आधारावर हे वर्गीकरण करता येते. प्रत्येक समाजात व्यक्तीवर अधिकार व सत्ता असनाऱ्या व्यक्तींचा एक गट व व्यक्तीचे समानतेचे नाते असलेल्या व्यक्तीचा एक गट असे दोन प्रकारात वर्गीकरण करता येते.

### अ) अधिकारी व्यक्ती: (Authoritarian Agency)

मुलांपेक्षा वयाने, ज्ञानाने, अनुभवाने व अधिकाराने श्रेष्ठ असलेल्या व्यक्तींकडून सामाजिकरणाची प्रक्रिया पार पाडली जाते. अधिकारी व्यक्तींमध्ये आई-वडील, आजी-आजोबा, भाऊ-बहिण, नातेवाईक, शिक्षक, शेजारी इत्यादी व्यक्तींचा समावेश होतो व सर्व व्यक्ती विविध प्रकारे मुलांवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या संस्कार करीत असतात.

### ब) समवयस्क/समानतेचे नाते असलेले व्यक्ती: (Equalitarian Agency)

समानतेचे नाते असलेल्या व्यक्तींमध्ये प्रामुख्याने समवयस्क मित्रांचा गट समाविष्ट होतो. या गटाच्या माध्यमातून सहजपणे सामाजिकरणची प्रक्रिया पार पाडली जाते. समवयस्क व्यक्ती समानधर्मीही असू शकतात. विशेषतः लैंगिक प्रश्न विषयक बाबींची चर्चा याच व्यक्तींकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या होत असते.

सामाजिकरणाच्या प्रक्रियेमध्ये वरील दोन प्रकारच्या व्यक्तींबरोबर काही प्राथमिक व दुय्यम समूहातील साधनांचाही समावेश होतो, त्यांची माहिती पुढील प्रमाणे.

### १. कुटुंब संस्था: (Family Institution)

कुटुंब ही एक सामाजिक संस्था आहे. तसेच कुटुंब एक प्राथमिक पाठशाळा आहे. जन्मापासून व्यक्तीचा कुटुंबाशी संबंध आयुष्यभर राहतो. मुलाच्या सामाजिकरणाचा प्रारंभ कुटुंबातूनच होत असतो.

त्यामुळे कुटुंब हे व्यक्तीचे संस्कार केंद्र आहे असे म्हटले जाते. कुटुंबामध्ये आहार, निद्रा, शरीर व धर्माच्या बाबतीत वळण लागते. कुटुंबातूनच व्यक्ती स्वावलंबी बनते. त्याचबरोबर सामाजिक दृष्टीने कुटुंबातून बालकांना सर्वसामान्य वर्तनप्रकाराचे शिक्षण मिळते. जसे बसने, उठणे, चालणे, बोलणे व इतर वर्तन प्रतीमानाचे धडे कुटुंबातूनच दिले जाते. म्हणून कुटुंब सामाजिकरणाचे महत्त्वाचे माध्यम आहे.

## २. शेजारी: (Neighbourhood)

प्रा. चार्लस एच. कुले यांच्या प्राथमिक समूहात शेजारी हा घटक देखील समाविष्ट आहे. त्यामुळे सामाजिकरणाच्या दृष्टीने शेजारी महत्वाची भूमिका बजावतात. जस जसे मूल मोठे होत जाते तस तसे ते कुटुंब ओलांडून शेजारी खेळण्यासाठी जात असते, बराच काल ते तेथे व्यतीत करत असते, त्यामुळे शेजारी या साधनाद्वारेदेखील सामाजिकरण होत असते. शेजारी जाणे-येणे, निरोप देणे, पोहोचविणे, खाणे-पिणे इत्यादी बाबीमधून मूल शेजाऱ्यांशी व परिस्थितीशी समायोजन साधायला शिकते. शेजारी देखील अधिकारवाणीने मुलावर संस्कार करत असतात. तसेच बालकात सुधारणा करण्यासाठी सूचना करत असतात. म्हणून तर म्हणतात ना कि 'निंदकाचे घर असावे शेजारी'. थोडक्यात, वाईट वृत्तीपासून दूर करायचे कार्य शेजारी करत असतात तसेच बालकावर नियंत्रणदेखील प्रस्थापित करतात यातून बालक योग्य त्या गोष्टींचा स्वीकार करते व अयोग्य गोष्टी टाळते, यातून त्याचे योग्य सामाजिकरण होते.

## ३. मित्रगट: (Peer Group)

प्रा. चार्लस कुले यांनी प्राथमिक समूहात मित्रगटाचा देखील समावेश केला आहे. बालक सवंगड्यांच्या समूहात इतर सदस्यांशी खेळताना, आंतरक्रिया करताना समूहाच्या मूल्यांशी सुसंगत वर्तन करायला ते मूल शिकते, यातूनच सामाजिक जीवनाचे काही संकेत, मुल्ये, नियमने असतात ते त्याला शिकता येते. उदा. एखाद्या संघाकडून खेळताना आपला संघ पराभूत झाला तरी ते मुल खिलाडू वृत्तीने हार स्वीकारून विजयी संघाचे अभिनंदन करते तसेच कधी कधी आपलेच म्हणणे कशे योग्य आहे हे पटवून देण्याचा प्रयत्न करते हे त्याचे वर्तन सामाजिकरणाचे आहे.

## ४. शैक्षणिक संस्था: (Educational Institution)

सामाजिकरणाचे महत्वाचे साधन म्हणून शिक्षण संस्थेकडे पाहिले जाते. शैक्षणिक संस्थेत मुख्यत्वेकरून औपचारिकपणे मुलाच्या सामाजिकरणावर भर दिला जातो. शाळा-महाविद्यालयातील विविध स्पर्धांमध्ये भाग घेणे, वेळेचे बंधन पाळणे, विविध कौशल्य आत्मसात करणे, तसेच विविध विषयांचे ज्ञान प्राप्त करणे इत्यादी माध्यमातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास साधला जातो. भिन्न जाती-धर्माच्या मुला-मुलींबरोबर एकत्र डब्बा खाणे, डब्यातील पदार्थांची देवाण-घेवाण करणे, पुस्तके देणे-घेणे, अभ्यासात स्पर्धा करणे इत्यादीद्वारे मुलाचे समाजिकरण होत असते. बालकाचे सामाजिकरण होण्याच्या अनुषंगाने देशात प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, वरिष्ठ महाविद्यालये व विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहेत, यांद्वारे व्यक्तीचे परिपूर्ण सामाजिकरण होत असते.

### ५. धर्म संस्था: (Religion Institution)

प्रत्येक बालकात धर्मासंबंधी प्राथमिक ज्ञान हे जरी कुटुंबातर्फे दिले जात असले तरी धार्मिक श्रद्धा निर्माण करणे, धार्मिक तत्वज्ञानाची माहिती देणे, धर्मग्रंथाचे पठण करणे इत्यादी बाबींचे औपचारिक ज्ञान, धर्मसंस्थांतर्गत असलेल्या सामाजिक संघटनांतर्गत प्रदान केले जाते. ख्रिश्चन धर्मात चर्च, इस्लाम धर्मात मस्जिद तर हिंदू धर्मात मठ इत्यादी औपचारिक संघटना सामाजिकरणाचे कार्य पार पाडत असतात.

### ६. व्यवसाय गट: (Occupational Group)

वर्तमान काळात व्यक्तीच्या सामाजिकरणाच्या प्रक्रियेत व्यवसाय गटाचे देखील विशेष महत्व आहे. आधुनिकरणामुळे अनेक व्यवसाय संधी प्राप्त होत आहेत. परस्परविरोधी व्यवसायामुळे स्पर्धादेखील वाढते. त्यातून स्वतःचा दर्जा उंचावण्याची संधी मिळते. व्यवसायनीती, पद्धती व बाजारपेठ यांची माहिती होते. वरिष्ठ व कनिष्ठांशी कसे वर्तन करावे हे समजते. विभिन्न व्यवसाय क्षेत्रातून भिन्न-भिन्न प्रकारचा अनुभव मिळत असतो आणि अशा संपन्न अनुभवाच्या जोरावर व्यक्तीचा सर्वांगीण विकास साधला जातो.

### ७. संस्कृती: (Culture)

सामाजिकरणाच्या प्रक्रियेने मनुष्य संस्कृती ग्रहण करीत असतो. समाजाच्या संस्कृतीस तो आपलेसे करून जगत असतो, तो त्या संस्कृतीचा एक भाग होतो. तसेच संस्कृतीच्या माध्यमातून समाजात जीवन जगण्याची कला त्याच्यात विकसित होत असते. संस्कृती मनुष्यास घडवीत असते. कोणती गोष्ट कधी, कशी व का करावी याची जाणीव व्यक्तीस संस्कृतीद्वारे होत असते. उदा. दिवाळीला एकमेकांना फराळाचे वाटप करणे, रमजान ईद रोजी मित्र-मैत्रीनिन्ना एकत्र बोलावून इफ्तार पार्टीचे आयोजन करणे इत्यादी माध्यमातून मुलाचे सामाजिकरण होत असते. त्यामुळे संस्कृती हे देखील सामाजिकरणाचे विशेष साधन आहे असे म्हणता येईल.

### ८. जनसंपर्क माध्यमे: (Mass Media)

आधुनिक काळातील सामाजिकरणाचे महत्वाचे साधन म्हणून जनसंपर्क माध्यमांचा विचार केला जातो. आधुनिक समाजात सामाजिक नियंत्रणाच्या दृष्टीने, सामाजिकरणाच्या दृष्टीने वेगळी व अधिक विकसित अशी माध्यमे आवश्यक होत आहेत. त्यातून प्रसार माध्यमांना महत्व प्राप्त झाले. यामध्ये आकाशवाणी, दूरचित्रवाणी, चित्रपट, संगणक, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादींचा समवेश होतो. या सर्व साधनांमुळे व्यक्तीच्या ज्ञानात भर पडते, समाजातील प्रचलित प्रथा, परंपरांची ओळख होते, नव-नवीन कायद्यांची ओळख होते त्यामुळे व्यक्तीच्या जीवनाला दिशा प्राप्त होते, म्हणून जनसंपर्क साधने हि सामाजिकरणाचे महत्वाची माध्यमे आहेत असे म्हणता येईल.

### ३.३.४.२ सामाजिकरणाचे महत्व (Importance of Socialization):

सामाजिकरण ही व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत निरंतर चालणारी प्रक्रिया आहे, त्यामुळे मानवी जीवनात सामाजिकरणाला विशेष महत्व आहे. मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे, प्राण्याचे म्हणजेच नवजात

अर्भकाचे सामाजिक प्राण्यात रुपांतर करण्याच्या या प्रक्रियेने माणसाला 'माणूसपण' येते. माणसाला माणूस म्हणून जीवन जगण्याची कला शिकण्याची प्रक्रिया म्हणजे सामाजिकरण होय. सामाजिकरणाचे व्यक्तिगतदृष्टीने व सामाजिक दृष्टीने विशेष महत्व आहे ते खालील मुद्यांच्या आधारे सांगता येतील.

**१. सामाजिकरणामुळे व्यक्तीची स्व-संकल्पना विकसित होते.**

सामाजिकरणाद्वारे व्यक्तीची स्वसंकल्पना विकसित होत असते. व्यक्तीला स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव या प्रक्रियेतून होत असते. व्यक्ति जन्मापासून ते मृत्यूपर्यन्त अनेक गोष्टी शिकत जाते, या शिकण्याच्या प्रक्रियेला सामाजिकरण असे म्हणतात. या प्रक्रियेत व्यक्ति स्वतः बद्दलचे मत स्वतः जाणून घेण्याचा प्रयत्न करते, त्यातून व्यक्तीला स्वत्वाची जाणीव होऊ लागते व स्वसंकल्पना विकासिक होते.

**२. सामाजिकरणामुळे मूलभूत शिस्तीचे संस्कार होतात.**

समाजातील नियम, परंपरा आणि मूल्ये व्यक्तींना योग्य वर्तन शिकवतात. हे व्यक्तीला कधी काय करावे, कसे वागावे, आणि इतरांसोबत कसा संवाद साधावा हे समजावून सांगते. समाजाच्या अपेक्षांनुसार वर्तन करून, व्यक्ती शिस्तबद्ध होतात आणि त्यांच्यात सामाजिक जबाबदारी आणि अनुशासन निर्माण होते. यामुळे शिस्तीचे संस्कार होतात.

**३. सामाजिकरणामुळे व्यक्तीच्या मनावर आकांक्षा ठसवल्या जातात.**

सामाजिकरणामुळे व्यक्तीच्या मनावर आकांक्षा ठसवल्या जातात. कारण समाजाच्या मूल्ये, परंपरा आणि अपेक्षांमुळे व्यक्तीला कसे वागावे, काय साध्य करावे आणि कोणते ध्येय ठेवावे याबद्दल मार्गदर्शन मिळते. समाजातील विविध उदाहरणे आणि प्रेरणा व्यक्तीच्या मनावर प्रभाव टाकून त्याच्या इच्छाशक्तीला आकार देतात. त्यामुळे व्यक्तीच्या आकांक्षांमध्ये सुधारणा होऊन त्यात उद्दिष्टांची स्पष्टता येते.

**४. सामाजिकरण व्यक्तीला सामाजिक भूमिका आणि पूरक अभिवृत्ती शिकवते.**

समाजातील विविध परंपरा, मूल्ये आणि नियम व्यक्तीला त्याच्या कर्तव्यांची आणि जबाबदारीची जाणीव करून देतात. व्यक्तीला सामाजिक भूमिका, जसे की कुटुंबातील सदस्य, मित्र, कार्यकर्ता इत्यादी, समजून त्या भूमिकेप्रमाणे वागण्याची शिकवण मिळते. यामुळे व्यक्तीला समजातील इतर लोकांशी सुसंगत व आदर्श वर्तन करणे शिकवले जाते.

**५. सामाजिकरण विविध कौशल्य शिकवते.**

सामाजिकरण विविध कौशल्य शिकवते. कारण समाजात वावरताना व्यक्तीला संवाद कौशल्य, सहकार्य, समस्या सोडवण्याची क्षमता, आणि इतरांशी योग्य वर्तन कसे करावे हे शिकवले जाते. यामुळे व्यक्ती सामाजिक आयुष्यात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेली विविध कौशल्ये आत्मसात करते.

**६. व्यक्तीचा विकास आणि व्यक्तिमत्त्वाची जडणघडण सामाजिकरणातून साध्य होते.**

व्यक्तीचा विकास आणि व्यक्तिमत्त्वाची जडणघडण सामाजिकरणातून साध्य होते. कारण समाजातील परंपरा, मूल्ये आणि नियम व्यक्तीला वर्तनाची आणि विचारांची योग्य दिशा देतात. समाजातील इतरांशी

संवाद साधून, व्यक्ती आपले सामाजिक कौशल्य, विचारशक्ती आणि आचारधर्म विकसित करते, ज्यामुळे त्याचे व्यक्तिमत्त्व सुधारते. सामाजिकरणामुळे व्यक्तीच्या आत्मविश्वासात वृद्धी होते आणि त्याची सामाजिक भूमिका स्पष्ट होते.

**७. सामाजिकरणाद्वारे व्यक्तीला भाषा अवगत होते.**

समाजातील इतर लोकांशी संवाद साधत असताना व्यक्ती भाषेचा उपयोग शिकते. घरातील सदस्य, मित्र, शाळा आणि इतर सामाजिक ठिकाणी व्यक्ती निरंतर भाषेचा अभ्यास करते आणि संवाद साधून ती भाषेची कौशल्ये आत्मसात करते. यामुळे व्यक्तीला त्या समाजाची भाषा आणि संवाद पद्धती अवगत होते.

**८. व्यक्तीच्या सामाजिक वर्तनाला दिशा देण्याचे कार्य सामाजिकरणातून होत असते.**

समाजिकरण ही एक प्रक्रिया आहे ज्याद्वारे व्यक्ती सामाजिक वर्तन शिकते आणि समाजाच्या मूल्य, परंपरा, नीतिमूल्ये, वर्तनाचे नमुने, आणि आदर्श स्वीकारते. यामुळे व्यक्ती समाजात योग्यरित्या वागत असते. सामाजिकरणाद्वारे व्यक्ती आपले कर्तव्य, अधिकार, आणि सामाजिक संबंध समजून घेत असतो, ज्यामुळे त्याचे वर्तन समाजाच्या अपेक्षांनुसार विकसित होते.

**९. संस्कृतीचे जतन, संवर्धन व संक्रमण करण्याचे कार्य सामाजिकरणाद्वारे होत असते.**

सामाजिकरणाद्वारे संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि संक्रमण होण्याचे कार्य पूर्ण होते. सामाजिकरणाच्या प्रक्रियेद्वारे व्यक्ती समाजाच्या परंपरा, मूल्ये, रीतिरिवाज, भाषा, कला, आणि इतर सांस्कृतिक घटक शिकतो आणि त्याचे पालन करतो. तसेच, समाजीकरणामुळे या सांस्कृतिक घटकांचा एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत प्रसार होतो, ज्यामुळे संस्कृतीचे संक्रमण (transfer) आणि संवर्धन (preservation) होत राहते. यामुळे समाजाची सांस्कृतिक ओळख आणि परंपरा कायम राहते.

**१०. सामाजिकरण हे दोन पिढ्यांना जोडणारा दुवा आहे.**

सामाजिकरण हे दोन पिढ्यांना जोडणारा दुवा आहे. कारण यातून जुन्या पिढीच्या सांस्कृतिक मूल्यांचे, परंपरांचे आणि अनुभवांचे शिक्षण नवीन पिढीला मिळते. नवीन पिढी ही जुनी संस्कृती आणि वर्तणुकीचे नमुने शिकते आणि त्यांचा अवलंब करते, त्यामुळे दोन्ही पिढ्यांमधील सांस्कृतिक संपर्क आणि संवाद कायम राहतो. यामुळे परंपरेचे आणि सामाजिक मूल्यांचे संक्रमण सुरळीतपणे होऊ शकते.

**११. सामाजिकरणातून आदर्शभिमूक वृत्तीची जोपासना केली जाते.**

सामाजीकरणाच्या प्रक्रियेत व्यक्तीला समाजातील आदर्श वर्तन, मूल्ये आणि नैतिकता शिकवली जातात. यामुळे व्यक्तीमध्ये आदर्शभिमूक वृत्तीची जोपासना केली जाते, ज्यामुळे तो समाजातील योग्य वर्तनाचे पालन करतो आणि नैतिकदृष्ट्या मजबूत होतो. यामुळे व्यक्तीचे सामाजिक वर्तन अधिक सकारात्मक व संतुलित होतो.

**१२. सामाजिकरण हे व्यक्तीच्या आणि समाजाच्या गरजांची पूर्तता करण्याचे महत्त्वाचे साधन आहे.**

सामाजिकरण हे व्यक्तीच्या आणि समाजाच्या गरजांची पूर्तता करण्याचे महत्त्वाचे साधन आहे. कारण याच्या माध्यमातून व्यक्ती समाजातील नियम, मूल्ये, आणि वर्तन शिकते. यामुळे व्यक्ती समाजातील एक जबाबदार सदस्य बनते आणि समाजाच्या गरजा आणि अपेक्षांनुसार वागत असते. सामाजिक कारण व्यक्तीला सामूहिक जीवनाच्या एक भाग बनवते, ज्यामुळे समाजातील स्थैर्य आणि समरसता राखली जाते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न संच क्र. ४**

अ) योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१) सामाजिकरणाचे खालीलपैकी ................ हे साधन नाही.

अ) कुटुंब ब) मित्रगट क) शेजारी ड) घर

२) आकाशवाणी, दूरचित्रवाणी, चित्रपट, संगणक, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादींचा समावेश ................ होतो.

अ) जनसंपर्क माध्यमे ब) औपचरीक साधने क) प्रचार साधने ड) सामाजिक माध्यमे

३) प्रत्येक बालकात धर्मासंबंधी प्राथमिक ज्ञान हे ................ संस्थेमार्फत दिले जाते.

अ) विवाह ब) कुटुंब क) शिक्षण ड) अर्थ

४) ................ द्वारे व्यक्तीची स्वसंकल्पना विकसित होत असते.

अ) असामाजिकरण ब) व्यवहारीकरण क) सामाजिकरण ड) नियंत्रण

५) सामाजिकरण हे दोन पिढ्यांना जोडणारा ................ आहे.

अ) मार्ग ब) पथ क) पूल ड) दुवा

६) व्यक्तीच्या ................ वर्तनाला दिशा देण्याचे कार्य समाजिकरणातून होत असते.

अ) सामाजिक ब) धार्मिक क) राजकीय ड) सांस्कृतिक

७) सामाजिकरण हे व्यक्तीच्या आणि समाजाच्या ................पूर्तता करण्याचे महत्त्वाचे साधन आहे.

अ) गरजांची ब) अधिकारांची क) व्यवहारांची ड) मतांची

## ३.४ सारांश (Summary):

जैविक प्राण्याचे सामाजिक प्राण्यात रुपांतर करण्याची प्रक्रिया म्हणजे सामाजिकरण होय. सामाजिकरणाच्या वेगवेगळ्या अवस्थांतून व्यक्तीचा व्यक्तिमत्व विकास व्यक्तीच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंत होत असतो, त्यामुळे सामाजिकरण हि अखंड चालणारी प्रक्रिया आहे असे म्हणता येईल. सामाजिकरण होण्यासाठी विविध माध्यमेदेखील तितकीच मोलाची भूमिका पार पाडत असतात. या माध्यमांद्वारे व्यक्तीचे योग्य सामाजिकरण होत असते. थोडक्यात, मानवी जीवनात सामाजिकरणाला विशेष महत्व आहे.

## ३.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ:

**संस्कृती**– उद्दिष्टे साध्य करण्याचे मानवनिर्मित माध्यम, **सामाजिकरण**– शिकण्याची प्रक्रिया, **संचय**–साठा, **संक्रमण**–हस्तांतरण, **नियमने**–कायदे, **अधिकारी व्यक्ति**–अधिकाराने जेष्ठ व्यक्ति, **समवयस्क व्यक्ति–** समान वय असणारे व्यक्ति, **जनसंपर्क माध्यमे–**लोकांपर्यंत माहिती पोहोचविणारी साधने.

## ३.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे:

**स्वयं अध्ययन प्रश्न संच क्र. १ उत्तरे:**

१. ब) सर एडवर्ड टायलर
२. क) मालिनॉवोसकी
३. अ) संस्कृतीचे घटक बदलत नाहीत
४. ड) संस्कृती
५. अ) हार्टन आणि हंट
६. क) मूर्त
७. अ) सामाजिक

**स्वयं अध्ययन प्रश्न संच क्र. २ उत्तरे:**

१. क) चार
२. अ) विचारधारात्मक
३. क) बोधात्मक
४. ड) डेव्हिड पोपिनो
५. क) बोधात्मक
६. क) मूर्त
७. अ) सामाजिक

**स्वयं अध्ययन प्रश्न संच क्र. ३ उत्तरे:**

१. ब) सामाजिक नियमांचा स्वीकार
२. ब) किंबाल यंग
३. क) आगबर्न
४. अ) १ ते २ वर्ष
५. ब) ४ ते १२ वर्ष
६. क) सामाजिकरण
७. ब) निरंतर

**स्वयं अध्ययन प्रश्न संच क्र. ४ उत्तरे:**

१. ड) घर
२. अ) जनसंपर्क माध्यमे
३. ब) कुटुंब
४. क) सामाजिकरण
५. ड) दुवा
६. अ) सामाजिक
७. अ) गरजांची

## ३.७ सरावासाठी प्रश्न :

अ) टीपा लिहा/थोडक्यात उत्तरे लिहा.

१. संस्कृतीचा अर्थ

२. सामाजिकरण म्हणजे काय ?

३. संस्कृतीची वैशिष्टे

४. सामाजिकरणाचे महत्व

५. सामाजिकरणाची साधने

ब) दीर्घउत्तरी/सविस्तर उत्तरे लिहा.

१. संस्कृतीचा अर्थ सांगून संस्कृतीचे घटक सविस्तर स्पष्ट करा.

२. संस्कृतीची व्याख्या देऊन संस्कृतीचे महत्व स्पष्ट कर.

३. सामाजिकरणाचा अर्थ सांगून सामाजिकरणाच्या विविध अवस्था सविस्तर स्पष्ट करा.

४. सामाजिकरणाची साधने उदहरणसह सविस्तर स्पष्ट करा.

५. संस्कृती आणि सामाजिकरणाचा अर्थ सांगून दोहोंचे महत्व सविस्तर स्पष्ट करा.

## ३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके/ संदर्भग्रंथ:


१. डॉ. बी. आर. जोशी : सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिद्धांतांचा कोश समाजशास्त्र-मानवशास्त्र, डायमंड पब्लिकेशन, पुणे (२००८).

२. C. N. Shankar Rao: Principles of Sociology with an Introduction to Social Thought, S. Chand and Company, New Delhi (2012).

३. G. Gurumurthy : Culture and Fertility, Himalaya Publishing House, Delhi (1990).

४. Bhupendra K. Nagla, Sheobahal Singh : Introducing Sociology, Rawat Publications, New Delhi (2019).

५. जे. पी. सिंह : आधुनिक भारत का समाज, रावत पब्लिकेशन्स, दिल्ही (२०१९).

६. प्रा. विजय मारुलकर, प्रा. वेदव्यास गजेंद्रगड : समकालीन भारतीय समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर (२०००).

७. गोविन्द्र चंद्र पाण्डे : समसामायिक भारतीय संस्कृती, राका प्रकाशन, इलाहाबाद (२००७).

८. एस. एम. चांद : भारतीय संस्कृती का विकास, प्रिंट वेल, जयपूर (१९९२).

९. डॉ. शौनक कुलकर्णी : संस्कृती निसर्ग आणि जीवनशैली, डायमंड पब्लिकेशन, पुणे (२००७).

१०. डॉ. सुरेंद्र ठाकूर/ डॉ. श्वेतांबरी कनकदंडे : सामाजिक संस्था, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, (२०१९).

११. डॉ. दा. धो. काचोळे/ प्रा. कल्पना देवकर: नातेसंबंध आणि सामाजिक संस्था, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद (२००२).

१२. प्रा. पवित्रे किशन यादवराव : प्रमुख सामाजिक संस्था आणि समस्या, अरुणा प्रकाशन, लातूर (२०१५).

१३. सुमन पाटे : समाजशास्त्राची रूपरेषा, विद्या प्रकाशन, नागपूर (१९९१).

१४. प्रा. भाऊ दायदार : समाजशास्त्राची रूपरेषा, अंशुल पब्लिकेशन, नागपूर (१९९१).

१५. प्रा. डॉ. सुनील मायी : समाजशास्त्राची ओळख, डायमंड पब्लिकेशन, पुणे (२००८).

१६. डॉ. माणिक माने : समाजशास्त्र परिचय, विद्या प्रकाशन, नागपूर (२०१४).

१७. प्रा. डॉ. विजय मारुलकर/ प्रा. डॉ. दयावती पाडळकर : समाजशास्त्राची मुलतत्वे, फडके प्रकाशन, कोल्हापूर (२०२३).

१८. डॉ. भा. कि. खडसे: समाजशास्त्राची मुलतत्वे, हिमालया पब्लिशिंग हाउस, मुंबई (२००३).

१९. प्रा. पी. के. कुलकर्णी : समाजशास्त्र परिचय, डायमंड पब्लिकेशन, पुणे (२०१३).

२०. प्रा. एन. आर. राउत : समाजशास्त्र परिचय, अंशुल पब्लिकेशन, नागपूर (२००३).

२१. प्रा. डॉ. विजय मारुलकर : समाजशास्त्र परिचय, फडके प्रकाशन, कोल्हापूर (२०२४).

२२. प्रा. डॉ. विजय मारुलकर/ प्रा. डॉ. दयावती पाडळकर : समाजशास्त्र परिचय, फडके प्रकाशन, कोल्हापूर (२०२३).

२३. प्रा. डॉ. विजय मारुलकर/ प्रा. डॉ. दयावती पाडळकर : समाजशास्त्र परिचय, फडके प्रकाशन, कोल्हापूर (२०१८).

२४. प्रा. ए. वाय. कोंडेकर : समाजशास्त्र परिचय, फडके प्रकाशन, कोल्हापूर (२०१४).

२५. प्रा. डॉ. विजय मारुलकर/ प्रा. डॉ. दयावती पाडळकर : उपयोजित समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर (२०१९).

❑❑❑

# घटक ४
# समाजशास्त्राची उपयोगिता
## (Appliations of Sociology)

**घटक संरचना:**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक (Introduction)

४.३ विषय विवेचन (Subject analysis)

४.३.१ समाजशास्त्र एक व्यवसाय (Sociology as a Profession )

अ. धोरण नियोजन (Policy Planning)

ब. अध्यापन (Teaching)

क. संशोधन (Research)

४.३.३ समाजशास्त्र विषयामध्ये व्यवसाय / नोकरीच्या संधी (Carrer Opportunities)

अ. बिगर शासकीय संघटना (Social Sector NGOs)

ब. समाज कल्याण विभागामध्ये असलेल्या संधी (Social Welfare Departments)

क. इतर महत्त्वाच्या क्षेत्रातील रोजगाराच्या संधी (Other Related fields)

४.३.४ सारांश स्वयंअध्ययानासाठी प्रश्नांची उत्तरे

४.५ सरावासाठी प्रश्न

४.६ चिंतन व कार्य

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.१ उद्दिष्टे

विद्यार्थी ज्ञानाबरोबरच त्यांना व्यवसायाभिमुखता तसेच समाजशास्त्र विद्यार्थी कोणत्या-कोणत्या क्षेत्रात अध्ययनानंतर नोकरी करू शकेल याविषयीची अद्यावत माहिती व त्याचा अभ्यास यावर आधारीत आहे. आपल्याला या युनिटच्या माध्यमातून ज्ञान तर मिळणारच आहे त्याचबरोबर समाजशास्त्राच्या उपयोजित ज्ञानाच्या साहाय्याने मस्या कमी करण्यासाठी कोणत्या स्वरूपात विद्यार्थी योगदान देऊ शकतो यांची माहिती मिळणार आहे. अध्यापन, धोरणात्मक नियोजन, संशोधन याबाबत समाजशास्त्राचा विद्यार्थी काय करू शकतो हे ही समजेल.

## ४.२ प्रास्ताविक –

समाजशास्त्र हे व्यवसायाच्या विविध संधी प्राप्त करून देणारे एक महत्त्वाचे सामाजिक शास्त्र आहे. उपयोजन समाजशास्त्र ही एक समाजशास्त्राची महत्त्वाची शाखा आहे. ज्यामध्ये विद्यार्थ्यांना समाजाच्या शास्त्रीय ज्ञानाबरोबर समाजशास्त्र विषयात व्यवसाय अथवा नोकरीच्या संधी वर भर दिला जातो. समाजशास्त्राचे उपयोजन विविध क्षेत्रांमध्ये केले जाते, यामुळे समाजाच्या विकासात मोलाचा वाटा उचलला जातो.

## ४.३ विषय विवेचन

शैक्षणिक संस्थांमध्ये समाजशास्त्र शिकवले जाते ज्यामुळे विद्यार्थ्यांना सामाजिक संरचना, संस्कृती आणि बदल यांची माहिती मिळते. समाजशास्त्राचे उपयोजन विविध क्षेत्रांमध्ये केल्याने समाजाच्या सर्वांगीण विकासात मदत होते आणि सामाजिक समस्या सोडवण्यासाठी प्रभावी उपाययोजना तयार करता येतात. समाजशास्त्र हे समाजातील समस्यांचे विश्लेषण करून त्यावर उपाय शोधण्याचे काम करते. हे प्रत्यक्ष जीवनातील समस्यांना हाताळण्याकरिता समाजशास्त्रीय सिद्धांत आणि पद्धतींचा वापर करते. यामध्ये समाजातील विविध घटकांचा अभ्यास करून त्यांच्या सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक मुद्यावर उपाययोजना केल्या जातात. उपयोजित समाजशास्त्रामुळे समाजातील समस्यांवर प्रभावी उपाय शोधणे सोपे होते आणि समाजाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण भूमिका निभावता येते.

### ४.३.२ समाजशास्त्र एक व्यवसाय

समाजशास्त्राच्या अध्ययनानंतर समाजशास्त्राच्या अभ्यासकांना खालील प्रमाणे विविध क्षेत्रांमध्ये व्यवसायाच्या संधी मिळू शकतात

**अ. धोरण नियोजन** (Policy Planning)

समाजशास्त्राचे अध्ययन करणारे अभ्यासक हे धोरणात्मक नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावत असतात. समाजशास्त्राचे अभ्यासक हे सामाजिक घटकाचा जवळून अभ्यास करत असल्याने अशा अभ्यासकाची समाजासाठी आवश्यकता असते. समाजाच्या विकासासाठी शासकीय यंत्रणेला विशिष्ट असे धोरण ठरवावे लागते, असे धोरण ठरविण्यासाठी व्यापक सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक संदर्भ विचारात घेऊन धोरणे लागू केली जातात. यासाठी तज्ञ सामाजिक अभ्यासक भूमिका पार पाडू शकतात. सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे समाजशास्त्राचे अभ्यासक काम करू शकतात.

**१. सामाजिक समस्यावर उपाययोजना :**

गरिबी, असमानता, अंधश्रद्धा, धर्मांधता, जातीयता आणि भेदभाव यासारख्या अनेक सामाजिक समस्या समाजात असतात. या समस्याबाबत निराकरण करणे अथवा यावर काही उपाययोजना करणे सामाजिकदृष्ट्या

आवश्यक असते. अशा सामाजिक समस्यांची मूळ कारणे शोधणे त्यावर उपाययोजना करणे गरजेचे यासाठी धोरणात्मक नियोजनासाठी समाजशास्त्र अभ्यासकांची गरज असते.

**२. विकास धोरणावर प्रभाव :**

शासकीय स्तरावर सामाजिक हित लक्षात घेऊन विकास केंद्रित विविध धोरणे राबविली जातात. अशा विकास केंद्रित धोरणासाठी सामाजिक अभ्यासक विकास धोरणावर प्रभाव निर्माण करू शकतात. अशा विविध सामाजिक गटांवरील धोरणांच्या संभाव्य परिणामांचे मूल्यांकन करणे आणि संभाव्य अनपेक्षित परिणाम ओळखणे यांसाठी अभ्यासकाची नितांत आवश्यकता असते असे अभ्यासक समाजशास्त्र विषयातून पुढे येऊ शकतात.

**३. संशोधन आणि विश्लेषण:**

कोणतेही धोरण ठरवत असताना त्यात संशोधन आवश्यक असते. समाज हा परिवर्तनशील आहे. त्यामुळे या परिवर्तनाचा मागोवा सातत्याने घेणे आवश्यक असते. परिवर्तनाची स्थिती लक्षात घेऊन समाजामध्ये समस्या अथवा विकास याबाबत धोरणात्मक निर्णयांची माहिती देण्यासाठी अभ्यास तसेच त्यात संशोधन व त्याचे विश्लेषण करणे गरजेचे आहे याबाबत समाजशास्त्र योगदान देऊ शकते.

**४. कार्यक्रम अंमलबजावणी:**

सामाजिक विकासाच्या अनुषंगाने असलेल्या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत समाजशास्त्र तज्ञ महत्वपूर्ण योगदान देऊ शकतात. धोरण कितीही अभ्यासपूर्वक तयार केलेले असले तरी त्याची अंमलबजावणी किती परिणामकारक आहे यावर त्याचे यशापयश अवलंबुन असते. म्हणून अंमलबजावणी अधिक परिणामकारक व्हावी म्हणून सामाजिक अभ्यासकाची मदत घेतली जाते.

**५. मूल्यांकन आणि देखरेख:**

धोरणे आणि कार्यक्रमांच्या परिणामकारकतेचे मूल्यांकन करावे लागते अशावेळी समाजशास्त्र अभ्यासक यांची मदत घेतल्या जाऊ शकते. कोणत्याही योजनेच्या यशापयशाचे मोजमाप हे या योजनेच्या अंमलबजावणीच्या मूल्यमापनानंतर ठरते. त्यामुळे योजनेच्या मूल्यमापनावर देखरेख आवश्यक असते

**६. धोरणकर्ते आणि संस्थांमध्ये तज्ञ सल्लागार–**

समाजशास्त्र अभ्यासक धोरणकर्ते आणि विविध शासकीय निम शासकीय,अशासकीय संस्था यांना तज्ञ् सल्लागार यांची गरज असते. अशा संस्थांना तज्ञ सल्लागार म्हणून सेवा देण्याचे कार्य केले जाऊ शकते. समाजशास्त्र अभ्यासक समाजातील विविध घटकांच्यामध्ये धोरणात्मक नियोजनात कार्य करू शकते. ज्यामध्ये खालील घटकाचा समावेश होऊ शकतो.

**१. आरोग्य सेवा धोरण:**

आरोग्य क्षेत्रात मानवी आरोग्याच्याबाबतीत आरोग्य सेवा धोरणे विकसित करण्यासाठी तज्ञाची गरज असते. समाजाच्या आरोग्याच्या बाबत अनेक समस्या असतात. या समस्या अनेकवेळा अंधश्रद्धा, अज्ञान,

निरक्षरता, पारंपरिकता, आधुनिकता अशा घटकांनी प्रभावित असतात. त्यामुळे आरोग्य सेवा नियोजनात समाजशास्त्रज्ञ, सामाजिक अभ्यासकांची मते लक्षात घ्यावी लागतात. समाजशास्त्र आरोग्य सेवा धोरणांच्या विकासात आणि अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. आरोग्य सेवेत समाजशास्त्र जात, लिंग, आर्थिक स्थिती, शैक्षणिक स्तर, आणि भौगोलिक क्षेत्र यासारख्या विविध घटकांमुळे होणाऱ्या आरोग्य असमानतेचे विश्लेषण केले जाते. या विश्लेषणांमुळे धोरणकर्त्यांना असमानता कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना आखता येतात.

समाजशास्त्र विविध समुदायांच्या आरोग्य गरजा आणि त्यांच्या समस्या ओळखून देण्यास मदत करते. यामुळे धोरणे अधिक लोकाभिमुख आणि समुदायाच्या गरजांशी सुसंगत होतात. समाजशास्त्र आरोग्य संबंधित प्रवृत्ती आणि वर्तनांचा अभ्यास करते. उदाहरणार्थ, तंबाखू सेवन, आहाराच्या सवयी, आणि व्यायाम यासारख्या गोष्टींचे आरोग्यावर कसे परिणाम होतात हे अभ्यासणे. यामुळे आरोग्य संवर्धन धोरणे अधिक प्रभावी बनतात. समाजशास्त्र आरोग्य सेवा वितरण व्यवस्थेचा अभ्यास करते, ज्यामुळे वितरणातील अडचणी आणि समस्यांचे निराकरण करता येते. यामध्ये ग्रामीण आणि दुर्गम भागातील आरोग्य सेवा पुरविण्याच्या समस्यांचा समावेश होतो. समाजशास्त्र आरोग्य सेवा संबंधित सर्वेक्षण आणि संशोधनातून मिळालेल्या माहितीच्या आधारे धोरणे अधिक विज्ञानाधारित बनवते. हे संशोधन आरोग्य सेवेत सुधारणा करण्यासाठी उपयुक्त ठरते.

**२. शिक्षण धोरण:**

समाजाच्या विकासामध्ये शिक्षण हे एक महत्त्वपुर्ण साधन आहे. त्यामुळे शिक्षण तज्ञा बरोबर समाजशास्त्रज्ञ असल्यास शैक्षणिक धोरण अधिक सक्षम होऊ शकते. शैक्षणिक परिणामांवर सामाजिक-आर्थिक स्थितीच्या प्रभावाचे विश्लेषण केले जाऊ शकते. समाजशास्त्र शैक्षणिक धोरणांच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. समाजशास्त्र शिक्षण प्रणालीच्या विविध घटकांना समजून घेण्यास मदत करते. यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, पालक, आणि शाळा व्यवस्थापन यांचा समावेश होतो. या घटकांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास करणे शैक्षणिक धोरणे अधिक प्रभावी बनवते.

समाजातील विविध स्तरांतील विद्यार्थ्यांच्या गरजा ओळखून त्यांच्या शैक्षणिक गरजांची पूर्तता करण्यासाठी समाजशास्त्र उपयोगी ठरते. उदाहरणार्थ, ग्रामीण आणि शहरी भागातील शिक्षणाच्या आव्हानांची ओळख करून देणे. समाजशास्त्र शिक्षणात सामाजिक समानता आणि न्यायाचे महत्त्व पटवून देते. जात, लिंग, आर्थिक स्थिती यासारख्या बाबींमुळे होणारे भेदभाव कमी करण्यासाठी शैक्षणिक धोरणांत बदल सुचवले जाऊ शकतात. समाजशास्त्र शिक्षणाचे महत्त्व आणि त्याचा समाजाच्या विकासातील सहभाग समजून घेण्यास मदत करते. यामुळे शिक्षणाच्या धोरणात सुधारणा करून समाजाच्या प्रगतीस मदत होते.

समाजशास्त्र विविधता आणि समावेशाच्या मूल्यांचे महत्त्व पटवून देतं. यामुळे शैक्षणिक धोरणे अधिक सर्वसमावेशक बनतात, ज्यातून प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी मिळते. समाजशास्त्राच्या या योगदानांमुळे शैक्षणिक धोरणे अधिक परिणामकारक, न्याय्य आणि सर्वसमावेशक बनतात.

### ३. गुन्हे आणि न्याय क्षेत्र:

गुन्हेगार क्षेत्रात धोरणात्मक योगदान अनेक प्रकारे दिले जाते. यात गुन्हेगारीच्या कारणांचा अभ्यास, गुन्हेगारांचे वर्तन, समाजावर होणारे परिणाम आणि गुन्हेगारीच्या प्रतिबंधासाठी उपाययोजना यांचा समावेश आहे. समाजशास्त्रज्ञ गुन्हेगारीच्या विविध सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक कारणांचा अभ्यास करतात. यामुळे गुन्हेगारीला नियंत्रित करण्यासाठी योग्य धोरणे तयार करता येतात. गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध उपाययोजना सुचविल्या जातात. गुन्हेगारांना सुधारण्यासाठी विविध पुनर्वसन कार्यक्रम राबविले जातात. यामध्ये मनोवैज्ञानिक सल्ला, कौशल्य प्रशिक्षण, शिक्षण इत्यादींचा समावेश असतो. समाजशास्त्रज्ञ सरकारला आणि धोरणकर्त्यांना योग्य कायदे आणि धोरणे तयार करण्यासाठी सल्ला देतात. यात न्याय प्रणालीतील सुधारणा, तुरुंगातील सुधारणा, आणि पुनर्वसन कार्यक्रमांचा समावेश असतो. समाजशास्त्रज्ञ समाजातील व्यक्ती आणि गटांना गुन्हेगारीविरोधात साक्षर करतात. यामुळे समाजाच्या सहभागाने गुन्हेगारीचे प्रमाण कमी करण्यात मदत होते. समाजशास्त्राचे हे योगदान गुन्हेगारीविरोधात एक सुसंस्कृत, न्यायी आणि सुरक्षित समाज निर्माण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

### ४. महिला व बाल कल्याण धोरण

महिला व बालकल्याण विभागात धोराणात्मक नियोजन यांसाठी सामाजिक अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते यांची गरज असते. अशा अभ्यासकांची गरज समाजशास्त्र पूर्ण करू शकते. महिला व बाल कल्याण विभागात वारंवार नवी नवी धोरणे यावर विचार करावा लागतो. समाजात हे दोन्हीही घटक सामाजिकहक्काच्या दृष्टीने वंचित असतात. समाजशास्त्राचे योगदान महिला व बालकल्याण धोरणांच्या विकासात महत्त्वपूर्ण आहे. समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून, ही धोरणे विविध सामाजिक घटकांचा आणि संरचनांचा विचार करून तयार केली जातात. समाजशास्त्र समाजाच्या विविध घटक आणि समूहांचा अभ्यास करते. त्यामुळे महिला व बालकल्याण धोरण तयार करताना विविध समाजघटकांची आवश्यकता, समस्या आणि त्यांच्या सामाजिक परिस्थितीची समज प्राप्त होते. समाजशास्त्राच्या मदतीने समाजातील लैंगिक विषमता, बालकामगार, महिला अत्याचार इत्यादी समस्या ओळखता येतात. महिला व बालकल्याण धोरणांतर्गत विविध सांस्कृतिक घटकांचा विचार करून त्या अनुषंगाने उपाययोजना आखता येतात. महिला व बालकल्याण धोरणांच्या प्रभावाची तपासणी करण्यासाठी समाजशास्त्र ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांचे जीवन, आदिवासी महिला आणि बालकांचे प्रश्न इत्यादी विविध पैलूंचा अभ्यास करते. हे धोरण निर्मात्यांना योग्य उपाययोजना आखण्यास मदत करते.

### ५. पर्यावरण धोरण:

पर्यावरण धोरण म्हणजे पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी शासन, संस्था व नागरिकांनी पालन करणाऱ्या धोरणांचा संच होय. या धोरणात पर्यावरणाचे संतुलन राखण्याकरिता विविध उपाययोजना, नियम व कायदे यांची निर्मिती करावी लागते. पर्यावरण धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे पर्यावरणाची गुणवत्ता सुधारून मानव व इतर जीवसृष्टीला सुरक्षित आणि निरोगी वातावरण उपलब्ध करणे. पर्यावरण धोरणात पर्यावरणाचे

संरक्षण राखून आर्थिक व सामाजिक विकास साधणे आवश्यक असते. पर्यावरण संरक्षणाविषयी जनजागृती करणे व पर्यावरण शिक्षणाचे प्रसार करणे हे धोरण विविध स्तरांवर, म्हणजे स्थानिक, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर अंमलात आणले जाते. सरकार, गैर-सरकारी संस्था आणि नागरिकांनी एकत्र येऊन या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी समाजशास्त्र अभ्यासकाची गरज असते.

**ब. अध्यापन** (Teaching)

समाजशास्त्राच्या उच्च शिक्षणाने व्यक्तींना विविध क्षेत्रांमध्ये करिअर करण्याची संधी मिळते. सामाजिक समस्या, धोरणे, आणि गटांच्या आंतरक्रियांचा सखोल अभ्यास करून, समाजशास्त्रज्ञ समाजाच्या विकासात आणि समस्यांच्या सोडवणुकीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. उच्च शिक्षणात समाजशास्त्र विषयाला विविध करिअरच्या संधी उपलब्ध आहेत. समाजशास्त्र हे समाज, सामाजिक संस्था, गट, आणि सामाजिक आंतरक्रियांचा अभ्यास करते, त्यामुळे या विषयात करिअर करण्याच्या अनेक वाटा आहेत. येथे समाजशास्त्रातील काही प्रमुख करिअरच्या संधी दिल्या आहेत:

अध्यापन म्हणजे ज्ञान, कौशल्ये, आणि मूल्ये विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याची प्रक्रिया होय. यामध्ये विविध विषयांवर शिक्षण देणे, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या शंकांचे निरसन करणे, आणि त्यांना त्यांच्या शैक्षणिक आणि वैयक्तिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मदत करणे यांचा समावेश होतो.

अध्यपनात विविध विषयांचे ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आणि व्यावसायिक कौशल्यांचा विकास करणे. नैतिक, सामाजिक, आणि सांस्कृतिक मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवणे. विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक आणि करिअर संबंधित निर्णयांमध्ये मदत करणे. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलता आणि विचारशक्तीला प्रोत्साहन देणे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यांकन करणे आणि त्यांना सुधारण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करणे. अध्यापन हे फक्त माहिती देण्यापर्यंत मर्यादित नसून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रोत्साहन देणारे एक महत्त्वाचे कार्य आहे.

**१. शैक्षणिक पात्रता**

समाजशास्त्र विषय घेतलेल्या अभ्यासकांनी कोणत्याही क्षेत्रात नोकरीं अथवा कार्य करायचे असेल तर किमान प्राथमिक पात्रता पदवी (बी.ए.) होय. त्यांचबरोबर समाजशास्त्र विषयात अधिक ज्ञान मिळवण्यासाठी समाजशास्त्र विषयात पदव्युत्तर पदवी (एम.ए.) घेणे आवश्यक आहे. यासह विद्यार्थी पी. एच. डी. ही शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदवी संपादन करू शकतात. ज्यांनी समाजशास्त्रात बॅचलर किंवा पदव्युत्तर पदवी पूर्ण केली आहे त्यांच्यासाठी भारतातील समाजशास्त्रातील काही संभाव्य करिअरचे मार्ग खालीलप्रमाणे आहेत. अध्यापन क्षेत्रात अनेक प्रकारच्या नोकऱ्यांच्या संधी उपलब्ध आहेत. यापैकी काही प्रमुख संधी खालीलप्रमाणे आहेत:

**२. वरिष्ठ महाविद्यालय-**

समाजशास्त्र विषयासाठी वरिष्ठ महाविद्यालयात, विद्यापीठात व्याख्याता/प्राध्यापक म्हणून अध्यापन करण्यासाठी समाजशास्त्र विषयात पदव्युत्तर पदवी (एम. ए.) घेणे आवश्यक आहे. एम. ए. पदवी

घेतल्यानंतर राष्ट्रीय पात्रता चाचणी, छएढ, राज्यस्तरीय पात्रता चाचणी SET किंवा पी. एच. डी. प्राप्त पात्रता संपादन केल्यास संधी मिळू शकते. सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, प्राचार्य तसेच इतर लाभाच्या पदावर काम करता येते.

**३. कनिष्ठ महाविद्यालय**

समाजशास्त्र विषयात कनिष्ठ महाविद्यालयात कनिष्ठ अध्यापक म्हणून अध्यापन करण्यासाठी समाजशास्त्र विषयात पदव्युत्तर पदवी (एम. ए.) घेणे आवश्यक आहे. एम. ए. पदवी घेतल्यानंतर बी. एड केल्यास कनिष्ठ अध्यापक म्हणून काम करण्याची संधी मिळू शकते.

**४. ऑनलाइन शिक्षण**

अलीकडच्या काळात आभासी साधनांच्या माध्यमातून विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर (जसे की Coursera, Udemy, Unacademy) या प्लॅटफॉर्मवर शिक्षक म्हणून ऑनलाइन कोर्सेस बनवू शकता.या प्लॅटफॉर्मवर शिक्षण क्षेत्रात अध्यापनाची संधीचे अधिक व्यापक होत आहे.

**५. शिक्षण संशोधनकर्ता** (Educational Researcher)-

शिक्षण क्षेत्रात संशोधनाला खूप महत्त्व आहे. समाजशास्त्र विषय समाजाशी निगडित असल्याने समाजातील स्थित्यंतर अधिक प्रभावीपणे अधोरेखित करू शकतात. यासाठी संशोधन होणे आवश्यक असते. ज्या विद्यार्थ्यास शैक्षणिक संशोधनात रुची आहे त्यांना अध्यापन क्षेत्रात संशोधन करत शकता येऊ शकते.

**६. विद्यार्थी सल्लागार** (Student Counselor):

विद्यार्थ्यांना शैक्षणिक, करिअर आणि वैयक्तिक मार्गदर्शन देण्याचे काम समाजशास्त्र अभ्यासक करू शकतात. समाजशास्त्राचा विद्यार्थी स्वतःचे करिअर कसे करू शकेल यावर भाष्य करु शकतो.

**७. लेखक** (Educational Content Writer):

समाजशास्त्र विषय समाजाच्या विविध घटकाचा अभ्यास करत असते. या अभ्यासाचा उपयोग सामाजिक घडामोडीच्या अनुषंगाने लिखाण करून केला जाऊ शकतो. विविध प्रकाशनांसाठी किंवा शैक्षणिक वेबसाइट्सवर अभ्यासक लेखन करू शकतात.

**८. प्रशिक्षक** (Trainer):

समाजाच्या अभ्यासकांची समाजातील अनेक घटकांना गरज असते. अशावेळी समाजशास्त्र अभ्यासक प्रशिक्षकाच्या भूमिकेत शिक्षकांसाठी किंवा विविध संस्थांमध्ये प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करून प्रशिक्षण देऊ शकतात.

अध्यापन क्षेत्रात तुम्हाला वरीलप्रमाणे आवड व कौशल्यांनुसार योग्य संधी निवडता येतील.

**क. संशोधन** (Research)

समाजशास्त्र (Sociology) हा समाजातील विविध घटक, सामाजिक संबंध,सामाजिक संस्था, सामाजिक समूह यांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. यामध्ये मानवी वर्तन, सामाजिक समस्या आणि सामाजिक बदल यांचा सखोल अभ्यास केला जातो. समाजाच्या बदलत्या घटकाच्या अभ्यासाबरोबरच समाजाच्या येऊ घातलेल्या स्थित्यंतराचा शोध समाजात घ्यावा लागतो. त्यामुळे ही गरज पूर्ण करण्यासाठी समाजशास्त्र विषयात संशोधन आणि नोकरीच्या संधी निर्माण होत असतात. यातील महत्त्वपूर्ण गोष्टी खालीलप्रमाणे आहेत:

**१. सामाजिक समस्या आणि उपाययोजना:-**

समाजामध्ये गरिबी, शिक्षण, बेरोजगारी, गुन्हेगारी, आरोग्य, ग्रामीण महिला, आदिवासी महिला यांच्या समस्या इ. यावर समाजशास्त्रात संशोधन केल्या जाऊ शकते. अशा समस्यांवर करणे उपाययोजना सुचवून या समस्यांवर काम करणाऱ्या संस्था तसेच शासकीय यंत्रणेला संशोधन निष्कर्ष दिले जातात .

**२. सांस्कृतिक अभ्यास:-**

समाजशास्त्र संस्कृतीचा अभ्यास करते. विविध संस्कृती, परंपरा, आणि सामाजिक नियमांचा अभ्यास समाजशास्त्रात केला जातो. सांस्कृतिक घटक तसेच सांकृतिक विविधता यामध्ये समाजशास्त्र अभ्यासकास संशोधनाची संधी असते. शासन स्तरावर सांस्कृतिक विभाग कार्यरत असून त्यांना काही सूचना समाजशास्त्र संशोधक सुचवू शकतात.

**३. सामाजिक परिवर्तन:**

समाज हा परिवर्तनशील आहे. समाजातील बदल, त्यांचे परिणाम आणि कारणे याचा सातत्याने शोध घ्यावा लागतो. यासाठी समाजशास्त्र अधिक उपयुक्त ठरते. परिवर्तनशील परिणाम जाणून घेण्यासाठी समाजात अनेक संस्था उत्सुक असतात. यामध्ये शासनस्तरापासून, प्रसारमाध्यमे तसेच इतर संस्था असतात. अशा संस्थांशी संपर्क करून संशोधक स्वतःचे करिअर करू शकतो.

**४. नवीन सामाजिक धोरणे:-**

शासकीय, निमशासकीय तसेच आणि गैरसरकारी संस्थांसाठी नवीन धोरणे तयार करण्यासाठी समाजशास्त्रीय संशोधनाची गरज असते. समाजात सातत्याने लहान मुले-मुली, तरुण, वृद्ध, महिला, तसेच विविध सामाजिक समस्या याबाबत नवीन धोरणे राबवावी लागतात. यासाठी समाजशास्त्र अभ्यासक यांचे सहकार्य होऊ शकते.

**५. सर्वेक्षण आणि तथ्य विश्लेषण:**

वर्तमान काळात अनेक लोकांचे कल, आवड, मते, प्रवाह, विचार इ. शिक्षण, राजकीय, औद्योगिक, तसे इतर क्षेत्रात आवश्यक असतात. याबाबत समाजातील विविध गटांवरील सर्वेक्षणे घेऊन त्यांचे विश्लेषण केले जाऊ शकते. संशोधन करण्यासाठी खालील क्षेत्रात संधी मिळून शकते.

६. **शिक्षण क्षेत्र –**

शिक्षण क्षेत्रात समाजशास्त्र विषयाचे प्राध्यापक म्हणून काम करत असताना एक संशोधक म्हणूनही स्वतः ला यश संपादन करण्याची संधी मिळू शकते. शासनस्तरावर तसेच खाजगी (उदा. औद्योगिक) क्षेत्रात संशोधकाला स्वतःचे करिअर करण्याची संधी आहे. यासाठी संबंधित क्षेत्र आर्थिक लाभ सुद्धा देते.

**७. उद्योग क्षेत्र :**

उद्योग क्षेत्रात अनेक लोक कामगार, पर्यवेक्षक, व्यवस्थापक, मालक, तसेच इतर तत्सम पदावर काम करत असतात. उद्योगाचा व समाजाचा संबंध येत असतो. यासाठी उद्योग क्षेत्राला संशोधनाची यांची गरज असते. ही गरज समाजशास्त्र पूर्ण करू शकते.

८. **प्रसार माध्यमे आणि पत्रकारिता:–**

सामाजिक विषयावर लेखन, संपादन, आणि विश्लेषण याची जबाबदारी प्रसार माध्यमे पार पाडत असतात. प्रसारमाध्यमांना समाजाचे सखोल अध्ययन करणाऱ्या अभ्यासकांची गरज असते. समाजाचे सखोल अध्ययन हे समाजशास्त्रात केले जाते. सामाजिक क्षेत्रात संशोधन करून सामाजिक वास्तव समाजासमोर आणणे ही भूमिका समाजशास्त्राच्या अभ्यासकाच्या माध्यमातून केले जाऊ शकते. त्यामुळे अशा अभ्यासकांची गरज प्रसार माध्यमे (Media) असते.

९. **मानवाधिकार संस्था:–**

मानवी मूल्याचे हनन, सामाजिक शोषण अनेकदा समाजात होत असते. अशावेळी मानवी मूल्याचे जतन व्हावे ज्यांच्यावर असे अन्याय, अत्याचार झाले आहे अशा पिडितांना न्याय मिळवून देण्यासाठी अनेक मानवाधिकार संस्था जागतिक स्तरापासून स्थानिक स्तरावर कार्यरत असतात. अशा संस्थांमध्ये अमानवी कृत्याबाबत न्यायपूर्ण भूमिका मांडण्यासाठी संशोधन करणाऱ्या व्यक्तींची गरज असते, असे अभ्यासू लोक समाजशास्त्र  विषयातुन पुढे येऊन या मानवाधिकार संस्थांमध्ये संशोधनात्मक कार्य करू शकतात.

समाजशास्त्र संशोधन संस्था भारतात अनेक ठिकाणी आहेत. काही प्रमुख संस्था खालीलप्रमाणे आहेत

१. **टाटा सामाजिक विज्ञान संस्था** (Tata Institute of Social Sciences, TISS) –

टाटा सामाजिक विज्ञान संस्था किंवा टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस ही समाजकार्य व समाजसेवा यांसाठी शास्त्रशुद्ध संशोधन करणारी व प्रशिक्षण देणारी आशिया खंडातील पहिली संस्था आहे. सर दोराबजी टाटा ग्रॅज्युएट स्कूल ऑफ सोशल वर्क या नावाने १९३६ मध्ये मुंबई येथे याची स्थापना झाली. १९४४ मध्ये टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस असे नामकरण करण्यात आल आज TISS ही भारतातील प्रमुख शैक्षणिक संस्थांपैकी एक आहे. मानव संसाधन आणि सामाजिक कार्यातील व्यावसायिकांना प्रशिक्षण देणे, सामाजिक समस्या आणि सामाजिक विज्ञानांवर संशोधन करणे, तसेच

समाजाच्या फायद्यासाठी ही माहिती प्रकाशित आणि प्रसारित करते. अध्यापन आणि प्रशिक्षणाव्यतिरिक्त, प्राध्यापक क्षेत्र-कृती प्रकल्प आयोजित केले जातात.

**२. भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद –**

(Indian Council of Social Science Research, ICSSR)-

भारतीय सामाजिक विज्ञान परिषद Indian Council of Social Science Research (ICSSR), नवी दिल्ली ची स्थापना सन १९६९ मध्ये झालेली असून ही एक स्वायत्त संस्था आहे. जी भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागाच्या अंतर्गत कार्यरत आहे. ही भारतातील सामाजिक विज्ञान संशोधनाला चालना देण्यासाठी आणि निधी पुरवणारी सर्वोच्च राष्ट्रीय नोडल परिषद आहे. भारतीय सामाजिक विज्ञान परिषद भारतात सामाजिक शास्त्रज्ञांचे प्रतिनिधित्व करत आहे, त्यांची विचारधारा, वैज्ञानिक दृष्टिकोन किंवा वैचारिक मत सामाजिक क्षेत्रात गरजेचे असते. भारतीय सामाजिक विज्ञान परिषदेच्या नियामक मंडळात देशभरातील प्रख्यात सामाजिक शास्त्रज्ञ, संशोधक आणि शिक्षणतज्ञांचा समावेश आहे जे सामाजिक विज्ञानांच्या विकासासाठी आणि संवर्धनासाठी कार्यरत आहेत. या क्षेत्रात संस्थेतही समाजशास्त्र अभ्यासकास संधी आहे.

**३. दिल्ली स्कूल ऑफ इकोनॉमिक्स** (Delhi School of Economics, DSE) –

सामाजिक शास्त्रांमध्ये प्रगत शिक्षण आणि संशोधनासाठी केंद्र १९४९ मध्ये दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सची स्थापना झाली. ते आजही प्रगत प्रशिक्षण आणि दक्षिण आशियातील अग्रगण्य केंद्र आहे. अर्थशास्त्र, भूगोल आणि समाजशास्त्र मध्ये संशोधन अर्थशास्त्र, भूगोल आणि समाजशास्त्र जे दिल्ली विद्यापीठाच्या सामाजिक विज्ञान विद्याशाखेचा भाग आहेत.

**४. गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स**

(Gokhale Institute of Politics and Economics, GIPE)

सन १९०५ मध्ये शिक्षणास चालना देण्यासाठी व भारतीय लोकांमध्ये क्षमता वाढविण्याच्या उद्देशाने सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीची स्थापना गोपाळ कृष्ण गोखले यांनी केली, गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संशोधन संस्था हे पुण्यातील एक अभिमत विद्यापीठ आहे. या संस्थेलाच गोखले इंस्टीट्यूट म्हणूनही ओळखले जाते. भारतीय समाजातील सामाजिक-आर्थिक परिमाणांचे संशोधन करण्यासाठी ही संस्था कार्यरत आहे. संस्थेने अनुभवजन्य आणि विश्लेषणात्मक संशोधनावर भर दिला जातो. यामध्येही समाजशास्त्र अभ्यासकास संशोधनामध्ये यश संपादन करता येते.

सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसाइटीज (Centre for the Study of Developing Societies, CSDS) – नवी दिल्ली, मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज (Madras Institute of Development Studies, MIDS) – चेन्नई, तमिळनाडू येथे समाजशास्त्र विषयात अभ्यासकास संशोधन

करता येते व जीवनात यश संपादन करता येते. या संस्थांमध्ये समाजशास्त्र, सामाजिक विकास, सामाजिक परिवर्तन, आणि विविध सामाजिक विषयांवर संशोधन केले जाते.

### ४.३.३ **समाजशास्त्र विषयामध्ये व्यवसाय / नोकरीच्या संधी** (Carrer Opportunities)

**अ. बिगर शासकीय संघटना** (Social Sector NGOs)

समाजशास्त्रातील शिक्षणामुळे सामाजिक समस्यांचे सखोल ज्ञान मिळते, जे एनजीओच्या कामात महत्त्वपूर्ण ठरते. या क्षेत्रात काम करताना समाजासाठी काम केल्याचे समाधान मिळते. तसेच व्यावसायिक विकासाच्या संधीही उपलब्ध होतात. एनजीओ (NGO) म्हणजे नॉन-गव्हर्नमेंटल ऑर्गनायझेशन किंवा गैर-सरकारी संस्था. या संस्था सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय, आरोग्यविषयक आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये कार्य करतात. यामुळे एनजीओ समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावतात.

**१. स्वतःची एन.जी.ओ. स्थापन करणे**

स्वतःची एन.जी.ओ. स्थापन करणे हे एक महत्त्वपूर्ण आणि समाजोपयोगी काम असू शकते. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सशक्तीकरण, बालकल्याण इत्यादी. क्षेत्रात कार्य करण्यासाठी एन.जी. ओ. स्थापन करू शकता. एन.जी.ओ. आणि त्यांची कार्यपद्धती, चांगल्या प्रथांना समजून घेऊन कायद्यानुसार एन.जी.ओ. नोंदणी करावी लागेल. भारतात, एन.जी.ओ.ला सोसायटीज रजिस्ट्रेशन एक्ट, १८६० अंतर्गत नोंदणी करता येते.

एन.जी.ओ.मध्ये समाजशास्त्र अभ्यासकास करिअर करण्यासाठी अनेक संधी आहेत. एन.जी.ओ. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक क्षेत्रांमध्ये सामाजिक उद्दिष्ट समोर ठेऊन कार्य करतात. एन.जी.ओ.मध्ये समाजशास्त्र अभ्यासकास करिअर करण्याच्या खालीलप्रमाणे संधी आहेत. :

**२. प्रकल्प व्यवस्थापक** (Project Manager):

जी.ओ.मध्ये अनेक प्रकल्प हाती घेतले जातात. प्रकल्पांचे नियोजन, अंमलबजावणी, निगराणी करणे प्रकल्पाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सामाजिक ज्ञान असणारे तसेच तज्ज्ञ यांची गरज असते असे तज्ज्ञ प्रकल्प व्यवस्थापक म्हणून कार्य करू शकतात.

**३. निधीसंकलक** (Fundraiser):

एन.जी.ओ. या शासकीय नसल्याने त्यांना शासन आर्थिक सहकार्य करतेच असे नाही. यासाठी या घटकावर त्यांना निधी संकलनासाठी अवलंबून रहावे लागते. अशावेळी समाजाशी जवळीक असणारे तसेच समाजाशी सुसंवाद करू शकणाऱ्याची त्यांना गरज असते हे समाजशास्त्र अभ्यासक चांगले करू शकतो. यासाठी निधीसंकलक म्हणून संधी मिळू शकते.

**४. जनसंपर्क अधिकारी** (Public Relations Officer):

जी.ओ.च्या कार्याची माहिती शासन तसेच लोंकापर्यंत पोहचणे आवश्यक असते. यासाठी संस्थेला जनसंपर्क अधिकारीची गरज असते. अशा जनसंपर्क अधिकाऱ्यांची भूमिका समाजाची माहिती असणारा अधिक चांगल्या पद्धतीने पार पडू शकतो. यासाठी जनसंपर्क अधिक वाढविणे गरजेचे असते.

**५. क्षेत्र अधिकारी** (Field Officer):

प्रकल्पांच्या क्षेत्रीय अंमलबजावणीवर देखरेख ठेवणे जे प्रकल्प राबविले जात आहेत अशा लाभार्थ्यांशी संवाद साधणे आणि त्यांचे फीडबॅक घेणे. क्षेत्रीय कर्मचारी तसेच स्वयंसेवकांमध्ये समन्वय साधण्यासाठी क्षेत्र अधिकारी असे पद असतात या पदावर पण समाजशास्त्राचे विद्यार्थी काम करू शकतात.

**६. स्वयंसेवक** (Volunteer):

एन.जी.ओ. मध्ये प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात जाऊन काम करण्यासाठी स्वयंसेवकांची गरज असते. प्रत्येक एन.जी.ओ स्वयंसेवकांची भरती करत असते. अशावेळी समाजशास्त्र विद्यार्थ्यांना एन.जी.ओ मध्ये स्वयंसेवक म्हणून काम करण्याची संधी असते.

**७. स्वयंसेवक समन्वयक** (Volunteer Coordinator):

प्रत्येक एन.जी.ओ.मध्ये नवीन स्वयंसेवकांची भरती केली जाते. त्यामुळे नवीन एन. जी.ओ मध्ये स्वयंसेवकांना एन.जी.ओ. प्रक्षिशण देण्यासाठी स्वयंसेवक समन्वयक यांची नियुक्ती केली जाते. अशा पदावर काम करण्याची संधी समाजशास्त्र अभ्यासकास संधी असते. कार्यक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी करणे स्वयंसेवकांचे काम व्यवस्थापित करणे आणि त्यांना मार्गदर्शन करणे.अशी कामे या पदावर केली जातात.

**ब) समाजकल्याण विभागात व्यवसायिक संधी**

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, महिला, मुलं, वृद्ध, अपंग आणि अनुसूचित जाती-जमातीं यांचा सामाजिक जीवनाचा दर्जा उंचवण्यासाठी शासनाने समाजकल्याण विभागाची स्थापना केली. दिनांक ५ नोव्हेंबर १९२८ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह १० सदस्यांचा समावेश असलेल्या समितीने एक अहवाल १९३० साली शासनास सादर केला. यामध्ये मागास समाजासाठी १९३२ साली बॅकवर्ड क्लास वेलफेअर डिपार्टमेंटची स्थापना शिफारस करण्यात आली. दिनांक २३ सप्टेंबर १९५७ मध्ये मुख्य निरीक्षक प्रमाणित शाळा आणि संचालक, बॅकवर्ड क्लास वेलफेअर या दोन कार्यालयांचे एकत्रीकरण करुन समाज कल्याण संचालनालयाची स्थापना करण्यात आली. समाज कल्याण विभागाची निर्मिती होऊन शिक्षण व समाज कल्याण अशी विभागणी माहे मार्च १९७२ मध्ये झाली. समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग असे नामकरण सन १९८३ मध्ये करण्यात आले. मार्च १९९९ मध्ये समाज कल्याण विभागाचे विभाजन करुन विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग अशी

स्वतंत्र विभागाची स्थापना करण्यात आली. फेब्रुवारी २००१ मध्ये समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभागाचे नाव सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा विभाग असे करण्यात आले

हा विभाग समाजातील दुर्बल, गरजू आणि मागासवर्गीय घटकांच्या विकासासाठी काम करणारा एक महत्त्वाचा शासकीय विभाग आहे. या विभागाच्या माध्यमातून समाजातील व्यक्तीला न्याय, समानता आणि विकासाच्या समान संधी दिल्या जातात. समाजकल्याण विभाग शासन समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबवत असते या योजनांची प्रत्यक्ष अमलबजावणी काम करत असतो. समाज कल्याण विभाग समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, महिला, मुलं, वृद्ध, अपंग आणि अनुसूचित जाती-जमातींना सामाजिक जीवनाचा दर्जा उंचवण्याची कार्यरत असणारा विभाग आहे. समाज कल्याण विभागाचे समाजाशी घट्ट नाते आहे. समाज कल्याण विभागाला शासनाचा हेतू साध्य करण्यासाठी कुशल मनुष्यबळ आवश्यक असते. यासाठी समाजाचा अभ्यास असणारा समजाविषयी माहिती असणाऱ्या अभ्यासकांना संधी मिळू शकते. यात समाजशास्त्र अभ्यासकांना प्राधान्य मिळू शकते. या विभागात असलेल्या व्यवसायिक संधींमुळे सामाजिक बांधिलकी जपली जाते. वंचित घटकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणणे समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध योजना, कार्यक्रम आणि उपक्रमांचे आयोजन समाज कल्याण विभागामार्फत करण्यात येते. आजच्या बदलत्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत समाजकल्याण विभागाच्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी या विभागातील व्यावसायिक संधींचे महत्व उत्तरोत्तर वाढत आहे.

समाज कल्याण विभागाचा मुख्य उद्देश म्हणजे समाजातील वंचित आणि दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी आणि समतोल सामाजिक विकासासाठी प्रयत्न करणे होय. समाज कल्याण विभाग समाजातील वंचित गटांना सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या सक्षम बनविण्याचे कार्य करते. समाज कल्याण विभागाच्या कार्यक्षेत्रातील शिष्यवृत्ती योजना, महिलांच्या सक्षमीकरणासाठीच्या स्वावलंबन योजना, अपंग व्यक्तींसाठी पुनर्वसन केंद्रे, आणि वृद्ध व्यक्तींना आधार व संरक्षण सुविधा यामुळे समाजातील सामाजिक स्तरीकरण कमी करण्यास करतात. यामुळे समाजात समतोल विकासाचा मार्ग तयार होतो आणि प्रत्येक घटकाला मुख्य प्रवाहात सामावून घेण्यास मदत होते. समाज कल्याण विभागाच्या अंतर्गत महिला आणि बालविकास, अपंग कल्याण, मागासवर्गीय विकास, अल्पसंख्यांक विकास, आदिवासी विकास, वृद्ध आणि अनाथ कल्याण, समाज पुनर्वसन, हे सर्व विभाग समाजातील दुर्बल, मागास, आणि गरजू घटकांच्या उत्थानासाठी कार्यरत आहेत. यामधील प्रत्येक विभागाचे कार्यक्षेत्र आणि योजनांमधून समाजाचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो.

**समाजशास्त्र विद्यार्थ्याला व्यावसायिक संधी:**

समाज कल्याण विभागात अनेक व्यावसायिक संधी उपलब्ध आहेत. यामध्ये सामाजिक कार्यकर्ते, समुपदेशक, शिक्षक, आरोग्य सेवक, पुनर्वसन तज्ञ, इत्यादींचा समावेश होतो. विभागामार्फत समाजाच्या विकासासाठी आणि उत्थानासाठी कार्य करणाऱ्यांना उत्तम करिअर संधी दिल्या जातात.

समाज कल्याण विभाग हा सामाजिक हित जोपसत असतो. त्यामुळे सामाजिक अभ्यासक यांना यां विभागात काम करण्याची संधी अधिक आहे. समाज कल्याण विभागामध्ये अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. या विभागात काम करताना समाजाच्या गरजू आणि वंचित घटकांसाठी कार्य करण्याची संधी मिळते. समाज कल्याण विभागात काम करण्यासाठी विविध कौशल्यांची आणि शिक्षणाची आवश्यकता असते. समाज कल्याण विभागात समाजशास्त्र अभ्यासकास रोजगाराच्या संधीं खालील प्रमाणे मिळू शकतात.

१. **समाजकल्याण अधिकारी** (Social Welfare Officer):

समाज कल्याण विभागात महाराष्ट्रात विविध विभाग आहे. यां विभागात समजकल्याण अधिकारी यांची नियुक्ती शासन करत असते. समाजातील वंचित, मागासवर्गीय, दिव्यांग आणि वृद्ध लोकांसाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्याची प्रत्यक्ष शासकीय योजनाची अंमलबजावणी करण्याची साठी समाजकल्याण अधिकारी यांची नियुक्ती केल्या जाते. यां पदावर काम करण्यासाठी समाजशास्त्र अभ्यासकांची गरज असते. त्यामुळे समाजशास्त्र पदवी, पदव्युत्तर विद्यार्थी यांना संधी असते.

२. **महिला आणि बालविकास अधिकारी:** (Women and Child Development Officer)

महिला व बालकल्याण अधिकारी या पदावर काम करण्यासाठी समाजशास्त्रीय अभ्यासकाला संधी मिळते. यामाध्यमातून महिलांच्या आणि मुलांच्या हक्कांचे संरक्षण आणि कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य येते. या पदावरील अधिकारी महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करतात. महिलांच्या शोषण, अत्याचार, मुलांची तस्करी आणि बालमजुरी यांसारख्या गंभीर समस्यांवर ते कार्यरत असतात. मुलांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना तयार करणे आणि पोषण आहार योजनांचा अंमल यांची जबाबदारीही त्यांच्यावर असते.

महिलांसाठी स्वयंरोजगार योजना, आर्थिक मदत, प्रशिक्षण कार्यक्रम, आणि उद्योजकता विकासाच्या योजना राबवणे हे या पदावरील अधिकाऱ्याचे काम असते. त्याचबरोबर, बालसुधारगृह, आश्रयगृह, आणि महिलांच्या पुनर्वसन केंद्रांसारख्या संस्थांवर देखरेख ठेवण्याचे काम देखील या अधिकाऱ्यांना करावे लागते. समाजातील महिलांच्या आणि मुलांच्या कल्याणासाठी महत्त्वाची भूमिका बजावताना, ते विविध धोरणांची अंमलबजावणी करून समाजातील बदल साधण्यास मदत करतात

३. **शिक्षण आणि प्रशिक्षण समन्वयक:**

समाज कल्याण विभागात समन्वयक आणि प्रशिक्षक म्हणून काम करण्यासाठी अनेक संधी उपलब्ध असतात. विभागाचे मुख्य उद्दिष्ट समाजातील वंचित गटांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवणे असते. या भूमिकांमध्ये प्रशिक्षक आणि समन्वयकांची महत्त्वपूर्ण जबाबदारी असते. समन्वयक म्हणून विभागाच्या विविध योजनांचे नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेख करण्याचे काम करावे लागते. समन्वयक विविध सरकारी आणि खाजगी संस्थांशी संपर्क साधून योजनांचे सुचारू व्यवस्थापन करतो. या पदासाठी समाजकार्य, समाजशास्त्र किंवा व्यवस्थापन विषयातील पदवी किंवा पदव्युत्तर पदवी आवश्यक असते. प्रशिक्षक म्हणून,

महिला सक्षमीकरण, अपंग पुनर्वसन, स्व-रोजगार आणि लहान व्यवसाय विकास यांसारख्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन आणि प्रशिक्षण देणे अपेक्षित आहे. यात कौशल्यविकास, व्यक्तिमत्व विकास, मानसिक आरोग्य, आणि समाज समरसता यांसारख्या विविध बाबींवर लक्ष दिले जाते.

४. **समुपदेशक** (Counselor):

समाजकल्याण विभागात समुपदेशक (Counselor) म्हणून काम करण्याची संधी विविध वंचित गटांसाठी महत्त्वपूर्ण असते. समुपदेशकाची भूमिका व्यक्तीच्या मानसिक, भावनिक आणि सामाजिक समस्यांवर लक्ष केंद्रित करून त्यांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या समस्यांवर उपाय सुचवणे आहे. यामुळे व्यक्तीला त्यांच्या आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता वाढवता येते. समुपदेशक विविध सामाजिक सेवांचे आणि कल्याणकारी योजनांचे ज्ञान असलेले असावे लागते, या भूमिकेसाठी सामान्यतः मानसशास्त्र, समाजकार्य, समाजशास्त्र किंवा संबंधित क्षेत्रातील पदवी आवश्यक आहे. अनुभव आणि संवाद कौशल्ये महत्त्वाची असतात, कारण समुपदेशकांना विविध वंचित गटांशी काम करावे लागते,

५. **पुनर्वसन तज्ज्ञ** (Rehabilitation Specialist):

समाज कल्याण विभागात पुनर्वसन तज्ज्ञ (Rehabilitation Specialist) म्हणून काम करण्याची संधी समाजातील विविध वंचित गटांच्या पुनर्वसनासाठी महत्त्वाची असते. पुनर्वसन तज्ज्ञांनी व्यक्तींना त्यांच्या सामाजिक, आर्थिक, आणि मानसिक स्थितीत सुधारणा करण्यात मदत करण्यासाठी कार्य करणे अपेक्षित आहे. पुनर्वसन तज्ज्ञांचे मुख्य कार्य म्हणजे मानसिक किंवा शारीरिक अडचणींचा सामना करणाऱ्या व्यक्तींना योग्य मार्गदर्शन देणे, त्यांच्या कौशल्यांचा विकास करणे, आणि पुनर्वसन प्रक्रियेत सहकार्य करणे. या भूमिकेत काम करण्यासाठी  समाजशास्त्र अभ्यासकास संधी असते.

६. **समाजशास्त्र संशोधक:**

समाज कल्याण विभागात समाजशास्त्र संशोधनासाठी संधी उपलब्ध आहेत. वृध्द, दिव्यांग. बाल व महिला, अनुसूचित जाती यांच्या सामाजिक समस्यांवर उपाय योजना शासनास सुचविल्या जाऊ शकतात. या संशोधनाद्वारे वंचित गटांच्या समस्यांचा अभ्यास केला जातो. त्यांच्या गरजांची ओळख लक्षात घेऊन संबंधित धोरणे तयार करण्यास मदत केली जाते.

संशोधनात सहभागी होण्यासाठी समाजशास्त्रातील पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण असणे आवश्यक आहे. संशोधकांना थेट डेटा गोळा करणे, सर्वेक्षण आणि मुलाखती करणे, तसेच विविध सामाजिक समस्यांवर अभ्यास आणि विश्लेषण करणे अपेक्षित आहे. यामध्ये आदिवासी विकास, महिला सक्षमीकरण, शारीरिक आणि मानसिक आरोग्य, तसेच अन्य सामाजिक कल्याण योजना यांसारख्या विषयांचा समावेश होतो. संशोधनाच्या परिणामांद्वारे समाज कल्याण विभागास नवीन धोरणे, कार्यक्रम आणि उपाययोजना विकसित करण्यात मदत मिळते, ज्यामुळे समाजातील वंचित गटांच्या जीवनमानात सुधारणा साधता येते.

समाजशास्त्र संशोधक: समाजातील विविध समस्या, त्यांचे स्वरूप, आणि त्यांच्या निराकरणासाठी संशोधन करणे.

समाज कल्याण विभागात अशा प्रकारच्या अनेक संधी आहेत ज्या समाजाच्या उन्नतीसाठी, सामाजिक न्यायासाठी, आणि गरजू घटकांच्या कल्याणासाठी योगदान देण्यास प्रोत्साहन देतात. समाजसेवेचे आवड असलेल्या व्यक्तींना या क्षेत्रात चांगले करिअर बनवता येऊ शकते

**क. इतर क्षेत्रातील रोजगाराच्या संधी** (Other Related fields)

समाजशास्त्र हे मानवी सामाजिक वर्तन, सामाजिक सबंध, समाजिक संस्थांचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. समाजशास्त्राचा अभ्यास केल्याने समाजातील गुंतागुंत समजून घेण्यासाठी एक भक्कम पाया मिळतो आणि विद्यार्थ्यांच्या करिअरच्या वाटा विस्तारल्या जातात. समाजशास्त्रामध्ये सामाजिक संशोधन, सार्वजनिक धोरण आणि स्वयंसेवी संस्थांसारख्या क्षेत्रात नोकरीच्या विविध संधी आहेत. याशिवाय समाजशास्त्र या विषयात भारतात अध्यापन, संशोधन, बिगर शासकीय क्षेत्रात याशिवाय इतर क्षेत्रात करिअरच्या विस्तृत संधी आहेत. समाजशास्त्रात करिअर घडवण्यासाठी काळजीपूर्वक नियोजन, कठोर परिश्रम आणि समर्पण आवश्यक आहे. समाजशास्त्रात भविष्य घडवण्यासाठी काही पावले उचलू शकता. समाजशास्त्र अभ्यासक सामाजिक सेवांसह विविध क्षेत्रात करिअर करू शकतात.

**१. समुपदेशक:**

आधुनिक काळात अनेकदा कौटुंबिक, वैयक्तिक संबंधाबाबत ताण-तणाव निर्माण होतात. त्यामुळे अलीकडंच्या काळात कौटुंबिक तसेच वैयक्तिक संबंध याचे महत्व स्पष्ट करून तणावाचे वातावरण कमी करणे गरजेचे असते. अशा स्थितीत बदल करण्याबाबत समाजशास्त्रातील अभ्यासक समुपदेशकाची भूमिका पार पाडू शकतो. व्यक्ती, कुटुंबे आणि समुदायांना मार्गदर्शन आणि समुपदेशन सेवा प्रदान करण्याबाबत करिअर करू शकतो.

**२. सामाजिक कार्यकर्ता :**

उपेक्षित समुदायांना आधार आणि सेवा प्रदान करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते यांची समाजाला गरज असते. अशावेळी सरकारी संस्था, एनजीओ किंवा खाजगी संस्थांसोबत काम करण्याची संधी समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांना मिळू शकते. सामाजिक समस्या ओळखण्यासाठी आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी स्थानिक समुदायांबरोबर समुदाय विकासासाठी योगदान दिले जाऊ शकते.

**३. सामाजिक जागृतीच्या माध्यमातून सेवेच्या क्षेत्रात संधी**

समाजशास्त्राच्या अभ्यासात विद्यार्थ्यांना समाजातील सामाजिक समस्याची ओळख झालेली असते. त्यामुळे या अभ्यासाच्या मदतीने समस्यांची मूळ कारणे समजून घेऊन त्याचा उपयोग सामाजिक समस्या निर्मूलन करण्याबाबत उपाययोजना याची माहिती असल्याने त्याचा समाजासाठी वापर केला जाऊ शकतो.

समाजशास्त्र आणि सामाजिक जागृती यांचा एकमेकांशी घट्ट संबंध आहे. समाजशास्त्र हे समाजातील विविध घटक, त्यांचे परस्पर संबंध, संस्था, संस्कृती आणि समाजातील समस्या यांचे शास्त्रीय अध्ययन आहे. हे अध्ययन सामाजिक जागृतीसाठी आवश्यक आहे. समाजशास्त्रात पदवी अथवा पदव्युत्तर पदवी संपादन केल्यावर सामाजिक क्षेत्रात एक सामाजिक कार्यकर्ता म्हणून कार्य केले जाऊ शकते. सामाजिक कार्यकर्ता म्हणून समाजशास्त्राचा विद्यार्थी अनाथमुले, परित्यक्ता महिला, वृद्ध लोकांसाठी वृद्धाश्रम असे आश्रम उभे करून सेवेच्या क्षेत्रात काम करू शकतात.

**४. विश्लेषक**

सध्या सामाजिक जीवन अत्यंत गुतागुंतीचे झाले आहे. अशावेळी अनेक उद्योजक तसेच विविध संस्था यांना सामाजिक कल कसा आहे यांची माहिती हवी असते. अशी माहिती संबंधित संस्थेला देण्याबाबत विद्यार्थी विश्लेषकांची भूमिका पार पाडून यात करिअर करू शकतात.

**५. सामाजिक जागृतीच्या माध्यमातून हक्क व जबाबदारीची जाणीव –**

समाजातील एक मोठा वर्ग त्याचे हक्क, जबाबदारी यापासून दुरावलेले असतात लोकांना त्यांच्या हक्कांबद्दल आणि सामाजिक जबाबदारी याबाबत समाजाला जागृत करणे अत्यंत आवश्यक असते. ही सामाजिक जागृती समाजशास्त्राचा विद्यार्थी पार पाडू शकतो. समाजातील विविध मुद्द्यांबद्दल जागरूक केले जाऊ शकते.

**६. गुन्हेगारी न्याय क्षेत्रात समाजशास्त्र विषयात करिअर संधी –**

समाजशास्त्रज्ञांना गुन्हेगारी न्याय क्षेत्रात करिअरच्या संधी देखील मिळू शकतात. समाजशास्त्रातील पदवीनंतर काही करिअर पर्यायांमध्ये असू शकतात. यामध्ये प्रोबेशनवर असलेल्या व्यक्तींचे पर्यवेक्षण करणे आणि त्यांना कायद्याशी पुढील संघर्ष टाळण्यासाठी मदत करणे यांसाठी प्रोबेशन अधिकारी तर तुरुंगातून सुटलेल्या व्यक्तींना समाजात पुन्हा एकत्र येण्यासाठी आणि समाजाचे उत्पादक सदस्य बनण्यासाठी मदत करतात पॅरोल अधिकारी म्हणून काम करण्याची संधी असू शकते.

थोडक्यात भारतात समाजशास्त्रज्ञांची मागणी झपाट्याने वाढत आहे, विशेषत: सामाजिक संशोधन, धोरणनिर्मिती आणि सामाजिक कार्य या क्षेत्रात. शिवाय, सोशल मीडिया आणि डिजिटल मार्केटिंगच्या वाढत्या महत्त्वामुळे, कंपन्या अशा व्यावसायिकांच्या शोधात आहेत जे ग्राहकांच्या वर्तनाचे विश्लेषण करू शकतील आणि समजू शकतील, ज्यामुळे समाजशास्त्र पदवीधरांना खूप मागणी आहे.

**४.३.४ स्वयं-अध्यनासाठी प्रश्न**

अ. रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.

१. समाजशास्त्र विषयात वरिष्ठ महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक होण्यासाठी ........ ही पात्रता चाचणी आहे.

अ. नेट / सेट (NET/SET )　　　ब. बी.एड. (B.Ed )

क. नीट (NEET)　　　　　　ड जे. इ. इ. (JEE)

२. समाजशास्त्र विषयाचा विद्यार्थी क्षेत्रात स्वतःचे करिअर करू शकतो.

अ. सामाजिक कार्यकर्ता　　　　　　ब. एन.जी.ओ

क. संशोधन　　　　　　ड. वरीलपैकी सर्व

३. टाटा सामाजिक संस्था खालीलपैकी .......... हे कार्य करते.

अ. सामाजिक कार्य　　　　　　ब. प्रशिक्षण

क. संशोधन　　　　　　ड. वरीलपैकी सर्व

४. एन.जी.ओ. या .......... संस्था आहेत.

अ. शासकीय　　　　　　ब. निमशासकीय

क. अ शासकीय　　　　　　ड. वरीलपैकी सर्व

५. समाजशास्त्र विद्यार्थी एन.जी.ओ. मध्ये ...... या पदावर काम करू शकतो.

अ. स्वतः ची एन.जी.ओ　　　　　　ब. निधीसंकलक

क. स्वयंसेवक　　　　　　ड. वरीलपैकी सर्व

## ४.५ स्वयं – अध्ययनाची उत्तरे

१. अ. नेट / सेट (NET/SET)　　　　　　२. ड. वरीलपैकी सर्व

३. ड. वरीलपैकी सर्व　　　　　　४. ड. वरीलपैकी सर्व

५. ड. वरीलपैकी सर्व

## ४.६ सरावासाठी प्रश्न

अ) थोडक्यात उत्तरे लिहा.

१. धोरणात्मक नियोजनातील समाजशास्त्रज्ञाची भूमिका.

२. सामाजिक धोरण निश्चितीतील समाजशास्त्रज्ञांची उपयुक्तता.

३. समाजशास्त्रीय ज्ञानाचा आरोग्य क्षेत्रातील उपयोग.

४. समाजशास्त्राचे संशोधनातील योगदान.

ब) सविस्तर उत्तरे द्या.

१. एक उत्तम व्यवसायिक म्हणून समाजशास्त्रज्ञ कोणती भूमिका पार पाडू शकतो

२. समाजशास्त्राच्या अभ्यासकाला समाजात कोणत्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतील.

## ४.८ चिंतन व कार्य

समाजात वावरत असताना कोणत्या सामाजिक समस्या आढळतात त्यावर चिंतन करा व त्यांच्या निराकरणासाठी समाजशास्त्रीय ज्ञानाचा कसा उपयोग करता येईल हे स्पष्ट करा.

## ४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. Careers in Sociology - W. Richard Stephens 1998

२. Great Jobs for Sociology Majors (NTC VGM CAREER BOOKS) Stephen E. Lambert 2008

३. Careers In Sociology an online booklet published by the American Sociological Association.

४. भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन व समाजकार्य – प्रा लक्ष्मण कोतापल्ले विद्या बुक्स

❑❑❑

# घटक १
# सामाजिक संस्थेचा परिचय
## (Introduction to Social Institutions)

**घटक संरचना :**

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

  १.२.१ सामाजिक संस्था अर्थ आणि वैशिष्ट्ये

  १.२.२ सामाजिक संस्थेचे महत्त्व

१.३ सामाजिक संस्थेतील सामाजिक परिवर्तनाचे घटक

१.४ स्वयं-अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

१.५ सरावासाठी प्रश्न/गृहपाठ

१.६ चिंतन आणि कार्य

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

### १.० उद्दिष्ट्ये (Objectives):

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला :

- सामाजिक संस्था अर्थ आणि वैशिष्ट्ये समजून घेता येतील
- सामाजिक संस्थांचे महत्त्व समजून घेता येईल.
- सामाजिक संस्थांची कार्ये समजून घेता येतील.

### १.२.१ सामाजिक संस्था (Social Institution)

'सामाजिक संस्था आणि सामाजिक संस्थांमधील परस्परसंबंध' हा समाजशास्त्राच्या अभ्यास-विषयाचा गाभा होय. त्यामुळे 'सामाजिक संस्था' या संज्ञेचा नेमका समाजशास्त्रीय अर्थ समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. 'सामाजिक संस्था' ही देखील समाजशास्त्रातील एक अत्यंत महत्त्वाची अशी संकल्पना आहे.

दैनंदिन व्यवहारात सर्वसामान्य लोक 'संस्था' हा शब्द किमान तीन अर्थाने वापरतात. एक म्हणने समाजातील एखाद्या प्रख्यात व्यक्तीच्या कार्याचा गौरव करताना, 'ती सामान्य व्यक्ती नव्हती तर एक संस्था होती' असे म्हटले जाते. दुसरे असे की, समाजातील विविध 'मंडळांचा' (associations) किंवा सामाजिक

समूहांचा (social groups) उल्लेखही ‘संस्था’ म्हणून केला जातो. काही वेळा तर शाळा, महाविद्यालय अथवा दवाखान्याच्या इमारतींकडे बोट दाखवून त्या इमारती म्हणजेच संस्था आहेत असे म्हटले जाते. ‘संस्था’ हा शब्द समाजशास्त्रात वरीलपैकी कोणत्याही अर्थाने वापरला जात नाही हे ध्यानात घेणे गरजेचे आहे. ‘सामाजिक संस्था’ या संकल्पनेचा नेमका समाजशास्त्रीय अर्थ समजून घेण्यासाठी विविध समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या काही व्याख्या आपण समजून घेऊ.

**१.२.१.१ सामाजिक संस्थेची व्याख्या व स्वरूप** (Definition and Nature of Social Institution)

सामाजिक संस्था म्हणजे काय हे समजून घेण्यासाठी समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या काही व्याख्या खाली दिल्या आहेत.

**(१) किंग्जले डेव्हिस:** 'एका किंवा अनेक कार्यांच्या भोवती रचल्या गेलेल्या आणि परस्परांत गोवल्या गेलेल्या लोकरीती, लोकनीती आणि कायदे यांचा संच म्हणजे संस्था होय’. ('An institution may be defined as a set of interwoven folkways, mores and laws built around one or more functions'. Kingslay Davis)

**(२) टिशलेर, व्हायटन आणि हंटर:** ‘समाजाच्या मूलभूत सामाजिक गरजा भागविणाऱ्या क्रियांचे संघटन करणाऱ्या, मूल्ये, नियमने, दर्जे आणि भूमिका यातून निर्माण होणाऱ्या, सुव्यवस्थित सामाजिक संबंधांना सामाजिक संस्था असे म्हणतात’.

('The ordered social relationships that grow out of the values, norms, statuses, and roles that organize those activities that fulfill society's fundamental needs' - Tischler, Whitten, and Hunter)

**(३) हॉर्टन आणि हंट:** 'संस्था म्हणजे सामाजिक संबंधांची संघटित अशी व्यवस्था की ज्यामध्ये काही समान मूल्ये आणि वर्तनाचा समावेश होतो आणि जी समाजाच्या काही मूलभूत गरजा भागविते’. ('An institution is an organized system of social relationships which embodies certain common values and procedures and. meets certain basic needs of the society. Horton and Hunt)

**(४) ऑगवर्न आणि निमकॉफ:** ‘सामाजिक संस्था म्हणजे काही मूलभूत मानवी गरजा भागविण्याचे संघटित आणि प्रस्थापित असे मार्ग होत’. ('Social institutions are organised and established ways of satisfying certain basic human needs'.. Ogburn and Nimkoff).

वरील व्याख्यांचे परीक्षण केल्यास ‘सामाजिक संस्था’ या संकल्पनेचा नेमका समाजशास्त्रीय अर्थ स्पष्ट होईल. वरील व्याख्यांत दोन महत्त्वाचे मुद्दे दिसून येतात. (१) मानवाच्या तसेच मानवी समाजाच्या काही मूलभूत गरजा असतात आणि त्या गरजांची पूर्ती करण्यासाठी सामाजिक संस्था अस्तित्वात आलेल्या असतात. (२) सामाजिक संस्था (अ) नियमने आणि मूल्ये यांचा संच आणि (ब) सामाजिक संबंधांची व्यवस्था या परस्परसंबंधित अशा दोन गोष्टींनी मिळून बनलेली असते.

### १.२.१.२ सामाजिक संस्थांची वैशिष्ट्ये

**१) निश्चित उद्दिष्ट :**

सामाजिक संस्थांची उभारणी कोणत्या ना कोणत्या तरी निश्चित उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी झालेली असते. हे निश्चित उद्देश साध्य करण्यासाठी सामाजिक संस्था कटिबद्ध असतात. उद्दिष्ट व प्रत्यक्ष केले जाणारे कार्य यामध्ये जरी सुक्ष्म फरक असला तरी उद्दिष्टाला अनुरूपच कार्य व्हावे, ही अपेक्षा असते. तेव्हा कुटुंबसंस्था प्रजोत्पादन, राज्यसंस्था संरक्षण, धर्मसंस्था मानसिक व नैतिक सुरक्षितता, अर्थसंस्था मूलभूत गरजांची पूर्ती इत्यादी उद्दिष्ट्ये पुढे ठेवूनच कार्य होत असतात.

**२) सापेक्ष स्थैर्य :**

विशिष्ट गरज पूर्ण करणे हे उद्दिष्ट गाठण्यासाठी संस्था काही नियम तयार करीत असतात. कारण विशिष्ट गरज साध्य करण्यासाठी व्यक्तीचे वर्तन नियमबद्ध होणे गरजेचे असते. त्यामुळे हे नियम एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होतात. साहजिकच पिढ्या बदलतात, पण सामाजिक संस्थांनी विशिष्ट गरजेच्या पूर्तीसाठी व्यक्तीने कसे वर्तन करावे यासाठी उभे केलेले नियम, पिढ्यानपिढ्या चालू राहतात. याचा अर्थ नियमात बदल होत नाहीत, असे नाही. पण कोणते ना कोणते तरी नियम हे असतातच यामुळेच संस्थेला स्थैर्य मिळते.

**३) विशिष्ट वर्तनप्रकार :**

समाजातील व्यक्तीचे वर्तन कोणत्या प्रकारचे असावे हे निर्धारित केले जाते. अनिर्बंध स्वातंत्र्य व्यक्तीला देणे हे धोक्याचे असते. त्यामुळे सामाजिक संस्था आपले निर्धारित उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व्यक्तीकडून ठराविक वर्तनपद्धतीची अपेक्षा ठेवून असते. राज्यसंस्था व्यक्तीकडून राष्ट्रनिष्ठा व कायदापालन, कुटुंबसंस्था व्यक्तीकडून कुटुंबीय भावना, तर अलौकिक शक्तीपुढे लीनता ही धर्मसंस्थेची अपेक्षा असते.

**४) उपयुक्त साधने :**

विशिष्ट गरजांभोवती संस्थेची उभारणी झालेली असल्याने त्या गरजांपूर्तीसाठी काही साधनांचा वापर संस्था करीत असते. ही साधने सामाजिक संस्थांच्या एकूण वाटचालीसाठी अगदी आवश्यक असतात. यामध्ये इमारती, यंत्र इत्यादीचा समावेश होतो. कुटुंबसंस्थेसाठी संसारोपयोगी वस्तु लागतात तर राज्यसंस्थेसाठी शस्त्रे लागतात. धर्मसंस्थेसाठी देवळे, चर्च, बस्ती इत्यादीची गरज असते. संस्थेच्या उद्दिष्टाच्या स्वरूपाप्रमाणे संस्थेच्या साधनाचे स्वरूपही वेगळे असते.

**५) प्रतीके :**

सर्वच सामाजिक संस्थांमध्ये कोणती ना कोणती तरी प्रतिके निर्माण केलेली असतात. यामुळे संस्थेबद्दल व्यक्तीच्या मनात काही जाणीवा निर्माण होत असतात. या प्रतिकांचे स्वरूप भौतिक व अभौतिक असते. सैन्याचे गणवेश, शाळेतील मुलांचे गणवेश, मंगळसुत्र, तुळशीवृंदावन, स्वस्तिक या प्रतिकांचे हिंदू

धर्मातील महत्त्व, ख्रिश्चन धर्मातील क्रॉसचे महत्त्व, इस्लाममध्ये चांदचे महत्त्व ही प्रतिकांची उदाहरणे आहेत. तेव्हा प्रतिकाच्या माध्यमातुन विशिष्ट सामाजिक संस्थांतील सदस्यांच्या श्रद्धा, विश्वास, वर्तनपद्धती स्पष्ट करते. यामुळेच लोकांच्या मनात समान श्रद्धा, समान कार्य व समान विचार इत्यादी सदैव ताजी राहतात.

**६. लिखित किंवा अलिखित परंपरा:**

विशिष्ट उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रत्येक संस्था व्यक्तीचे वर्तन नियंत्रित करीत असते. हे नियम लिखित असतात. भारतीय राज्यघटना लिखित स्वरूपात असल्याने राज्यसंस्थेचीकृती घटनेला अनुसरून होत असते. पण प्रत्येक संस्थेची कृती ठरविणारे नियम लिखित स्वरूपात असतीलच असे नाही. वर्तनविषयक आचारसंहिता लिखित व अलिखित स्वरूपात आढळून येते. सामाजिक संस्थातील सदस्यांचे वर्तन परस्परपुरक व एकाच दिशेचे असावे म्हणूनच या लिखित व अलिखित परंपरा निर्माण केलेल्या असतात.

## १.२.२ सामाजिक संस्थांची कार्ये किंवा महत्त्व:

१. व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे

२. सामाजिक वारसा प्राप्त करणे.

३. सामाजिक नियंत्रण करणे,

४. सामाजिक परिवर्तन करणे.

५. सामाजीकरण करणे,

६. कर्तव्य निश्चित करणे.

७. मानवी गरजांची पूर्तता करणे.

आतापर्यंत सामाजिक संस्था याचा अर्थ व स्वरूप व्याख्या आपण विचारात घेतलेल्या आहेत. परंतु समाजातील सामाजिक संस्थांचे कार्य काय आहे किंवा त्याचे समाजात काय महत्त्व आहे हे पाहिल्याशिवाय संस्था ही संकल्पनाच आपल्याला समजत नाही. कार्ये व महत्त्व या दोन्हीही बाजू एकच आहे. कार्याशिवाय महत्त्व नाही व महत्त्वाशिवाय कार्य नाही. त्यामुळे सामाजिक संस्था समाजाचे, व्यक्तीचे कोणते काम करतात याची उकल होणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक संस्था ही समाजाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, इत्यादी क्षेत्रातील विविध गरजांशी संबंधित कार्ये पार पाडतात. विविध प्रकारच्या सामाजिक संस्थांची प्रमुख उद्दिष्टे सामाजिक गरजांची पूर्तता करणे असले, तरी त्या संस्थांना समाजाविषयक कार्य करण्याची भरपाईसुद्धा करावी लागते. सामाजिक संस्थांनी समाजविषयक कार्याच्या संदर्भाने सर्वांगीण सामाजिक आकलन करूनच कार्य करणे समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. तथापि संस्थांना समाजविषयक जे कार्य करावे लागते त्याचा पुढीलप्रमाणे विचार करण्यात आलेला आहे.

### १. व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे:

व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्व विकासात संस्थेचा फार मोठा वाटा आहे. व्यक्तीस समाजाचा सदस्य म्हणून जे निरनिराळे दर्जे असतात त्या दर्जाशी निगडित अशा निरनिराळ्या भूमिका असतात. उदा. पती, पत्नी, माता, पिता, पुत्र, कन्या इ. व्यक्तीला हे दर्जे समाजाकडून प्राप्त होत असतात. या विविध दर्जा व भूमिकांतून व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप स्पष्ट होत असते. व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी सामाजिक संस्था कार्य करते. कुटुंब ही व्यक्तिमत्त्व विकासास मदत करणारी पहिली सामाजिक संस्था आहे. भाषा, नियमने, आचार-विचार इत्यादी या संस्थेद्वारेच व्यक्तीस शिकविले जाते. उदा. एखाद्या सोनाराचा मुलगा जेव्हा डॉक्टर होतो तेव्हा त्यावर कोणते संस्कार झाले. त्याचे कुटुंब सुशिक्षित आहे काय हे जेव्हा पाहातो तेव्हा आपल्या लक्षात येते ते सोनाराचे कुटुंब असले तरी त्याचे आईवडील डॉक्टर आहेत. त्या मुलाचे बडीलभाऊ डॉक्टर आहेत म्हणून तो डॉक्टर झाला. कारण त्याचे व्यक्तिमत्त्व चांगल्या प्रकारे घडविले गेले असे म्हणावे लागेल, सामाजिक संस्थेच्या संदर्भातच व्यक्तीच्या ठिकाणी अशा अनेकविध सामाजिक गुणांचा विकास होतो की जे गुण सामाजिक जीवन जगण्यासाठी अत्यावश्यक असतात. सहकार्य, प्रेम, त्याग इत्यादी सामाजिक गुणांचा तर समायोजन, स्पर्धा, संघर्ष इत्यादी प्रवृत्तीचा विकास या सर्व गोष्टीचे ज्ञान कुटुंबात मिळते. कुटुंब व धर्माद्वारे सदाचरण, विवेक, निष्ठा, त्याग इत्यादीची शिकवण देतात.

### २. सामाजिक वारसा प्राप्त करणे:

समाज सातत्यात संस्थांचे कार्य अखंडितपणे चालू असते प्रथा, तत्त्वज्ञान, मूल्ये, विज्ञान, साहित्य, कला या सामाजिक वारसाच्या संदर्भात सतत संस्थांचे कार्य चालत असते. व्यक्तिमत्त्वाच्या व वारसाबाबत कुटुंब संस्थेचे योगदान अधिक आहे. सामाजिक वारसाचे संरक्षण व हस्तांतरण करणारी कुटुंब ही प्रभावी स्वरूपाची संस्था आहे. व्यापक अर्थाने कोणत्याही समाजाचा सामाजिक वारसा सामाजिक संस्थेच्या माध्यमातून हस्तांतरित होत असतो.

### ३. सामाजिक नियंत्रण :

संस्था सामाजिक नियंत्रणाचे कार्य करतात. प्रस्थापित सामाजिक, सांस्कृतिक चौकटीतच समाजातील सदस्यांनी वर्तन करणे व्यापक सामाजिक हिताच्या दृष्टीने आवश्यक असते. प्रत्येक समाजात लोकरूढी, लोकनीती या सारखे सामाजिक नियम असतात. या लोकरूढीचे उल्लंघन केले तर समाजविरोधी वर्तन होते. यामुळे समाजस्वास्थ्य धोक्यात येते. तसे होऊ नये म्हणून समाजसदस्यांनी बेशिस्त वर्तन करू नये म्हणून प्रत्येक समाजामध्ये एक सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था असते त्यासच संस्थेच्या कार्याची व्यवस्था असे म्हणतात. उदा. कुटुंब, विवाह, धर्म इ अनौपचारिकरीत्या नियंत्रण करीत असतांत, विवाह संस्थेमुळे मानवी लैंगिक वर्तनाला एक निश्चित दिशा व मार्गदर्शन प्राप्त होते. समाजमान्य वर्तन प्रकार म्हणून मान्यता मिळते. सर्व सदस्यांना एक दर्जा प्राप्त होतो. या सर्वांमुळे मानवी लैगिक वर्तन नियंत्रित होते.

## ४. सामाजिक परिवर्तन :

सामाजिक संस्था समाजातील परिवर्तनाचे स्वागत करतात व आपल्या रचनेत बदल करतात. सामाजिक संस्थेंतर्गत संबंधाचे स्वरूप सापेक्षतः स्थिर असते. प्रस्थापित आचारसंहितेवर ते आधारलेले असते. आधुनिक काळात वेशभूषाविषयक पद्धती किंवा केशरचना पद्धती चटकन बदलत आहेत. या सर्व बदलास संस्था स्वीकारते. कारण मानवी गरजेतूनच संस्था निर्माण झालेल्या आहेत. गरजा जर बदलल्या तर संस्थादेखील स्थिरत्व असूनही बदल मान्य करतात परंतु बदल होताना काही लवकर तर काही उशिरा असे परिवर्तन होताना आढळते. उदा. भारतीय जातिसंस्था आजही तग धरून आहे. त्यातील नियंत्रणे नियमने आपणास इच्छा नसूनही पाळावी लागतात. 'अस्पृश्यता' ही संपर्कविषयक पारंपारिक नियमनातूनच विकसित झालेली आहे. जातिभेद व अस्पृश्यता निराकरण करण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे, परंतु अद्यापही अस्पृश्यता फार मोठया प्रमाणात पाळली जाते. यावरून संस्थात्मक संबंधात बदल घडून येण्यास वेळ लागतो हे स्पष्ट होते. संस्थीकृत वर्तन हे संस्कारात्मक स्वरूपाचे असते. व्यक्तीचे संस्कार बदलण्यास दीर्घकाळ लागतो. यामुळेच संस्थात्मक बदल मंद गतीने घडून येतात. थोडक्यात, समाजातील निरनिराळ्या सामाजिक संस्थांत घडून येणाऱ्या बदलाचा वेग भिन्न भिन्न असतो .

## ५. समाजिकरण :

सामाजिक संस्था व्यक्तीचे समाजीकरण करतात. मनुष्य प्राण्याचे सामाजिक प्राण्यात रूपांतर करण्याची प्रक्रिया म्हणजे समाजीकरण होय. हे समाजीकरण करण्यामध्ये विविध व्यक्ती, समूह, संस्था या सर्वांचा सहभाग असतो, उदा. व्यक्तीचा संबंध कुटुंबाशी दीर्घकाळ येतो. कुटुंबामध्ये त्यांच्यावर शिस्तीचे मूलभूत संस्कार होतात पण त्याचबरोबर सार्वजनिक जीवनात विविध भूमिका पार पाडण्यासाठी सक्षम करण्याचेही काम विविध संस्था करतात. उदा. कुटुंब, धर्म, शिक्षण इ. संस्था सामाजीकरणाची ही प्रक्रिया अखेरपर्यंत चालूच असते. त्या माध्यमातून सामाजीकरणाचेकार्य होत असते. सामाजिक संस्था व्यक्तीच्या वर्तनात सहजता आणण्याचे कार्य करतात.

## ६. कर्तव्ये निश्चित करणे:

समाजातील विविध संस्था व्यक्तींची विविध कर्तव्ये निश्चित करीत असतात, व्यक्तीचा दर्जा व भूमिकांचा विचार संस्था करतात. समाजात व्यक्तीच्या दर्जाची व भूमिकांची निश्चिती संस्थेद्वारेच होत असते. ज्या कुटुंबात एका स्त्रीला आई म्हणून एक दर्जा आहे. हा दर्जा कोणाला मिळावा हे सामाजिक संस्थेने ठराविलेले असते व त्या दर्जावर कोणत्या भूमिका पार पाडाव्यात हे संस्थेनेच व्यक्तीला कर्तव्ये म्हणून सांगितलेले असते. दर्जानुसार व्यक्तीस कर्तव्ये पार पाडावी लागतात. विशिष्ट शिक्षण संस्थेचे सदस्यत्व मिळाल्यावर एक विद्यार्थी म्हणुन दर्जा मिळतो. त्या शिक्षण संस्थेच्या वर्तन प्रणालीनुसार नियमांच्या चौकटीत राहूनच आपल्या संस्थेशी सुसंगत भूमिका पार पाडावी लागते.

**७. मानवी गरजांची पूर्तता करणे:**

सामाजिक संस्थेच्या मुळातच मानवी गरज सांगितली गेली आहे. समाजातील प्रत्येक संस्था व्यक्तीच्या सर्व प्रकारच्या गरजा पूर्ण करीत असतात. विवाहसंस्था लैंगिक गरजांची पूर्तता करून कुटुंब संस्थेकडे मुलाच्या संगोपनाचे कार्य सोपवून देते. मुलांचे प्रेम, संरक्षण इत्यादी गरजा पूर्ण करून त्याच्या उपजीविकेचा प्रश्न अर्थसंस्थेकडे सोपविते. मानवी जीवनावर योग्य संस्कार होण्याचे कार्य शिक्षण संस्था करते तर व्यक्तिमत्त्व विकासास ज्या नीतीविषयक मूल्यांची गरज धर्मसंस्थेद्वारे पूर्ण होते त्या सर्वाचे नियंत्रण शासन संस्थेकडून केले जाते. तसेच औपचारिक गरज राज्यसंस्था पूर्ण करते. तात्पर्य व्यक्तीच्या विविध मानवी गरजांची पूर्तता समाजातील सर्वच संस्था आपापल्या परीने करीत असतात. मनुष्य प्राण्याच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा संस्थाच पूर्ण करतात. शिक्षण, धर्म, मनोरंजनविषयक या दुय्यम गरजाही संस्थाच पूर्ण करतात. वरील सर्व गरजा मनुष्यप्राण्याला आपापल्या समाजाच्या चौकटीतच पूर्ण कराव्या लागतात. प्रत्येक समाजात सामाजिक नियमनाची व मूल्यांची एक व्यवस्था असते. या व्यवस्थेच्या आधीन राहूनच या गरजा भागविणे अपेक्षित असते. साहजिकच समाजातील सदस्यांच्या विविध मूलभूत गरजा भागविण्याचे कार्य या संस्था करीत असतात. विवाह संस्थेच्या संदर्भात विशेष म्हणजे तारुण्यसुलभ अशी लैंगिक समाधानाची गरज भागविण्याचे काम विवाह संस्था करते.

## १.३ सामाजिक संस्थेतील सामाजिक परिवर्तनाचे घटक:

**१. नैसर्गिक वातावरण:**

नैसर्गिक वातावरणातील बदल हवामानातील फरक, नैसर्गिक आपत्ती किंवा रोगाच्या प्रसारामुळे होऊ शकतात. उदाहरणार्थ, हवामानाची स्थिती बिघडणे आणि महामारी या दोन्ही गोष्टींनी १४ व्या शतकातील युरोपमधील सरंजामशाहीच्या संकटाला हातभार लावला असे मानले जाते. नैसर्गिक वातावरणातील बदल एकतर मानवी क्रियापासून स्वतंत्र असू शकतात किंवा त्यांच्यामुळे होऊ शकतात. जंगलतोड, धूप, वायू प्रदूषण आणि समकालीन हवामान बदल हे नंतरच्या श्रेणीशी संबंधित आहेत आणि त्यांचे दूरगामी सामाजिक परिणाम होऊ शकतात.

**२. लोकसंख्याशास्त्रीय घटक :**

लोकसंख्या वाढ आणि लोकसंख्येची वाढती घनता हे सामाजिक संस्थेतील परिवर्तनाचे लोकसंख्याशास्त्रीय प्रकार दर्शवतात. लोकसंख्येच्या वाढीमुळे समाजाचा भौगोलिक विस्तार, लष्करी संघर्ष आणि संस्कृतींचे एकत्रीकरण होऊ शकते. लोकसंख्येची वाढती घनता तांत्रिक नवकल्पनांना चालना देऊ शकते, ज्यामुळे श्रम विभागणी, सामाजिक भेदभाव, व्यापारीकरण आणि शहरीकरण वाढू शकते. या प्रकारची प्रक्रिया पश्चिम युरोपमध्ये ११ व्या ते १३ व्या शतकात आणि १८ व्या शतकात इंग्लंडमध्ये झाली, जिथे लोकसंख्या वाढीमुळे औद्योगिक क्रांतीला चालना मिळाली. दुसरीकडे, लोकसंख्या वाढ आर्थिक स्थैर्य आणि वाढत्या गरिबीला कारणीभूत ठरू शकते, जसे आज अनेक विकसनशील देशांमध्ये पाहिले जाऊ शकते.

## ३. तांत्रिक बदल:

सामाजिक उत्क्रांतीचे अनेक सिद्धांत तांत्रिक नवकल्पनांना सामाजिक संस्थेतील सामाजिक परिवर्तनाचे सर्वात महत्त्वाचे निर्धारक म्हणून ओळखतात. लोखंड वितळणे, शेतीमध्ये नांगराचा वापर, वाफेच्या इंजिनाचा शोध आणि संगणक आणि इंटरनेटचा विकास यासारख्या तांत्रिक प्रगतीचे सामाजिक परिणाम यामुळे ामाजिक संस्थेत बदल घडून येतात.

## ४. आर्थिक प्रक्रिया:

तांत्रिक बदलांचा विचार आर्थिक प्रक्रियेच्या संयोगाने केला जातो. यामध्ये बाजारपेठांची निर्मिती आणि विस्तार, मालमत्ता संबंधांमध्ये बदल (जसे की सरंजामदार-शेतकरी संबंधांपासून कराराच्या मालक-भाडेकरू संबंधांमध्ये बदल), आणि कामगारांच्या संघटनेतील बदल (जसे की स्वतंत्र कारागीरांकडून कारखान्यांमध्ये बदल). मार्क्स आणि एंगेल्स यांनी विकसित केलेला ऐतिहासिक भौतिकवाद हा आर्थिक प्रक्रियांना प्राधान्य देणारा एक प्रमुख सिद्धांत आहे, परंतु तो एकमेव नाही. खरंच, मार्क्सवादाच्या विरोधात भौतिकवादी सिद्धांत देखील विकसित केले गेले आहेत.

## ५. राजकीय प्रक्रिया:

हिंसाचाराच्या नियमनात, राज्याच्या संघटनेत आणि आंतरराष्ट्रीय संबंधांमधील बदल देखील सामाजिक संस्थेतील बदलास हातभार लावू शकतात. उदाहरणार्थ, जर्मन समाजशास्त्रज्ञ नॉर्बर्ट इलियास यांनी पश्चिम युरोपमधील राज्यांची निर्मिती ही तुलनेने स्वायत्त प्रक्रिया म्हणून व्याख्या केली ज्यामुळे हिंसेवर नियंत्रण वाढले आणि शेवटी, आत्म-नियंत्रणाचे प्रमाण वाढले. अमेरिकन ऐतिहासिक समाजशास्त्रज्ञ चार्ल्स टिली यांनी मांडलेल्या राजकीय क्रांतीच्या सिद्धांतांनुसार, क्रांतीच्या उद्रेकात राज्ययंत्रणेची कार्यप्रणाली आणि आंतरराज्यीय संबंधांचे स्वरूप निर्णायक महत्त्वाचे असते: हे तेव्हाच होते जेव्हा राज्य कायदा आणि सुव्यवस्था राखणे आणि प्रादेशिक अखंडतेचे रक्षण करणे ही त्यांची मूलभूत कार्ये पूर्ण करण्यास सक्षम नाही की क्रांतिकारी गटांना यश मिळण्याची कोणतीही शक्यता आहे.

सामाजिक संस्थेतील सामाजिक बदलाचा एकमेव निर्धारक घटक कोणीही नाही, यातील प्रत्येक प्रक्रिया इतरांना योगदान देऊ शकते. निर्धारवादी किंवा घटवादी सिद्धांत अनेकदा नाकारले जाण्याचे एक कारण म्हणजे प्रक्रियांचे स्पष्टीकरण देण्याची पद्धत स्वायत्त नसून ती स्वतःच स्पष्ट करणे आवश्यक आहे. शिवाय, सामाजिक प्रक्रिया अनेकदा इतक्या गुंफलेल्या असतात की त्यांचा स्वतंत्रपणे विचार करणे दिशाभूल करणारे ठरेल. उदाहरणार्थ, आर्थिक आणि राजकीय प्रक्रियांमध्ये निश्चित सीमा नाहीत किंवा आर्थिक आणि तांत्रिक प्रक्रियांमध्ये निश्चित सीमा नाहीत. तांत्रिक बदल हा एक विशिष्ट प्रकारचा संघटनात्मक किंवा वैचारिक बदल म्हणून ओळखला जाऊ शकतो. वेगळे करण्यायोग्य सामाजिक प्रक्रियांमधील कार्यकारण संबंध ही काही अंशी बाब आहे आणि कालांतराने बदलते.

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress):

**अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सामाजिक संस्थेची कोणतीही एक व्याख्या सांगा.

२) सामाजिक संस्थेचे चार पैलू कोणते ते सांगा.

३) सर्व मानवी समाजात आढळणाऱ्या सामाजिक संस्था कोणत्या?

उत्तरे

१) हॉर्टन आणि हंट 'संस्था म्हणजे सामाजिक संबंधांची संघटित अशी व्यवस्था की ज्यामध्ये काही समान मूल्ये आणि वर्तनरितींचा समावेश होतो आणि जी समाजाच्या काही मूलभूत गरजा भागविते.'

२) सामाजिक संस्थांचे चार महत्त्वाचे पैलू म्हणजे संरचना, हेतू, यंत्रणा आणि कार्य.

३) कुटुंबसंस्था, विवाहसंस्था, अर्थव्यवस्था, राज्यसंस्था, शिक्षणसंस्था, धर्मसंस्था आणि मनोरंजनात्मक संस्था या सर्व समाजात दिसून येणाऱ्या काही महत्त्वाच्या सामाजिक संस्था आहेत.

## १.५ सरावासाठी प्रश्न / गृहपाठ (Exercise / Home Assignment):

१) सामाजिक संस्थाची व्याख्या सांगून त्यांचा अर्थ स्पष्ट करा.

२) सामाजिक संस्थांच्या महत्त्वाच्या वैशिष्ट्यांची थोडक्यात चर्चा करा.

३) सामाजिक संस्थेच्या महत्त्वाची थोडक्यात चर्चा करा.

४) सामाजिक संस्थांतील परिवर्तनास जबाबदार घटकांची चर्चा करा.

## १.६ चिंतन व कार्य (Reflections and Actions):

१) एक सामाजिक संस्था म्हणून कुटुंबसंस्थेचे तुम्ही निरीक्षण करा आणि केंद्र कुटुंबातील परिस्थिती, आई वडील व त्यांची मुले यांच्यातील संबंधांचे नियंत्रण करणारी नियमने आणि कुटुंबाकडून केली जाणारी कार्ये विशद करा.

२) समकालीन भारतीय समाजातील विवाहसंस्थेमध्ये कस-कसा बदल होत आहे याचा अभ्यास करून त्याबाबत एक टिपण तयार करा.

३) जर तुम्ही लहान शहर अथवा नगरांमध्ये रहात असाल तर त्या ठिकाणचे कुटुंबप्रकार शोधून काढण्याचा प्रयत्न करा. तसेच तुमच्या शहरातील कुटुंबसंस्थेमध्ये घडून येत असलेल्या बदलांचे स्वरूप माहित करून घेण्याचा प्रयत्न करा. तुमच्या स्वतःच्या निरीक्षणाच्या आधारावर त्यासंबंधी एक टीप तयार करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Reading Books):


1) Maclver, R.M. and C.H. Page: Society: An Introductory Analysis, Ma India Ltd., Madras, 1986.

2) Gisbert, P.: Fundamentals of Sociology, Orient Longmans, III Ed., B 1973.

3) Johnson Harry M.: Sociology: A Systematic Introduction, Allied Publisher New Delhi, 1960.
4) Vidaya Bhushan & Sachdeva: An Introduction to Sociology, Kitab Allahabad, 1993.
5) Shankar Rao, C.N.: Sociology: Primary Principles, S Chand & Co., New D 2004.
6) Perry John & Erna K. Perry: Contemporary Society: An Introduction to Social Science, Allyn & Bacon, Boston, 2000.
7) Barnes, Harry Elmer: Social Institutions, Prentice Hall, New York, 1984.
8) Sumner, W.G., and Keller: The Science of Society, Ginn and Co., New York, 1980.
9) Sharma, R.N.: Principles of Sociology, Asia Pub. House, Bombay, 1968.
10) Mitchell, Duncan G.: A New Dictionary of Sociology, Routledge, London, 1989.
११) डॉ. सर्जेराव साळुंखे समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन पुणे.
१२) डॉ. प्रदीप आगलावे समाजशास्त्र, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
१३) प्रा. चंद्रकांत खंडागळे मूलभूत समाजशास्त्र, प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे
१४) डॉ. माणिक माने सुबोध समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर.
१५) डॉ. सुमन बेहरे भारतीय सामाजिक संस्था, विद्या प्रकाशन, नागपूर, सामाजिक संस्था.

❑❑❑

# घटक २
# विवाहसंस्था
## (Marriage Institution)

**घटक संरचना :**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय - विवेचन

२.२.१ विवाहसंस्था: अर्थ आणि वैशिष्ट्ये

२.२.२ विवाहसंस्थेचे महत्व

२.२.३ विवाह संस्थेचे बदलते स्वरूप

स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न

२.४ सारांश

२.५ स्वयं-अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ चिंतन आणि कार्य

२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

### २.० उद्दिष्ट्ये (Objectives) :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला :

- विवाह संस्थेचा अर्थ आणि वैशिष्ट्ये समजून घेता येईल.
- विवाह संस्थेचे महत्व जाणून घेता येतील.
- विवाह संस्थेचे बदलते स्वरूप समजून घेता येईल.

### २.१ प्रस्तावना (Introduction) :

विवाहसंस्था (Marriage Institution) ही समाजशास्त्रातील एक महत्त्वाची संकल्पना आहे, ज्यामुळे समाजाच्या रचनेत एक विशिष्ट स्थैर्य निर्माण होते. विवाहसंस्था म्हणजे दोन व्यक्तींमधील औपचारिक आणि कायदेशीर संबंधांची स्थापना, ज्यात मुख्यतः पुरुष आणि स्त्री यांचा समावेश असतो. परंतु, आधुनिक

काळात विवाहसंस्थेच्या स्वरूपात विविध बदल झाले आहेत आणि त्यात विविध प्रकारच्या नात्यांचा समावेश झाला आहे. विवाहसंस्था ही कोणत्याही समाजाच्या सामाजिक रचनेतील एक महत्त्वाची संस्था आहे. समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून, विवाहसंस्था समाजातील व्यक्तींमधील संबंधांची, जबाबदाऱ्या आणि कर्तव्यांची सांगड घालण्याचे एक माध्यम आहे. विवाह हा केवळ दोन व्यक्तींच्या मिलनापुरता मर्यादित नसून, तो दोन कुटुंबांच्या, समाजाच्या, आणि संस्कृतीच्या एकत्र येण्याचा एक साक्षीदार असतो. ज्यामुळे समाजात नव्या पिढ्यांची निर्मिती, सांस्कृतिक परंपरांचा वारसा, आणि कुटुंबातील सदस्यांच्या हक्क व कर्तव्यांची स्थापना होते.

विवाहसंस्था हे समाजाच्या व्यवस्थापनाचे आणि समाजातील संतुलन राखण्याचे एक साधन आहे. विविध संस्कृतींमध्ये, विवाहसंस्थेचे महत्त्व, प्रकार, आणि कार्ये वेगवेगळी असू शकतात, परंतु सर्वच समाजात ती एक स्थायी संस्था म्हणून ओळखली जाते. समाजशास्त्रात विवाहसंस्थेचा अभ्यास केल्याने आपल्याला समाजातील विविध घटकांचे कार्य, व्यक्तींच्या नातेसंबंधांचे महत्त्व, आणि समाजाच्या स्थैर्यासाठी आवश्यक असलेल्या नियमांचे ज्ञान प्राप्त होते.

## २.२ विषय – विवेचन (Presentation of Subject-matter) :

विवाहसंस्था ही मानवी समाजातील एक अत्यंत महत्वाची संस्था आहे, कारण ह्या संस्थेचा समाजातील विविध भागांवर प्रभाव असतो. विवाहसंस्था फक्त दोन व्यक्तींच्या संबंधांची स्थापना करत नाही, तर ती समाजाच्या संपूर्ण संरचनेवर आणि सांस्कृतिक पारंपारिकतेवर प्रभाव टाकते. प्रस्तुत घटकामध्ये विवाहसंस्था अभ्यासतांना आपण तीन भाग पाडले आहेत. पहिल्या भागात समाजशास्त्रज्ञानी विवाहाच्या केलेल्या व्याख्यांच्या आधारे विवाहाचा अर्थ स्पष्ट करून त्याची विविध वैशिष्ट्यावर चर्चा केली आहे. दुसऱ्या भागात समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समाजजीवनात विवाह संस्थेचे महत्व स्पष्ट केली आहेत तर तिसऱ्या भागात विवासंस्थेचे बदलते स्वरूपाची सविस्तर चर्चा केली आहे.

### २.२.१ विवाह संस्थेचा अर्थ आणि वैशिष्ट्ये (Meaning & Characteristics of Marriage Institution)

समाजातील सदस्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता करण्यासाठी विविध सामाजिक संस्थांची निर्मिती करण्यात आली आहे. मानवाने स्वतःच्या गरजांच्या पूर्तीसाठी प्रस्थापित केलेले सुसंघटित वर्तनप्रकार किंवा नियम म्हणजे सामाजिक संस्था होय. सामाजिक संस्थांचे स्वरूप हे सार्वजनिक आहे. कारण प्रत्येक समाजात संस्था आढळून येतात. प्राचीन काळापासूनच विवाह, कुटुंब, धर्म, राजकीय, आर्थिक इत्यादी सामाजिक संस्था अस्तित्वात आहेत.

विवाहसंस्था ही समाजातील प्राचीन आणि एक महत्त्वपूर्ण सामाजिक संस्था आहे. तसेच जगातील प्रत्येक समाजाच्या संस्कृतीचे एक अविभाज्य अंग आहे. विवाहाशिवाय प्रगत किंवा अप्रगत समाजाची कल्पनाच करता येत नाही. मात्र दोन स्त्री–पुरुषांच्या लैंगिक संबंधांना सामाजिक मान्यता देणे हाच विवाहाचा केवळ एकमेव उद्देश नाही. या उद्देशाबरोबरच त्या दोन स्त्री–पुरुषांनी एकत्र जीवन घालवावे. आपल्या

सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडाव्यात हे ही विवाहाचे उद्देश आहेत. विवाहित स्त्री-पुरुषांनी कोणत्या प्रकारचे एकमेकांशी संबंध ठेवावे. त्यांचे त्यांच्या मुलांशी, नातेवाईकांशी आणि समाजाशी कशा प्रकारचे संबंध असावे, त्यांनी कोणत्या सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडाव्यात, याबाबतचे नियम विवाह संस्थेद्वारे निश्चित केले जातात.

**अ) विवाह संस्था: व्याख्या (Marriage Institution: Definition)**

विवाहाचा अर्थ (Meaning of Marriage) स्पष्ट करण्याच्या दृष्टीने अनेक विचारवंतांनी विवाहाच्या व्याख्या दिल्या आहेत त्या व्याख्यापैकी काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

**१) बोगार्डस (E. S. Bogardus)**: ''स्त्री पुरुषांना कौटुंबिक जीवनात प्रवेश देणारी विवाह ही एक संस्था आहे.'' ("Marriage is an institition for admitting men and women to family life." - Bogardus)

**२) गिलिन व गिलिन (Gillin & Gillin)**: ''प्रजननासाठी कुटुंब स्थापित करण्याचा समाज संमत मार्ग म्हणजे विवाह होय.'' ("Marriage is a Socially approved way of establishing a family of procreation"-Gillin & Gillin)

**३) एडवर्ड वेस्टरमार्क (Edward Westermarck):** ''विवाह म्हणजे एका किंवा अनेक पुरुषांचा, एका किंवा अनेक स्त्रियांशी असलेला संबंध होय. ज्यास प्रथा किंवा कायद्याने मान्यता दिलेली असते. तसेच त्यात समाविष्ट झालेल्या दोन्ही बाजूविषयी तसेच त्यांच्यापासून जन्मास येणाऱ्या अपत्याबाबत काही अधिकार व कर्तव्यांचा समावेश होतो.'' ("Marrage is a relation of one or more men to one or more women which is recognised by custom or law and involves certain rights and duties both in the case of parties-entering the union and in the case of children born of it."-Westermarck)

**४) बील्स आणि होईजर (Beals and Hoijer)** : ''विवाह ही प्रत्येक समाजातील क्लिष्ट अशी सांस्कृतीक घटना आहे. तिच्याद्वारे केवळ जैविक कार्यच पूर्ण होत नाहीत. तर त्याशिवाय लहान मुलांचे संगोपन, कुटुंबाचे पालनपोषण आणि इतर कौटुंबिक गरजांची पूर्ती होते.'' (Marriage in every human society that we know is a complex cultural phenomenon in which the purely biological functions of mating plays but a small role in such sociological functions as the care of children, the maintenance of the house hold and other culturally in needs of the family." - Beals and Hoijer)

**६) हॅरी जॉन्सन (Harry Johnson)**: ''विवाहाने पती-पत्नीचे स्थायी संबंध निर्माण होतात तसेच लैंगिक संतुष्टित प्रजाननाचे अधिकार मिळतात'' ("Marriage gives the husband and wife a permanent relationship and the right to sexually satisfied procreation"- Harry Johnson)

वरील व्याख्यांवरून स्पष्ट होते की,

१) विवाहाने एक किंवा अनेक पुरुषांचा, एक किंवा अनेक स्त्रियांशी संबंध स्थापित होतो.

२) विवाहास समाज, धर्म तसेच कायद्याची मान्यता असते.

३) विवाहातून कुटुंबाची स्थापना होते.

४) विवाहाने एकत्रित आलेल्या पती-पत्नीस कामवासनापूर्ती व प्रजननाचा अधिकार मिळतो.

५) विवाहाने संबंधित असलेल्या पती-पत्नीचे काही अधिकार व कर्तव्ये असतात.

६) विवाहाने स्थायी संबंध निर्माण होतात.

७) अपत्यांचे संगोपन, आर्थिक सहकार्यात दोघेही सहभागी असतात.

थोडक्यात, विवाहाचा मूळ आधार स्त्री-पुरुषांचे लैंगिक संबंध हा आहे. अशा प्रकारच्या संबंधांना विवाहाद्वारेच मान्यता दिली जाते. विवाहपूर्व लैंगिक संबंधांना मान्यता दिली जात नाही. काही आदिवासी समाजात विवाहपूर्व लैंगिक संबंध प्रस्थापित करण्याची परवानगी आहे. परंतु हा अपवाद मानता येईल. विवाहपूर्व लैंगिक संबंधांना मान्यता असलेल्या जमातीत सुद्धा विवाहसंस्था अस्तित्वात आहे. जगातील प्रत्येक समाजात व्यक्तींच्या लैंगिक संबंधावर कोणत्या ना कोणत्या प्रकारचे नियंत्रण आढळून येते. प्रत्येक समाजात विवाहाच्या वेगवेगळ्या प्रथा अस्तित्वात असलेल्या दिसून येतात. तरीही विवाहास सामाजिक मान्यता किंवा कायद्याची मान्यता असावीच लागते. विवाहाद्वारे विवाहित स्त्री-पुरुषांचे संबंध, मुलांचे संगोपन याबाबतच्या पारस्पारिक संबंधाचे स्वरूप निश्चित केले जाते. तसेच विवाहितांचे अधिकार आणि कर्तव्य कोणते यांचे देखील स्पष्टीकरण केले जाते.

### ब) विवाह संस्थेची वैशिष्ट्ये (Characteristics of Marriage Institution)

वर दिलेल्या व्याख्या आणि त्यातील मुद्यांच्या आधारे विवाहाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

#### १) संघ (Union):

विवाह हा दोन किंवा अधिक भिन्न लिंगीय व्यक्तींचा संघ आहे. यामध्ये एक पुरुष व एक स्त्री किंवा एक पुरुष आणि अनेक स्त्रिया किंवा अनेक पुरुष व एक स्त्री अशा सदस्यांचा समावेश होतो. एक स्त्री आणि एक पुरुष यांच्या विवाहास एक विवाह म्हणतात. तर ज़्या वेळी दोन पेक्षा जास्त स्त्री-पुरुष विवाह करतात. तेव्हा त्यास बहूविवाह असे म्हणतात. एक प्रकारे विवाहातून संघ निर्माण होतो. त्यांच्यात भावनिक नाते प्रबळ होतात.

#### २) समाजमान्यता (Social Acceptance):

विवाहास समाजाची संमती असते. ही संमती प्रथा किंवा कायद्याद्वारे दिली जाते, विवाहानंतर समाजातील विविध नात्यांना मान्यता मिळते. स्त्री-पुरुषांच्या लैंगिक संबंधाना विवाहाद्वारेच मान्यता दिली

जाते. समाजमान्यते प्रमाणेच विवाहाला धर्माची आणि शासनाची मान्यता आवश्यक असते. समाज आणि कायद्याच्या मान्यतेमुळे वारसा हक्क ठरविणे सोपे झाले आहे.

**३) धार्मिक आणि सांस्कृतिक विधी (Religious and Cultural Rituals):**

विवाह विविध धर्मांमध्ये धार्मिक विधींनी संपन्न होतो. प्रत्येक समाज, धर्म, आणि समुदायाच्या पारंपरिक रूढी, रिती, आणि प्रथा या विवाह सोहळ्यात दिसून येतात. उदा. भारतातील हिंदू विवाहामध्ये सप्तपदीचा विधी, मुस्लिम विवाहात निकाह, ख्रिस्ती विवाहामध्ये चर्चमधील प्रतिज्ञा इत्यादी त्याचे काही उदाहरण आहेत. या विधींना धार्मिक महत्त्व असून, समाजात कुटुंबाच्या स्थापनेसाठी आवश्यक मानले जाते.

**४) कुटुंब निर्मिती (Creation of Family):**

विवाह संस्थेचा सर्वात महत्त्वाचा उद्देश म्हणजे कुटुंबाची स्थापना होय. विवाहामुळे एक नवीन कुटुंब निर्माण होते. यामध्ये वर- वधू दोघांनाही कुटुंबाचे पालनपोषण करण्याची जबाबदारी असते. तसेच, संतती निर्माण करून कुटुंबाचा विस्तार होतो. कुटुंब ही समाजातील प्राथमिक आणि अत्यावश्यक घटक आहे.

**५) भावनिक आणि मानसिक आधार (Emotional and Psychological Support):**

विवाह हा फक्त कायदेशीर करार नाही, तर प्रेम, आदर, आणि सहकार्याच्या भावनांवर आधारित असतो. पती-पत्नी एकमेकांना भावनिक आणि मानसिक आधार देतात. एकमेकांच्या जीवनातील संघर्षांमध्ये, समस्या सोडवण्यात, आणि आनंद साजरा करण्यामध्ये दोघांचे सहकार्य महत्त्वाचे असते. अशा भावनिक बंधामुळे वैयक्तिक आयुष्यात स्थैर्यता निर्माण होते.

**६) प्रजनन आणि संतती (Procreation and Offspring):**

विवाह संस्थेचा एक महत्त्वाचा उद्देश म्हणजे प्रजनन, ज्यामुळे संततीची निर्मिती होते. विवाहामुळे संतानाच्या जन्माला सामाजिक आणि कायदेशीर मान्यता मिळते. संततीचा पालनपोषण आणि शिक्षण करण्याची जबाबदारी पती-पत्नीची असते, ज्यामुळे समाजातील पुढील पिढी घडविण्यात मदत होते.

**७) लैंगिक संबंध (Sexual Relationship):**

विवाहातील एक महत्त्वाचा घटक म्हणजे लैंगिक संबंध. विवाहाच्या माध्यमातून समाजमान्य आणि वैध लैंगिक संबंध ठेवले जातात. हे संबंध विवाहाच्या स्थैर्याला आधार देतात आणि संतती निर्माण करण्याचा आधारस्तंभ ठरतात. लैंगिक संबंधांची संतुलन साधल्यास पती पत्नीच्यानात्याचे बंध अधिक बळकट होतात आणि मानसिक समाधान प्राप्त होते.

**८) विविधता आणि अनुकूलता (Diversity and Adaptability):**

विविध समाजांमध्ये विवाहाच्या पद्धती वेगवेगळ्या असतात. प्रत्येक संस्कृती आणि समाजाच्या विवाहविषयक रूढी आणि परंपरा वेगळ्या असतात. एकमेकांच्या संस्कृती आणि परंपरांशी अनुकूल होऊन विवाहात संतुलन साधणे आवश्यक असते. उदाहरणार्थ, आंतरधर्मीय किंवा आंतरजातीय विवाहात दोन

वेगवेगळ्या परंपरा जुळवून घेणे आवश्यक असते. दोघांमध्ये अनुकूलता आणि लवचिकता असल्यास विवाह अधिक सुदृढ होतो.

थोडक्यात, विवाहाचे हे सर्व वैशिष्ट्ये समाजाच्या, व्यक्तीच्या आणि कुटुंबाच्या जीवनात महत्त्वपूर्ण आहेत. विवाह हे केवळ एका नात्याचे प्रतिनिधित्व करत नाही, तर ते समाजात नवीन संबंध, कर्तव्ये, आणि जबाबदाऱ्या निर्माण करते. या वैशिष्ट्यांच्या माध्यमातून विवाह एक स्थिर, सुरक्षित, आणि प्रेमळ नाते निर्माण करते, जे वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाच्या समृद्धीसाठी आवश्यक आहे.

### २.२.२ विवाहसंस्थेचे महत्व (Importance of Marriage Institution)

विवाहसंस्थेचे महत्त्व समजून घेण्यासाठी तिचे विविध आयाम आणि घटकांचा सविस्तर विश्लेषण करणे आवश्यक आहे. हे विश्लेषण समजून घेतल्यास विवाहसंस्था कशी व्यक्ती, कुटुंब, आणि समाजासाठी महत्त्वाची ठरते ते लक्षात येईल. विवाहसंस्था ही समाजाच्या मूलभूत संस्था मानली जाते. ती केवळ दोन व्यक्तींमधील नाते नाही, तर समाजातील विविध घटकांना एकत्र आणणारी, कुटुंब निर्माण करणारी आणि सांस्कृतिक परंपरा पुढे नेणारी महत्त्वाची संस्था आहे. विवाहसंस्थेचे महत्त्व सविस्तरपणे खालीलप्रमाणे सांगता येईल

#### १) कुटुंबाची निर्मिती (Formation of Family):

विवाहाच्या माध्यमातून कुटुंबाची निर्मिती होते. कुटुंब ही समाजाची अत्यंत महत्त्वाची आणि प्राथमिक संस्था आहे. कुटुंबामध्ये मुलांचे जन्म आणि त्यांचे संगोपन होते. कुटुंब हेच मुलांच्या शारीरिक, मानसिक, आणि सामाजिक विकासासाठी पहिली शाळा ठरते. समाजातील वर्तणुकीचे नियम, सांस्कृतिक परंपरा, आणि नैतिक मूल्ये मुलांना कुटुंबाच्या माध्यमातून मिळतात. त्यामुळे, विवाहसंस्था केवळ नाते तयार करत नाही, तर ती एका नवीन पिढीची देखील जडणघडण करते, जी समाजाच्या विकासासाठी महत्त्वाची आहे.

#### २) भावनिक आधार (Emotional Support):

विवाह हा भावनिक स्थैर्याचे स्त्रोत आहे. विवाहात पती-पत्नी एकमेकांना भावनिक आधार देतात. हे भावनिक बंधन जीवनातील कठीण प्रसंगांना सामोरे जाण्याची ताकद देते. विवाहामुळे पती-पत्नीमध्ये प्रेम, सहकार्य, आणि समजूतदारपणा निर्माण होतो, ज्यामुळे व्यक्तीला वैयक्तिक आयुष्यात स्थैर्य मिळते. एकमेकांवर असलेल्या विश्वासामुळे जोडीदार मानसिक आरोग्याच्या दृष्टीने मजबूत होतात, आणि मानसिक ताण कमी होतो. अशा प्रकारे, विवाहसंस्था भावनिक स्थैर्य निर्माण करण्याचे कार्य करते.

#### ३) प्रजनन आणि संतती (Reproduction and Offspring):

विवाहसंस्था संततीच्या जन्मासाठी एक मान्यताप्राप्त मार्ग आहे. संततीचा जन्म आणि तिचे पालनपोषण हे समाजाचे सातत्य टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असते. विवाहामुळे संततीसाठी एक सुरक्षित आणि

सांस्कृतिकदृष्ट्या मान्यताप्राप्त वातावरण मिळते. यामुळे मुलांचे शारीरिक, मानसिक, आणि सामाजिक विकास योग्य प्रकारे होतो. संततीसाठी विवाहसंस्था ही एक संरक्षित आधारभूत संस्था आहे.

### ४) लैंगिक संबंधांतील स्थिरता (Stability in Sexual Relationships):

विवाहसंस्था समाजात वैध आणि नैतिक लैंगिक संबंधांसाठी आधार देते. विवाहामुळे पती-पत्नीमध्ये एकनिष्ठता निर्माण होते, ज्यामुळे समाजात लैंगिक संबंधांमधील नैतिकता आणि शिस्त राखली जाते. विवाहामुळे अनुचित आणि अनैतिक लैंगिक संबंधांपासून बचाव होतो. लैंगिक संबंधातील स्थिरता समाजातील शांती आणि सुरक्षिततेसाठी महत्त्वाची असते. विवाहामुळे पती-पत्नीमध्ये विश्वास, निष्ठा, आणि आदर असतो, ज्यामुळे संबंध अधिक बळकट होतात.

### ५) मानसिक स्थैर्य (Psychological Stability):

विवाहामुळे पती-पत्नीमध्ये मानसिक स्थैर्य निर्माण होते. एकमेकांच्या आधाराने वैयक्तिक ताण, चिंता, आणि असुरक्षितता दूर होतात. मानसिक स्थैर्यामुळे वैवाहिक जीवन अधिक सुखकर आणि समृद्ध बनते. विवाहामुळे एकमेकांमध्ये संवाद, विश्वास, आणि सामंजस्याचे वातावरण निर्माण होते, ज्यामुळे वैयक्तिक जीवनात सकारात्मकता येते.

### ६) सामाजिक स्थैर्य (Social Stability):

विवाहसंस्थेमुळे समाजात शिस्त, नैतिकता, आणि नियमांची अंमलबजावणी होते. विवाहामुळे व्यक्तींना समाजातील योग्य भूमिका मिळते आणि कुटुंबातील सदस्य आपल्या जबाबदाऱ्या स्वीकारतात. विवाहामुळे पती-पत्नी आणि त्यांचे कुटुंब एकमेकांशी जोडले जातात, ज्यामुळे समाजातील नाती अधिक मजबूत होतात. समाजात विवाहासारख्या संस्थेमुळे एक स्थिरता निर्माण होते, ज्यामुळे समाजातील एकत्रिकरण आणि एकोपा टिकून राहतो.

### ७) आर्थिक स्थैर्य (Economic Stability):

विवाहामुळे पति-पत्नी दोघांचे उत्पन्न एकत्र येते आणि कुटुंबाचे आर्थिक व्यवस्थापन सुदृढ होते. दोघेही एकत्रितपणे आर्थिक निर्णय घेतात, ज्यामुळे आर्थिक सुरक्षा निर्माण होते. बचत, गुंतवणूक, आणि संपत्तीचे व्यवस्थापन हे विवाहामुळे शक्य होते, ज्यामुळे कुटुंबातील सदस्यांना आर्थिक स्थैर्य मिळते. समाजाच्या आर्थिक विकासासाठी विवाहसंस्था महत्त्वाची भूमिका बजावते, कारण कुटुंबाची आर्थिक घडी व्यवस्थित राहिल्यामुळे समाजातील आर्थिक संतुलन राखले जाते.

### ८) समाजिक प्रतिष्ठा (Social Status and Recognition):

विवाहामुळे पती-पत्नीला समाजात प्रतिष्ठा मिळते. समाजाच्या दृष्टीने विवाहबद्ध लोकांना अधिक आदर दिला जातो, कारण त्यांनी समाजाच्या नियमांनुसार कुटुंबाची स्थापना केली आहे. विवाहबद्ध लोकांना

समाजात अधिक सामाजिक जबाबदाऱ्या सोपवल्या जातात, ज्यामुळे त्यांची प्रतिष्ठा वाढते. त्यामुळे समाजातील अन्य घटकांशी त्यांचे संबंध अधिक मजबूत होतात.

**९) सांस्कृतिक परंपरा जतन (Preservation of Cultural Traditions):**

विवाहसंस्थेमध्ये विविध धार्मिक आणि सांस्कृतिक विधींचा समावेश असतो, ज्यामुळे परंपरा आणि संस्कार पुढे नेले जातात. विवाहसोहळ्यातील विधी आणि रूढी समाजातील सांस्कृतिक मूल्यांचे प्रतीक असतात. विवाहसंस्था ही त्या परंपरांचे पालन करून समाजात सांस्कृतिक वारसा जतन करण्याचे कार्य करते. यातूनच पुढील पिढ्यांना आपली संस्कृती आणि परंपरा शिकवली जाते.

**१०) कायदेशीर आणि सामाजिक हक्क (Legal and Social Rights):**

विवाहामुळे पती-पत्नीला एकमेकांच्या संपत्तीवर आणि संततीवर हक्क मिळतात. कायद्याने दोघांना समान अधिकार मिळतात, ज्यामुळे संततीच्या शिक्षण, वारसाहक्क, आणि इतर आर्थिक बाबतीत निर्णय घेण्याचे अधिकार स्पष्ट होतात. यामुळे समाजातील अन्यायकारक प्रथा आणि विभाजन रोखले जातात, आणि दोघेही समान हक्कांचे हकदार बनतात. विवाहामुळे कायदेशीर संरक्षण मिळते, ज्यामुळे कुटुंब सुरक्षित राहते.

थोडक्यात, विवाहसंस्था ही समाजातील अत्यंत महत्त्वाची आणि अनिवार्य संस्था आहे. ती फक्त दोन व्यक्तींमधील नाते नव्हे, तर ती समाजातील विविध घटकांचे संतुलन राखण्याचे कार्य करते. विवाहसंस्था कुटुंब, समाज, आणि संस्कृती यांच्यातील बंधन अधिक घट्ट करते. त्यामुळे समाजातील नैतिकता, शिस्त, आणि सांस्कृतिक मूल्यांची जोपासना करण्यासाठी विवाहसंस्था आवश्यक आहे.

## २.२.३ विवाह संस्थेचे बदलते स्वरूप (Changing Nature of Marriage Institution)

विवाह एक सामाजिक आणि सांस्कृतिक संस्था आहे. जी हजारों वर्षांपासून मानव संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. हे फक्त दोन व्यक्तींमधील संबंध नाही तर एका समाजातील मूल्ये, नियम, आणि परंपरांचे प्रतिनिधित्व करते. समयानुसार आणि समाजाच्या विकासासोबत विवाह संस्था अनेक बदलांमधून गेली आहे. परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे. प्राचीन काळापासून आजपर्यंत समाजव्यवस्थेत अनेक बदल झाले आहेत. विवाह संस्थाही त्याला अपवाद नाही. औद्योगिक क्रांतीनंतर संपूर्ण समजव्यवस्था ढवळून निघाली. बदलत्या परिस्थितीनुसार विवाहसंस्थेत परिवर्तन घडून आले आहेत. विवाहसंस्थेत कोणकोणते परिवर्तन घडून येत आहे, हे लक्षात घेतांना विवाहसंस्थेच्या पद्धती आणि नियमांमध्ये कोणकोणते परिवर्तन घडून आले आहे, याचा विचार करावा लागतो.

**१) विवाह पद्धतीमधील परिवर्तन (Changes in Marriage System):**

पूर्वी विवाह हा एक धार्मिक संस्कार मानला जात असे. विवाहाचा संबंध हा धर्माशी जोडण्यात येत असे. विवाहात धार्मिक विधींना विशेष महत्व होते. धार्मिक विधी संपन्न झाल्याशिवाय विवाह संपन्न झाला

असे मानले जात नाही. हिंदू धर्मात विवाह हा एक संस्कार मानण्यात आला होता. आधुनिक काळात मात्र विवाह समारंभातील धार्मिक विधीचे महत्व कमी होत आहे. आधुनिक काळात नोंदणी विवाहाला कायद्याने मान्यता देण्यात आली आहे. अलिकडे नोंदणी पद्धतीद्वारे विवाह होत आहेत. नोंदणी विवाह हा कोर्टात होत असतो. नोंदणी विवाहात धार्मिक विधी वा कर्मकांड नसते. कायद्याच्या आधारे हा विवाह केला जातो. इतकेच नाही तर अलीकडे लिव्ह इन रिलेशनशिप सारखे विवाह न करता एकत्र राहणे या पाच्यात्य संस्कृती चा स्वीकार काही लोक करू लागली आहेत. विवाहाच्या पद्धतीत परिवर्तन झाल्यामुळे त्याचा परिणाम विवाह संस्थेवर पडलेला आढळतो.

**२) विवाहाचा जोडीदार निवडण्याच्या पद्धतीत परिवर्तन (Changes in Selection of Marriage Partner):**

पूर्वी विवाहासाठी मुला-मुलींना स्वतःच्या इच्छेनुसार जोड़ीदार निवडण्याचे स्वातंत्र्य नव्हते. आईवडील किंवा वडीलमंडळी स्वतः जोडीदार निवडत असत. वडीलधाऱ्या मंडळींनी निवडलेल्या जोडीदारासोबत विवाह करणे अनिवार्य असायचे. आपल्या मुला किंवा मुलीकरिता जोडीदार निवडतांना कुल, कुटुंबाची प्रतिष्ठा इत्यादी गोष्टी विचारात घेतल्या जायच्या. मुलागा किंवा मुलीचे मत जोडीदाराच्या संदर्भात विचारात घेतले जात नव्हते. आधुनिक काळात विवाहाच्या जोडीदार निवडण्याच्या पद्धतीत आधुनिक काळात मोठे बदल झाले आहेत. ऑनलाईन डेटिंग ॲप्स चा वापर प्रचंड वाढला आहे, ज्यामुळे व्यक्तींना विविध लोकांशी संवाद साधता येतो. याशिवाय, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि निवडीच्या अधिकाराला अधिक महत्त्व दिले जाते, ज्यामुळे पारंपारिक कुटुंबाची भूमिका कमी होत आहे. सामाजिक बदलांमुळे आंतरजातीय आणि आंतरधार्मिक विवाहांबद्दल अधिक स्वीकार्यता निर्माण झाली आहे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने व्यक्तिमत्व चाचण्या आणि प्रोफाइल्सचा अभ्यास करून विचारपूर्वक निर्णय घेण्याची प्रवृत्ती वाढली आहे, ज्यामुळे विवाह पद्धतीत अधिक लवचीकता आणि विविधता दिसून येते.

**३) विवाहाच्या वयात वाढ (Increase in the Age of Marriage):**

विवाहाचे वाढलेले वय हा आधुनिक काळातील विवाह संस्थेतील महत्त्वपूर्ण बदलांपैकी एक आहे. पूर्वीच्या काळात विवाह लवकर होण्याची प्रथा होती, विशेषतः ग्रामीण भागात, परंतु आजच्या शहरीकरण आणि आधुनिकतेमुळे विवाहाचे वय वाढलेले दिसून येते. या बदलाचे अनेक सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, आणि वैयक्तिक कारण आहेत.

पूर्वी मुलींचे लग्न वयाच्या १८ वर्षांपूर्वी तर मुलांचे २५ वयापूर्वी होत असे. परंतु आजच्या काळात शिक्षण, करिअर, आणि आर्थिक स्थैर्याला महत्त्व दिले जात आहे. युवक-युवतींना आर्थिक आणि वैयक्तिक स्थैर्य मिळवण्यास अधिक वेळ लागतो, त्यामुळे विवाहाचे वय लांबणीवर पडते. विशेषतः महिला उच्च शिक्षण घेऊन आपल्या करिअरमध्ये स्थिर झाल्यानंतरच विवाह करण्याचा निर्णय घेत आहेत. यामुळे लवकर लग्नाचे प्रचलन कमी झाले आहे.

### ४) जात आणि धर्मातील बंधने कमी (Fewer Caste and Religion Barriers):

विवाहाच्या संदर्भात अंतर्गत आणि बहिर्विवाह हे दोन महत्वाचे नियम होत. पूर्वी या नियमांचे पालन केले जात असे. परंतु आज अंतर्गत विवाह नियम बराच शिथील झालेला दिसून येतो. जातीअंतर्गत विवाहाऐवजी जाती बहिर्विवाह केले जातात. जाती बहिर्विवाह हे साधारणतः प्रेमसंबंधातून घडून येतात. बहिर्विवाहाच्या नियमानुसार निषेध नियम रद्द झाला. पूर्वी विवाह केवळ जातीय किंवा धार्मिक समुदायांमध्येच होतात हे सुनिश्चित करण्यासाठी सामाजिक दबाव असायचा. आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह फारच कमी होते, आणि तेवढेच सामाजिक निषेधाला सामोरे जावे लागे. आधुनिक काळात, शिक्षण, शहरीकरण, आणि आर्थिक प्रगतीमुळे आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांचे प्रमाण वाढले आहे. तरीही, ग्रामीण भागांमध्ये आणि काही पारंपरिक कुटुंबांमध्ये अजूनही अशा विवाहांवर नकारात्मक दृष्टिकोन असतो. आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारने काही ठिकाणी प्रोत्साहन योजनाही राबविल्या आहेत.

### ५) घटस्फोटाचे वाढते प्रमाण (Increasing Divorce Rates):

भारतामध्ये घटस्फोटाचे वाढते प्रमाण हे एक मोठे विवाह संस्थेतील परिवर्तन आहे, ज्याचे अनेक कारणे आहेत. पारंपरिक दृष्टिकोनानुसार विवाह हा जन्मोजन्मीचा बंध मानला जात होता आणि घटस्फोटाला एक गंभीर सामाजिक कलंक म्हणून पाहिले जात असे. परंतु आता समाजात घटस्फोटाचा स्वीकार अधिक होतो आहे. व्यक्तीचे वैयक्तिक स्वातंत्र्य, मानसिक आरोग्य, आणि नातेसंबंधांचा ताण लक्षात घेऊन घटस्फोटाच्या संख्येत वाढ झाली आहे. अनेक जोडपी घटस्फोटानंतर पुन्हा विवाह करण्याचा निर्णय घेतात, आणि समाजदेखील आता त्यांना पुन्हा एकत्र राहण्यासाठी अधिक मान्यता देत आहे.

### ६) हुंड्याच्या स्वरूपात बदल (Change in Form of Dowry):

विवाह संस्थेतील एक अनिष्ट प्रथा म्हणजे हुंडा प्रथा. हुंडा प्रथेत कालानुसार अनेक बदल झाले आहेत. प्राचीन काळात ही प्रथा सन्मान आणि प्रेमाचे प्रतीक मानली जात होती, ज्यात वधूपक्षाने वरपक्षाला उपहार, संपत्ती किंवा आर्थिक मदत दिली जात असे. मात्र, मध्ययुगीन आणि आधुनिक काळात हुंडा एक जबरदस्त मागणी बनली, ज्यामुळे वधूपक्षावर मोठा आर्थिक ताण निर्माण होऊ लागला. परिणामी, हुंडामुळे स्त्रियांचा छळ आणि अन्याय वाढला. समाजातील बदल आणि सुधारणा लक्षात घेता, १९६१ मध्ये भारतात हुंडाबंदी कायदा लागू झाला, ज्याने हुंडा देणे आणि घेणे बेकायदेशीर ठरवले. या कायद्याने हुंडा प्रथेवर काही प्रमाणात नियंत्रण आणले असले तरी, काही भागात अजूनही ही प्रथा अस्तित्वात आहे. शिक्षण, महिला सक्षमीकरण, आणि शहरीकरणामुळे समाजात जागरूकता वाढली आहे, ज्यामुळे या प्रथेचा विरोध होऊ लागला आहे. महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य आणि सामाजिक चळवळींमुळे हुंडा प्रथेला थांबवण्याचे प्रयत्न वाढले आहेत, तरीही ग्रामीण भागात आणि विशिष्ट समुदायांमध्ये वधूपक्षावर अजूनही आर्थिक ताण निर्माण होत असल्याचे दिसून येते.

### ७) बहुविवाहास कायद्याने बंदी (Polygamy banned by law):

पूर्वी बहुविवाह प्रथा अस्तित्वात होती. अनेक लोक बहुविवाह करायचे. विशेष म्हणजे बहुपत्नीत्वाची प्रथा रूढ होऊ लागली होती. भारतात बहुविवाहाला कायद्याने बंदी आहे आणि या संदर्भातील कायदे विविध धर्मांनुसार वेगवेगळी आहेत. बहुविवाह म्हणजे एका व्यक्तीने एकाच वेळी दोन किंवा त्याहून अधिक विवाह करणे. या प्रथेला अनेक समाजांमध्ये पारंपरिक मान्यता असली तरी, भारतीय कायद्यात बहुविवाहाला विरोध केला गेला आहे. भारतात बहुविवाहाला कायद्याने विविध धर्मांनुसार वेगवेगळी मान्यता आहे. हिंदू धर्मातील व्यक्तींसाठी हिंदू विवाह अधिनियम, १९५५ अंतर्गत बहुविवाहाला मान्यता नाही, जिथे एकाच वेळी एकाच व्यक्तीशी विवाह करण्याचे अधिकार असतात. मुस्लीम समाजात शरियत कायद्यानुसार एका पुरुषाला चार बायका असण्याचा अधिकार आहे, परंतु प्रत्येक बायकोसह समान न्याय देणे आवश्यक आहे. ख्रिश्चन धर्मातील व्यक्तींना इंडियन ख्रिश्चन मॅरेज ॲक्ट, १८७२ आणि १९५४ अंतर्गत एकाच वेळी एकाच व्यक्तीशी विवाह करण्याचा अधिकार आहे, तर पारसी समाजात पारसी विवाह आणि वेगळे राहण्याचे कायदे, १८६५ अंतर्गत बहुविवाहाला कायदेशीर मान्यता नाही.

सामाजिक दृष्टिकोनातून, भारतात बहुविवाहाची प्रथा पारंपरिक मानली जात असली तरी, आधुनिक काळात ही एक वादग्रस्त समस्या बनली आहे. कायद्याच्या आणि समाजातील सुधारणा उपाययोजनांमुळे, महिलांच्या हक्कांचे संरक्षण करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत, ज्यामुळे बहुविवाहाच्या समस्येवर चर्चा सुरू आहे.

### ८) विधवा पुनर्विवाहास मान्यता (Recognition of Widow Marriage):

हिंदूच्या परंपरागत विवाह कायद्यानुसार विधवेने पुनर्विवाह करणे निषिद्ध मानले होते. पण त्यामुळे त्यातून अनेक वाईट प्रथा, परंपरा निर्माण झाल्यात. प्रारंभिक काळात विधवा विवाहास समाजाने मान्यता दिली नव्हती आणि विधवा महिलांना पुनर्विवाहाची संधी मिळवणे कठीण होते. तथापि, हिंदू विधवा पुनर्विवाह अधिनियम, १८५६ सारख्या कायद्यांमुळे विधवा महिलांना पुनर्विवाहाचा अधिकार प्राप्त झाला, ज्यामुळे त्यांच्या सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा झाली. या कायद्यामुळे विधवा विवाहास कायदेशीर मान्यता मिळाली, आणि महिलांच्या स्वातंत्र्याची भावना आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण वाढले.

समाजात विधवा विवाहाला मान्यता मिळाल्यामुळे विवाहाच्या सामाजिक स्थितीमध्ये मोठा बदल झाला. विधवा महिलांना पुनर्विवाहाची संधी मिळाल्यामुळे समाजातील लवचिकता आणि समावेशी दृष्टिकोन वाढला आहे. आधुनिक पिढीने विधवा विवाहास मान्यता दिली असली तरी, काही सांस्कृतिक आणि आर्थिक अडचणी अद्याप आहेत, ज्यामुळे विधवा विवाहाच्या प्रक्रियेत सुधारणा आवश्यक आहे. यामुळे समाजातील बदलत्या धारणा आणि जागरूकतेच्या आधारावर विधवा विवाहाची प्रक्रिया अधिक समावेशी होण्याची गरज आहे.

### ९) लिव–इन रिलेशनशिप (Live-in Relationship):

लिव्ह–इन रिलेशनशिप म्हणजे दोन व्यक्ती एकत्र राहून, एकमेकांशी विवाह न करताही, वैवाहिक स्वरूपात सहजीवन व्यतीत करतात. यात विवाहाच्या कायदेशीर बंधनांशिवाय दोघेही एकमेकांशी संबंध ठेवतात. या संबंधांना व्यक्तींच्या परस्पर सहमतीवर आधारित स्वातंत्र्य प्राप्त आहे. विवाहाचे बंधन नाकारून देखील या नात्याला एक जबाबदार सहजीवनाचे स्वरूप दिले जाते.

लिव्ह–इन रिलेशनशिप आणि विवाहाशिवाय सहजीवन या संकल्पना आधुनिक भारतीय समाजात हळूहळू प्रचलित होत आहेत. समाजातील बदलती जीवनशैली, वैयक्तिक स्वातंत्र्याची भावना, आणि पश्चिमी संस्कृतीचा प्रभाव यामुळे या संकल्पनांना भारतात अधिक स्वीकृती मिळत आहे. पारंपरिक विवाहसंस्थेच्या मर्यादांना बाजूला ठेवून अनेक व्यक्ती आता विवाहाशिवाय एकत्र राहण्याचा निर्णय घेत आहेत. हे सहजीवन वैयक्तिक स्वातंत्र्य, आर्थिक स्थैर्य, आणि समकालीन विचारसरणीचे प्रतिक आहे.

### १०) समलैंगिक विवाह (Same-Sex Marriage):

समलैंगिक संबंध आणि समलैंगिक विवाह पूर्वी समाजात निषिद्ध मानले जात होते. मात्र, अनेक देशांनी समलैंगिक विवाहाला कायदेशीर मान्यता दिली आहे. ही मान्यता मिळाल्यानंतर समलैंगिक जोडपी खुल्या मनाने समाजात एकत्र राहण्याचा विचार करत आहेत. समाजातील बदलत्या मानसिकतेमुळे आणि लैंगिकतेसंदर्भातील जागरूकतेमुळे आता समलैंगिक विवाह हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जाते.

### ११) समान हक्क आणि जबाबदाऱ्या (Equal Rights & Responsibilities)

पारंपरिक समाजात पतीला कुटुंबाचा प्रमुख मानले जात असे आणि पत्नीची भूमिका अधिकतर घर सांभाळणे अशी होती. पण आता समाजात लिंग समानतेची चर्चा वाढल्याने, स्त्री आणि पुरुषांना विवाहात समान हक्क आणि जबाबदाऱ्या दिल्या जात आहेत. स्त्री–पुरुष समानता हा एक महत्त्वाचा बदल आहे, ज्यामुळे विवाहातील परस्पर संबंध अधिक स्वस्थ आणि पारदर्शक झाले आहेत. दोन्ही पक्ष एकमेकांचा आदर करतात आणि जबाबदाऱ्या वाटून घेतात.

### १२) तंत्रज्ञानाचा प्रभाव (Impact of Technology)

तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे विवाह संस्थेवरही परिणाम झाला आहे. पूर्वी परिचय किंवा कुटुंबाच्या मार्फतच विवाह जुळवले जात असत, पण आता ऑनलाईन डेटिंग आणि मॅट्रिमोनियल वेबसाइट्सच्या माध्यमातून विवाह जुळवले जातात. सोशल मीडियाद्वारे लोक एकमेकांच्या जीवनशैलीची माहिती घेऊन, विचारपूर्वक विवाहाचे निर्णय घेतात. तंत्रज्ञानामुळे विवाह शोधण्याची प्रक्रिया अधिक सोपी आणि गतिमान झाली आहे. तंत्रज्ञानाने विवाहाच्या पद्धतींवर मोठा प्रभाव टाकला आहे. डिजिटल प्लॅटफॉर्म्सच्या माध्यमातून जोडप्यांचा शोध, संवादी प्रक्रिया, आणि विवाहाच्या विविध विधी ऑनलाइन पार पडू लागले आहेत.

थोडक्यात, बदलत्या काळानुसार विवाह संस्थेत सामाजिक आणि सांस्कृतिक बदल होत आहे. पारंपरिक दृष्टिकोनातील बदल, लिंग समतेचा विचार, आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह, लिव्ह-इन रिलेशनशिप्स, तंत्रज्ञानाचा प्रभाव, आणि आर्थिक विचार यामुळे विवाहाचे स्वरूप बदलले आहे. हे बदल समाजाच्या प्रगतिशीलतेचे आणि विविधतेचे प्रतीक आहेत, जे समाजाच्या बदलत्या गरजांना आणि इच्छांना प्रतिसाद देतात.

**स्वयं अध्ययनासाठीचे प्रश्न**

१) विवाह ही एक ......... स्वरूपाची संस्था आहे.

अ) दैवी ब) राजकीय क) सार्वत्रिक ड) आर्थिक

२) प्रजननासाठी कुटुंब स्थापित करण्याचा समाज संमत मार्ग म्हणजे...... होय.

अ) विवाह ब) राज्य क) समाज ड) प्रथा

३) .........हे विवाह संस्थेचे वैशिष्ट्ये आहे.

अ) समाजमान्यता ब) धार्मिक आणि सांस्कृतिक विधी

क) संघ ड) आंतरक्रिया

४) एक स्त्री आणि एक पुरुष यांच्या विवाहास ......... म्हणतात.

अ) एक विवाह ब) बहू विवाह क) बहू पत्नी विवाह ड) बहू पती विवाह

५) विवाहातून ......... स्थापना होते.

अ) राज्याची ब) देशाची क) कुटुंबाची ड) मंडळाची

६) हिंदू धर्मात विवाह हा एक ...... मानला जातो.

अ) करार ब) संस्कार क) व्याभिचार ड) धर्म

७) ......... हे विवाह संस्थेचे महत्व नाही.

अ) कुटुंबाची निर्मिती ब) मानसिक स्थैर्य

क) लैंगिक संबंधांतील अस्थिरता ड) आर्थिक स्थैर्य

८) हुंडाबंदी कायदा....... साली लागू झाला.

अ) १९४७ ब) १९६१ क) १९७० ड) २०००

९) .......... म्हणजे दोन व्यक्ती एकत्र राहून, एकमेकांशी विवाह न करताही, वैवाहिक स्वरूपात सहजीवन व्यतीत करतात. यात विवाहाच्या कायदेशीर बंधनांशिवाय दोघेही एकमेकांशी संबंध ठेवतात.

अ) लिव्ह-इन रिलेशनशिप ब) पारंपरिक विवाह

क) प्रेम विवाह ड) सहपलायन विवाह

१०) ........यांच्या मते, ''स्त्री पुरुषांना कौटुंबिक जीवनात प्रवेश देणारी विवाह ही एक संस्था आहे

अ) गिलीन ब) एडवर्ड वेस्टरमार्क क) हॅरी जॉन्सन ड) बोगार्डस

## २.४ सारांश

विवाहसंस्था एक महत्त्वपूर्ण सामाजिक संस्था आहे, जी दोन व्यक्तींच्या एकत्र येण्याची, समाजात मान्यता प्राप्त करण्याची, धार्मिक आणि सांस्कृतिक विधींनुसार साजरी करण्याची, कुटुंब निर्माण करण्याची, भावनिक आणि मानसिक आधार देण्याची, प्रजननाच्या उद्देशाने वापरण्याची, लैंगिक संबंध स्थापित करण्याची, आणि विविधतेस अनुकूल असलेल्या प्रकारात असते. विवाह संस्था आपल्या स्वरूपानुसार बदलते असून, त्याचे वैशिष्ट्ये समाजाच्या विकासानुसार व बदलत्या काळानुसार रूपांतरित होत आहेत. प्रस्तुत अध्ययन घटकातील पहिल्या उपविभागात आपण विवाहसंस्थेच्या व्याख्या आणि अर्थ अभ्यासला आहे. वेगवेगळ्या समाजशास्त्रज्ञानी त्यांच्या दृष्टिकोनातून व्याख्या दिलेल्या आहेत. विवाहसंस्था म्हणजे दोन व्यक्तींचा सार्वजनिक, कायदेशीर आणि सामाजिक नातेसंबंध, ज्यात ते एकमेकांशी प्रेम, समर्पण, आणि सहकार्य यावर आधारित एकत्र राहतात. या नात्यात अनेक सामाजिक, धार्मिक, आणि सांस्कृतिक अपेक्षा व नियम लागू होतात. असा अर्थ वरील व्याख्यांचा आहे. विवाहाचा अर्थ समजून घेण्यासाठी आपण विवाहाची वैशिष्ट्यावर चर्चा केली आहे. १. संघ २. समाजमान्यता ३. धार्मिक आणि सांस्कृतिक विधी ४. कुटुंब निर्मिती ५. भावनिक आणि मानसिक आधार ६. प्रजनन आणि संतती ७. लैंगिक संबंध ८. विविधता आणि अनुकूलता

विवाह संस्था एक सार्वत्रिक संस्था असून सामाजिक स्थैर्य टिकवून ठेवण्यासाठी मोलाची भूमिक पार पाडते. विवाह संस्थेतून कुटुंबाची निर्मिती होते. विवाहसंस्था ही व्यक्ती आणि समाजाच्या दृष्टीने अनेक महत्वपूर्ण कार्य पार पाडते. या घटकातील दुसऱ्या उपविभागात आपण विवाहाचे मानवी समाजातील महत्व पुढीलप्रमाणे अभ्यासली आहेत. १. कुटुंबाची निर्मिती २. भावनिक आधार ३. प्रजनन आणि संतती ४. लैंगिक संबंधांतील स्थिरता ५. मानसिक स्थैर्य ६. सामाजिक स्थैर्य ७. आर्थिक स्थैर्य ८. समाजिक प्रतिष्ठा ९. सांस्कृतिक परंपरा जतन १०. कायदेशीर आणि सामाजिक हक्क.

समाजात निरंतरपणे परिवर्तन होत असते. विवाह संस्था ही याला अपवाद नाही. आधुनिक काळात औद्योगिकरण, जागतिकीकरण, नागरिकरण, शिक्षण पद्धती, आधुनिक मूल्यांचा स्वीकार याचा प्रभाव विवाह संस्थेवर पडलेला दिसतो. या घटकाच्या तिसऱ्या भागात आपण विवाह संस्थेतील परिवर्तनाविषयीं पुढील मुद्द्यांचा सविस्तर चर्चा केली आहे. १. विवाह पद्धतीमधील परिवर्तन २. विवाहाच्या वयात वाढ ३. जात आणि धर्मातील बंधने कमी ४. घटस्फोटाचे वाढते प्रमाण ५. हुंड्याच्या स्वरूपात बदल ६. बहुविवाहास

कायद्याने बंदी ७. विधवा विवाहास मान्यता ८. लिव-इन रिलेशनशिप ९. समलैंगिक विवाह १०. समान हक्क आणि जबाबदाऱ्या ११. तंत्रज्ञानाचा प्रभाव.

## २.५ स्वयं-अध्ययनासाठीच्या प्रश्नांची उत्तरे

१) सार्वत्रिक २) विवाह ३) यापैकी सर्व ४) एक विवाह

५) कुटुंबाची ६) संस्कार ७) लैंगिक संबंधांतील अस्थिरता

८) १९६१ ९) लिव्ह-इन रिलेशनशिप १०) बोगार्डस

## २.६ सरावासाठी प्रश्न

१. विवाह संस्थेचा अर्थ आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. विवाह संस्थेची व्याख्या सांगून विवाहसंस्थेचे महत्व विशद करा.

३. विवाह संस्थेचे बदलते स्वरूपाविषयी चर्चा करा.

## २.७ चिंतन आणि कार्य (Reflection and Action) :

१) समाजामध्ये सुरू असणाऱ्या लिव्ह-इन रिलेशनशिप संदर्भातील माहिती गोळा करून त्यासंदर्भात चिंतन करणे.

२) आपल्या आजूबाजूच्या खेड्यामधील विवाहाविषयी माहिती गोळा करून विवाहच्या बदलत्या स्वरूपाविषयी चिंतन करणे.

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings) :

1) Dr. S. C. Dube: Indian Marriage: A Field Study

2) Shankar Rao: Sociology, Primary Principles, S. Chand and Co. Ltd. New Delhi, 2004.

3) Maclver, R. M and Page C. H. : Society: An introductory Analysis, Mac Millan India Limited, Madras, 1986.

४) डॉ. सर्जेराव साळुंखे : समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना, नरेंद्र प्रकाशन, पुणे १९९६.

५) चंद्रकांत खंडागळे : भारतीय समाज

६) Harry Johnson M. : Sociology : A Systematic Introduction, Allied Publishers, Bombay, 1970.

7) Robin Fox : Kinship and Marriage: An Anthropological Perspective

❑❑❑

# घटक ३
# कुटुंब संस्था
## (Family Institution)

**घटक संरचना :**


३.० उद्देश

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ कुटुंबसंस्थेचा अर्थ आणि वैशीष्ट्ये

  ३.२.२ कुटुंबसंस्थेचे महत्व

  ३.२.३ कुटुंबसंस्थेचे बदलते स्वरूप

३.३ सारांश

३.४ स्वयं -अध्ययनासाठी प्रश्नाची - उत्तरे

३.५ सरावासाठी प्रश्न

३.६ चिंतन आणि कार्य

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्देश

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

- कुटुंबसंस्था म्हणजे काय? कुटुंबसंस्थेचा अर्थ आणि वैशिष्ट्ये समजून घेता येईल.
- कुटुंबसंस्थेचे महत्त्व लक्षात येईल.
- कुटुंबसंस्थेचे बदलते स्वरूप याबाबत माहिती मिळेल.

## ३.१ प्रस्तावना

समाजात कुटुंब ही समाजाची अत्यंत मूलभूत आणि प्राचीन संस्था आहे. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात कुटुंब संस्थेला अत्यंत मोलाचे स्थान आहे. समाजाच्या व्यक्ती व समुदाय रचनेचा विचार करताना कुटुंबाची भूमिका महत्त्वाची मानली जाते. कुटुंब ही एक अशी संस्था आहे, यामध्ये व्यक्तीच्या आचरणाची आणि विचारसरणीची जडणघडण होते. अपत्याला संस्कार, आदर्श, परंपरा, मूल्ये यांची शिकवण कुटुंबातूनच मिळते. कुटुंबामध्ये रक्तसंबंधांमुळे प्रेम, विश्वास, सहकार्य, जबाबदारी बरोबरच कुटुंबातील सदस्यांना

सुरक्षितता  वाटत असते. कुटुंबाच्या माध्यमातून समाजाच्या मूलभूत गरजा पूर्ण होतात आणि समाजव्यवस्था स्थिर राहते. मानवाच्या शारीरिक, मानसिक आणि सामाजिक विकासाची सुरुवात कुटुंबातूनच होते. कुटुंब ही एक सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि भावनिक एकक म्हणून कार्य करते. कुटुंबाशिवाय व्यक्तीच्या अस्तित्वाला समाजात महत्व प्राप्त होत नाही. विवाह संस्थेतून स्त्री व पुरुष यांना समाजात पती व पत्नी दर्जा प्राप्त होण्याबरोबरच पती-पत्नीच्या लैंगिक संबंधाना समाजमान्यता मिळते. त्यानंतरच कुटुंबांची स्थापना समाजात होते. कुटुंब म्हणजे विवाह, रक्तसंबंध किंवा दत्तकविधान आणि एकत्र निवास यांनी बांधल्या गेलेल्या दोन अगर अधिक स्त्रीपुरुषांचा समूह होय. निवासस्थान, स्वयंपाक, स्थावर आणि जंगम मालमत्ता, मिळकत व खर्च आणि सदस्यांच्या एकमेकांबद्दलच्या जबाबदाऱ्या या सर्व गोष्टी कुटुंबात बहुधा समाईक असतात. कुटुंब संस्थेचे स्वरूप काळानुसार आणि विविध सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक घटकांनुसार बदलत गेले आहे. त्यामुळे कुटुंबाच्या महत्त्वाच्या भूमिकेचा आणि तिच्या बदलत्या स्वरूपाचा अभ्यास करणं आवश्यक आहेसमाजातील नात्यागोत्याच्या व्यवस्थेचा एक घटक आहे. समाजपरत्वे वेगवेगळ्या समाजातील तसेच एकाच समाजात वेगवेगळ्या काळी अस्तित्वात आलेल्या कुटुंबसंस्थांचे स्वरूप, रचना व कार्ये यांबाबत भिन्नता आढळून येते. समाजातील आर्थिक, धार्मिक, राजकीय शैक्षणिक संस्थांशी कुटुंब संस्थेचा जवळचा संबंध असतो.

कुटुंबात दोन किंवा अधिक व्यक्तींचा समावेश होतो. कुटुंबात रक्तसंबंध, विवाहसंबंध किंवा दत्तक घेण्यामुळे सदस्यांच्यामध्ये नातेसंबंधाची निर्मिती होते. या नातेसंबंधाच्या व्यक्ती एकमेकांच्या संवर्धनासाठी, संगोपनासाठी आणि संरक्षणासाठी एकत्र निवास करत असतात. कुटुंब हे मुलांच्या सामाजिकरणाचे केंद्र असून मुलांच्या विचारसरणी, मूल्ये आणि आचार-विचार यांच्यावर कुटुंबातील व्यक्तींचा मोठा प्रभाव असतो. कुटुंबातील सदस्य एकत्रित आर्थिक गरजा भागवण्यासाठी काम करतात. कुटुंबाच्या माध्यमातून संस्कृती आणि परंपरांचे हस्तांतरण होते. कुटुंबामध्ये भावनिक बंध अधिक दृढ असतात, सदस्यांना संकटांच्या वेळी मानसिक आधार मिळतो. त्यामुळे कुटुंब ही एक अत्यावश्यक सामाजिक संस्था असून ती व्यक्ती आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ कुटुंबसंस्था म्हणजे काय? कुटुंबसंस्थेचा अर्थ आणि वैशिष्ट्ये

**कुटुंबाच्या व्याख्या व अर्थ** (Definition and Meaning of Family)

कुटुंब ही मूलभूत सामाजिक संस्था असून कुटुंब संस्था समजून घेण्यासाठी अभ्यासक/विचारवंतांनी केलेल्या व्याख्या समजून घेणे आवश्यक आहे.

१. मॅकआयव्हर आणि पेज यांच्या मते, ''लैंगिक संबंधावर आधारित आप्त्याचे संगोपन व पालनपोषण करणारा  सुस्पष्ट व स्थिर  स्वरूपाचा समूह म्हणजे कुटुंब होय.''

(MacIver and page- "family is a group defined by a sex relationship, sufficiently precise and enduring to provide for the procreation and upbringing of children". )

२. इलियटआणि मर्क्ल यांच्या मते, ''कुटुंब हे पती, पत्नी आणि अपत्य यांचे जैविक सामाजिक एकक आहे.''

(Eliott and Merrill, "Family is the biological social unit composed of husband, wife and children".)

३. बर्गेस आणि लॉकच्या मते, ''कुटुंब हा विवाह, रक्त किंवा दत्तक यांच्या नात्याने एकत्रित झालेल्या व्यक्तींचा समूह आहे; एकल कुटुंब, पती-पत्नी, आई आणि वडील, मुलगा आणि मुलगी, भाऊ आणि बहीण या त्यांच्या सामाजिक भूमिकांमध्ये एकमेकांशी संवाद साधणे आणि परस्परसंवाद करणे, एक समान संस्कृती निर्माण करणे.

(Burgess and Locke define family as "A group of persons united by ties of marriage, blood or adoption, consisting a single household, interacting and inter-communicating with each other in their respective social roles of husband and wife, mother and father, son and daughter, brother and sister creating a common culture.")

४. ऑगबर्न आणि निमकॉफ मते, ''कुटुंब म्हणजे पती-पत्नीचा अपत्यासह किंवा अपत्य नसलेला किंवा एकट्या पुरुष किंवा स्त्रीचा अपत्यासह एक कमी-अधिक टिकाऊ संबंध आहे.''

(Ogburn and Nimkoff - "Family is a more or less durable association of husband and wife with or without children or of a man or woman alone, with children.")

थोडक्यात कुटुंब म्हणजे ज्यामध्ये केवळ पती-पत्नी, किंवा पती-पत्नी त्यांची अपत्य, दत्तक मुले यांचा एकत्र निवास असलेला समुह होय. यामध्ये आपापसातील संबंधांद्वारे भावनिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक गरजा पूर्ण केल्या जातात.

**कुटुंबाची वैशिष्ट्ये –** (Characteristics of the Family)

**१. सार्वत्रिकता (Universal Nature)**

मूलभूत सामाजिक संस्था म्हणून कुटुंबसंस्थेची ओळख आहे. समाज कोणताही असो प्रत्येक समाजात कुटुंब संस्था आहे. त्यामुळे कुटुंब हे सार्वत्रिक (Universal Nature) आहे. कुटुंबाची सर्वत्रिकता हे त्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. व्यक्तीच्या व समाजाच्या दृष्टीने प्रत्येक समाजात कुटुंबाला एक वेगळे स्थान आणि महत्त्व आहे.व्यक्तीच्या जीवनात कुटुंबाला जन्मापासून महत्व प्राप्त होते. अपत्याचे संगोपन, संवर्धन व सामाजिकरण ही समाजाच्या सदस्त्वाच्या दृष्टीने कुटुंबाला सार्वत्रिकता मिळाली आहे. समाजपरत्वे काही भिन्नता कुटुंब रचना व कार्यामध्ये असू शकते.

## २. विवाह बंधन

समाजामध्ये विवाहाला खूप महत्व आहे. कुटुंबाची स्थापना विवाहाच्या माध्यमातून होते. दोन व्यक्ती सामाजिक, सांस्कृतिक, आणि कायदेशीर दृष्टिकोनातून एकत्र येतात यामध्ये लैंगिक संबंधास मान्यतांसह अपत्याच्या पालनपोषणाची जबाबदारी घेत असतात. ही जबाबदारी त्यांना समाज आणि कायद्याने दिलेली असते. विवाह ही समाजमान्य आणि कायदेशीररीत्या स्वीकृत अशी एक व्यवस्था आहे यात पती-पत्नी या नात्याला संमती देते. विवाहामुळे पती-पत्नींमध्ये नाते फक्त भावनिकच नसते, तर त्या नात्याला सामाजिक आणि आर्थिक स्थैर्यदेखील प्राप्त होते. यामुळे कुटुंबातील एकता व स्थिरता वाढते.

## ३. आप्त संबंध

कुटुंब एक आप्त संबंधाची व्यवस्था असते म्हणून कुटुंब हे आप्त संबंधाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. कुटुंबातील आप्त संबंध म्हणजे रक्तसंबंध, विवाहसंबंध किंवा दत्तक अपत्याच्या माध्यमातून निर्माण होणारे निकटचे नाते असते. या आप्त संबंधांमुळे कुटुंबातील सदस्यांमध्ये घनिष्ट सामाजिक संबध निर्मिती होते. एकमेकांप्रती प्रेम, विश्वास, आपुलकी आणि जबाबदारीची भावना निर्माण होते. ज्यातून कुटुंबातील सदस्यांना सुरक्षितता, समर्थन, आणि एकमेकांची काळजी घेतल्या जाते. आप्तसंबंधामुळे कुटुंब संस्था समाजाच्या विकासात आणि सामाजिक एकात्मता जपण्यात महत्त्वाची भूमिका बजावते.

## ४. द्वितीय संबंध

कुटुंबास सामाजिक संबंधाच्या दृष्टीने वेगळे स्थान आहे. कुटुंब संस्थेमुळे द्वितीय संबंधाची निर्मिती होते. कुटुंबातील सदस्यांमधील रक्तसंबंधांव्यतिरिक्त इतर सामाजिक आणि भावनिक नाते निर्माण होतात. या द्वितीय संबंधांमध्ये मेहुणे, मामा, काका, मावशी, चुलत भाऊ-बहीण इत्यादी नात्यांचा समावेश होतो. या नात्यांमुळे कुटुंबाचे नाते संबंधाची व्याप्ती वाढते. द्वितीय संबंधांमुळे कुटुंबातील सदस्यांमध्ये सहकार्य, प्रेम, आणि परस्पर समर्थनाची भावना बळकट होते. व्यक्ती आणि समाजासाठी द्वितीय संबंध कौटुंबिक जिव्हाळा, प्रेम, आपुलकी सोबत सामाजिक संबंध घट्ट करण्यात मोलाचा वाटा उचलतात.

## ५. समान निवास स्थान

संयुक्त कुटुंब असो की विभक्त कुटुंब प्रत्येक कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र निवास करत असतात. त्यामुळे कुटुंब संस्थेचे सामान निवासस्थान एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. कुटुंबातील सर्व सदस्य एकाच घरात किंवा निवासस्थानी असणे अनिवार्य वैशीष्ट्ये आहे. या समान निवासामुळे कुटुंबात जवळीक, प्रेम, आणि परस्पर सहकार्याची भावना निर्माण होते. एकत्र राहिल्याने सदस्यांमध्ये दैनंदिन व्यवहार, विचार, अनुभव आणि संसाधनांची देवाणघेवाण होत राहते, त्यामुळे कुटुंबात जिव्हाळा प्रेम, आपुलकी सदस्याप्रती दिसून येते. एकत्र निवास असल्याने कुटुंबातील सदस्यांच्या सुख दुःखात ते सहभागी होत असतात, तसेच समान निवासामुळे सदस्यांमध्ये सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक मूल्ये एकमेकांमध्ये रुजवली जातात. कुटुंबातील हा जवळचा सहवास कुटुंब संस्थेच्या स्थैर्य आणि संघटनात महत्त्वाची भूमिका बजावतो.

## ६. आर्थिक आधार

कुटुंब संस्थेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे आर्थिक आधार. कुटुंब हे कुटुंबातील सदस्यासाठी आर्थिकदृष्ट्या एकक म्हणून कार्य करते, कुटुंबातील सदस्य कुटुंबासाठी नोकरी, व्यवसाय अथवा इतर काम करत असतात. कुटुंबातील सदस्य मिळून उत्पन्न मिळवतात आणि त्याचा वापर घरखर्च, शिक्षण, आरोग्य, आणि अन्य आवश्यक गरजांसाठी करतात. यामुळे कुटुंबाला आर्थिक स्थैर्य प्राप्त होते आणि सदस्यांना आर्थिक सुरक्षितता मिळते. आर्थिक आधारामुळे सदस्यांमध्ये परस्परावलंबित्व, सहकार्य, आणि जबाबदारीची भावना वाढते. कुटुंबात मिळवलेल्या उत्पन्नाचे वाटप आणि वापर यामुळे सदस्यांमध्ये एकात्मता आणि विश्वासाचे वातावरण निर्माण होते, ज्यामुळे कुटुंबाचा आर्थिक आधार अधिक मजबूत होतो.

## ७. सदस्यांची जबाबदारी

कुटुंबाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सदस्यांची जबाबदारी. कुटुंबाचे व्यवस्थापनासाठी प्रत्येक कुटुंबातील सदस्याला विशिष्ट भूमिका आणि जबाबदाऱ्या दिल्या जातात. या जबाबदाऱ्यांमुळेच कुटुंबातील प्रत्येक सदस्याला कुटुंबाच्या एकत्रित जीवनात आणि विकासात आपला वाटा उचलण्याची संधी मिळते. माता पिता कुटुंबाचे मार्गदर्शन, पालनपोषण आणि आर्थिक स्थैर्य राखण्याचे काम करतात. त्यांची जबाबदारी मुलांना योग्य संस्कार, शिक्षण, आणि मूल्ये देण्याची असते. माता-पिता मुलांसाठी आदर्श असतात आणि त्यांच्या जीवनात योग्य दिशा दाखवतात. मुलांना सांभाळण्याबरोबरच त्यांच्या आरोग्याची, शिक्षणाची आणि भविष्यातील स्थैर्याची काळजी घेणे, हेही त्यांच्या जबाबदाऱ्या असतात. मुलांवर त्यांच्या वयानुसार विविध जबाबदाऱ्या सोपविल्या जातात. आजी-आजोबांची जबाबदारी कुटुंबाच्या परंपरा, मूल्ये, आणि सांस्कृतिक वारसा पुढील पिढीला देण्याची असते. त्यांचे अनुभव आणि सल्ले कुटुंबासाठी मार्गदर्शक ठरतात, ज्यामुळे कुटुंबातील सदस्यांचे नातेसंबंध अधिक दृढ होतात. या जबाबदाऱ्यांच्या विभाजनामुळे कुटुंब संस्था सुरळीत चालत असते.

## ८. भावनिक आधार

कुटुंबाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे भावनिक आधार. कुटुंब ही एक अशी संस्था आहे जिथे प्रत्येक सदस्याला भावनिक स्थैर्य, सुरक्षितता आणि प्रेम मिळते. कुटुंबामध्ये एकमेकांशी असलेल्या नात्यांमुळे आपुलकी आणि आत्मीयतेची भावना निर्माण होते. यातूनच प्रत्येक सदस्याला स्वतःची ओळख, आत्मसन्मान, आणि आत्मविश्वास मिळतो. कुटुंबातील सदस्यांमध्ये प्रेम, विश्वास, काळजी आणि समजूतदारपणा यांचा अनुभव असतो. जीवनातील कठीण प्रसंगी किंवा संकटसमयी कुटुंबाची भूमिका खूप महत्त्वाची ठरते, कारण अशा वेळी कुटुंबातील सदस्य एकमेकांना भावनिक आधार देतात. आनंदाच्या किंवा दुःखाच्या प्रसंगात कुटुंबातील सदस्य एकमेकांशी मनमोकळेपणाने बोलतात, एकमेकांना समजून घेतात आणि पाठिंबा देतात. भावनिक आधारामुळे व्यक्तीला स्वतःचा स्वीकार करण्याची आणि जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची ताकद मिळते.

### ९. लहान आकार–

सामाजिकदृष्ट्या कुटुंबाला अनन्यसाधारण महत्व असले तरी कुटुंब सदस्यसंख्या मर्यादित असते. कुटुंबात पती–पत्नी आणि त्यांची एक किंवा दोन मुले इतकेच सदस्य असतात. संयुक्त कुटुंबपद्धतीत दोन किंवा त्यापेक्षा जास्त सदस्य असले तरी सुद्धा ही संख्या मर्यादित असते. रक्तसंबंधित सदस्यक कुटुंबाचे सदस्य होऊ शकतात. त्यामुळे कुटुंब सदस्य संख्या मर्यादित असते. विवाह आणि विवाहानंतरच्या अपत्याचा जन्म याद्वारेच कुटुंबामध्ये सदस्यांची भरती होत असते. यामुळेही सदस्य संख्या मर्यादित असते. कुटुंबातील सदस्यांची सर्व जबाबदारी ही कुटुंबाची असते. आधुनिकतेच्या प्रभावामुळे ही संख्या अगदी दोन ते चार इतक्या मर्यादित सदस्य संख्येवर आलेली आहे.

### १०. सामाजिक नियमन–

कुटुंब एक सामाजिक संस्था असून कुटुंब सामाजिक चालीरीती आणि कायदेशीर नियमांद्वारे अस्तित्वात आहे. कौटुंबिक स्तरावर असलेल्या नियमांचे उल्लंघन सहजासहजी कुटुंब सदस्य करत नाही. कुटुंब सदस्यांना नियमांचे पालन करणे बंधनकारक असते. सामाजिक नियमनांना कुटुंबात खूप महत्व असते.

## ३.२.२ कुटुंबसंस्थेचे महत्त्व (Importance of family institution)

कोणताही समाज असो त्या प्रत्येक समाजात कुटुंबास महत्व आहे. कुटुंब ही कोणत्याही समाजाची गरज आहे. राज्यसंस्था, अर्थसंस्था, धर्मसंस्था या संस्थेत कुटुंब संस्थेला वेगळे स्थान आहे. व्यक्ती व समाज यांच्यामध्ये कुटूंबसंस्था अनेकांगी महत्वपूर्ण आहे. कुटुंबाचे महत्व खालीलप्रमाणे अधोरेखीत होत आहे.

### १. कुटुंब संस्काराचे केंद्र –

अपत्यास काय चांगले काय वाईट याची शिकवण सर्वात प्रथम कुटुंब देत असते. समाजात जीवन जगण्यासाठी व्यक्तीला चांगल्या संस्काराची गरज असते. समाजात कसे वागावे, काय करावे काय करू नये याबाबत संस्कार कुटूंब करत असते. व्यक्तीचा कुटुंबात जेंव्हा जन्म होतो तेंव्हा त्याला समाजाविषयी काहीच माहिती नसते. त्याच्यावर जसे संस्कार होतात तस तसे त्याचे व्यक्तिमत्व घडत असते. त्यामुळे समाजाचे हित ज्यात आहे असे संस्कार त्याच्यावर होणे आवश्यक असते. हे संस्कार त्याला कुटुंबात होत असतात.

### २. सामाजिकरणात भूमिका –

समाजाचा सदस्य बनविणारी प्रक्रिया म्हणजे सामाजिकरण होय. समाजासाठी सामाजिकरणाचे खूप महत्व आहे. सामाजिकरण प्रक्रिया ज्या घटकांद्वारे होते त्यामध्ये सर्वात महत्वाचा घटक म्हणजे कुटुंब होय. कुटुंबात व्यक्तीचा जन्म होतो. व्यक्तीचा जेंव्हा जन्म होतो तेंव्हा व्यक्तीला समाजाच्या कोणत्याही बाबीविषयी काहीच माहिती नसते. समाजाचा सदस्य होण्यासाठी समाजाचे रीतिरिवाज, प्रथा, परंपरा, मूल्ये, नियमने याबाबत माहिती असावी लागते. ही माहिती करून देणे ती सदस्यांच्या जीवनाचा एक दैनंदिन भाग करणे यांची जबाबदारी कुटुंबाची असते. कुटुंब हे अपत्यास सुरुवातीच्या काळात त्यांच्या सर्वांगीण विकासात मदत

करत असते. अपत्याचा जन्म झाल्यापासून प्रौढत्वापर्यंत कुटुंब सदस्यास समाजासाठी घडवत असते. मुलाचा प्रत्येक संवाद कितीही मोठा किंवा कितीही लहान असला तरीही कुटुंब त्याच्याशी साधत असते. त्यांना भाषा कौशल्ये शिकण्यास, भावनांना तोंड देण्यास आणि सामाजिक नियमांनुसार कार्य करण्यास मदत करते. मुलाच्या सामाजिकीकरणात कुटुंबाची मोठी भूमिका असते. सामाजिकरण अशी प्रक्रिया आहे ज्याद्वारे व्यक्ती समाजाचा सदस्य होतो. समूहाची मूल्ये, वर्तनप्रणाली सामाजिकरणातूनच व्यक्ती शिकत असते. सामाजिकरणामुळे मुले आनंद, दुःख, यश, अपयश इत्यादीना सामोरे जाऊ शकते.

**३. आर्थिक आधार–**

व्यक्तीला जगण्यासाठी आर्थिक गरज असते. कोणतेही कुटुंब कुटुंबातील सदस्याला आर्थिक आधार देत असते. आर्थिक गरज पूर्ण करण्यासाठी कुटुंबसंस्था व्यक्तीच्या आर्थिक सुरक्षिततेचा आधार बनते. कुटुंबातील सदस्यांची आर्थिक गरज पूर्ण व्हावी यासाठी कुटुंबातील सदस्य नोकरी, व्यवसाय किंवा इतर कोणतेही काम करत असतात ज्यातून त्यांना कुटुंबासाठी उत्पन्न मिळू शकेल. कुटुंबाच्या माध्यमातून व्यक्तीला आर्थिकदृष्ट्या स्थैर्य मिळते. कुटुंबामध्ये उत्पन्नाचे साधन एकत्रितपणे व्यवस्थापित केले जाते, ज्यामुळे प्रत्येक सदस्याच्या गरजा आणि आवश्यकतांची पूर्तता केली जाते.

कुटुंबातील सर्व सदस्याचे उत्पन्न हे कुटुंबातील सर्व सदस्यासाठी असते. कुटुंबात मुलांना आर्थिक जबाबदाऱ्या कशा पार पाडायच्या, तसेच प्रतिकूल परिस्थितीत संसाधनांचे व्यवस्थापन कसे करायचे हे शिकवले जाते. एखाद्या सदस्याला नोकरी, व्यवसाय किंवा शिक्षणासाठी आर्थिक मदतीची गरज असताना इतर सदस्य त्याला आधार देतात. कुटुंबातील सदस्य एकमेकांच्या आर्थिक गरजांची पूर्तता करून आपापसातील नातेसंबंध अधिक मजबूत करतात.

नवीन कुटुंब स्थापन करणाऱ्या सदस्यांना प्रारंभिक आर्थिक स्थैर्य मिळवण्यासाठी कुटुंबाचा आधार आवश्यक असतो. कुटुंबातील वडीलधाऱ्या सदस्यांच्या अनुभवाचा आणि मार्गदर्शनाचा फायदा होतो, ज्यामुळे व्यक्तीला आर्थिक निर्णय घेण्यात योग्य दिशा मिळते.

**४. भावनिक आधार –**

व्यक्तीला समाजात जगत असताना सुख, दुःखाला सामोरे जावे लागते. अनेक वेळा हे सुख दुःख टोकाचे असतात. अशावेळी त्याला भावनिक आधाराची जेंव्हा गरज असते तेंव्हा त्याचे कुटुंब त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे असते. कुटुंबात एकमेकांबद्दल आदर, प्रेम, समर्पण, आणि जबाबदारीची भावनाशिकवली जाते. ज्यामुळे व्यक्ती समाजाच्या व्यापक संदर्भातही योग्य वर्तन करू शकते.

कुटुंबसंस्था व्यक्तीच्या भावनिक आधारासाठी एक महत्त्वपूर्ण केंद्र आहे. व्यक्तीच्या जीवनात अनेक संकटे, अडचणी किंवा अस्थिरता येऊ शकते,अशावेळी कुटुंब ठामपणे आपल्या सदस्यांच्या पाठीशी उभं राहतं. संकटात कुटुंबातील सदस्य एकमेकांना आधार, देतात,एकमेकांना समजून घेतात.कुटुंबातील सदस्यांनी एकमेकांना समजून घेतल्याने सदस्यांच्या मनात आत्मविश्वास निर्माण होतो. त्याला भावनिक आधार मिळतो.

कुटुंबातील सदस्य एकमेकांच्या भावनांना समजून घेतात, ज्यामुळे व्यक्तीच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण होते.

जेव्हा व्यक्तीला बाहेरील जगात आव्हानांचा सामना करावा लागतो किंवा पराभवाचा अनुभव येतो, तेव्हा कुटुंबातील सदस्य त्याला आधार देतात आणि पुन्हा उभं राहण्याची ताकद देतात. कुटुंबातील प्रेमळ आणि सुरक्षित वातावरण व्यक्तीला जीवनातील तणाव आणि समस्या सोडवण्यासाठी प्रेरणा देते.

